मराठी अस्मितेचा आवाज बुलंद करण्याचे कार्य गेली २७ वर्षे करणारे 'दैनिक वृत्तमानस' आता घरोघरी पोचवण्याचे काम आम्ही करणार आहोत. वाचकांना आमच्या लोकप्रिय दैनिकाची प्रत उपलब्ध होत नसेल तर या दूरध्वनींवर संपर्क साधावा.
**दातार अँड सन्स न्युज पेपर डिस्ट्रिब्युटर्स**
भ्रमणध्वनी - ८६५५१९४४५२, ८५९१६६२६१६,९८६७३०८०६३

मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.
https://epapervrittamanas. in/

# वृत्तमानस


Email : vrittamanas1@gmail. com
मुंबई/ पालघर | मुंबई, रविवार, १८ ऑगस्ट २०२४ | वर्ष- २९ | अंक - ५९ | पाने- ८ | आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये



पाडायचं! की लढायचं!! पान ४

## म ह त्वा चे

### हा खेळ महाराष्ट्राला जाळून टाकेल...



**ठाणे :** महाराष्ट्रातील धार्मिक तसेच सामाजिक स्वास्थ्य त्यानिमित्ताने हे सत्ताधारी बिघडविण्याचा प्रयत्न करीत आहेत, हे आता लपून राहिलेले नाही. हा खेळ आता महाराष्ट्राला जाळून टाकेल. रामगिरी महाराजांकडून मुद्दामहून शब्द वदवून घेण्यात आले असा खळबळजनक आरोप शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे. महंत रामगिरी महाराज यांनी केलेल्या विधानाबद्दल जितेंद्र आव्हाड यांनी ट्विट केले आहे.

**सविस्तर वृत्त पान 5 वर**

### 'साबरमती'चे 22 डबे कानपूरजवळ घसरले



**कानपूर :** वाराणसी-अहमदाबाद दरम्यान प्रवास करणाऱ्या साबरमती एक्सप्रेसचे 22 डबे उत्तर प्रदेशमधील कानपूर आणि भीमसेन स्थानकादरम्यान रात्री 2.30 वाजण्याच्या सुमारास रूळावरून घसरले. या अपघातात कुणीही जखमी झाले नसल्याची माहिती रेल्वे अधिकाऱ्यांनी दिली. रूळावरील वस्तूला इंजिनची धडक बसल्यामुळे सदर अपघात झाला. या अपघातानंतर रेल्वेने प्रवाशांना बसची सुविधा उपलब्ध करून देत त्यांना कानपूर येथे आणले आहे. तिथून त्यांची अहमदाबादला जाण्याची व्यवस्था केली जात आहे. कानपूरचे उपजिल्हाधिकारी राकेश वर्मा यांनी एएनआयशी बोलताना म्हटले की, 22 डबे रूळावरून खाली घसरल्याचे दिसत आहे. या घटनेत अद्याप कुणीही जखमी झाल्याचे समोर आलेले नाही. रेल्वेने दिलेल्या माहितीनुसार, या अपघातामुळे या मार्गावरील सात ट्रेन रद्द करण्यात आल्या आहेत. तर तीन ट्रेन इतर मार्गावरून वळविण्यात आल्या आहेत.

### तुर्कस्तानमध्ये सत्ताधारी - विरोधी खासदारांमध्ये हाणामारी

**ईस्तंबूल :** तुर्कस्तानच्या संसदेमध्ये सत्ताधारी पक्षाचे सदस्य आणि विरोधी पक्षाच्या सदस्यांमध्ये जोरदार हाणामारी झाल्याचं समोर आलं आहे. एका विषयावर चर्चा सुरु असताना सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील काही सदस्यांमध्ये आधी आरोप-प्रत्यारोप आणि शाब्दिक वाद झाला. मात्र, त्यानंतर सत्ताधारी पक्षाचे सदस्य आणि विरोधी पक्षाच्या सदस्यांमध्ये वाद वाढला आणि त्यांचं रुपांतर हाणामारीत झालं. यामध्ये अनेक खासदारांचा सहभाग दिसला तर काही सदस्यांनी हस्तक्षेप करत हा वाद मिटवण्याचा प्रयत्नही केला. या हाणामारीनंतर संसदेच्या मजल्यावर रक्त देखील दिसून आलं. दरम्यान, एका व्हिडीओमध्ये दिसून आलं की, सत्ताधारी एकेपी पक्षाचे खासदार व्यासपीठावर उभ्या असलेल्या अहमद सिकला टोला मारण्यासाठी धावले. पण लगेच दुसरे काही खासदारही या हाणामारीत सहभागी झाले.

## मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेचा शानदार शुभारंभ

# लाडक्या बहिणींच्या जीवनात सुखाचे-आनंदाचे क्षण यावेत हीच या भावाची इच्छा- मुख्यमंत्री

**प्रतिनिधी**
**पुणे**

महिलांच्या ढोल आणि लेझीम पथकाचे सादरीकरण, उत्सवाच्या वातावरणात सजलेला आणि महिला भगिनींनी फुललेला शिवछत्रपती क्रीडानगरीचा परिसर, महिलांच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहणारा आनंद आणि मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्र्यांनी महिलांना दिलेल्या शुभेच्छा... अशा उत्साहपूर्ण वातावरणात 'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजने'चा पुणे येथे राज्यस्तरीय शुभारंभ करण्यात आला. महिलांच्या जीवनात सुखाचे, आनंदाचे दिवस यावे हीच भाऊ म्हणून प्रामाणिक इच्छा आहे आणि म्हणूनच मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेद्वारे बहिणींना दर महिन्याला दीड हजार रुपये माहेरचा अहेर मिळणार आहे, अशा भावपूर्ण शब्दात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी आपल्या भावना व्यक्त केल्या

म्हाळुंगे-बालेवाडी येथील श्री शिवछपत्रपती क्रीडानगरी येथे झालेल्या या सोहळ्याला केंद्रीय




राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, सहकार मंत्री दिलीप वळसे, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून लाखो बहिणी मिळाल्या याचा मनापासून आनंद आहे. त्यांचे प्रेम ही जीवनातील मोठी शिदोरी आहे. या योजनेसाठी पूर्ण वर्षाचे आर्थिक नियोजन करण्यात आले आहे. या दीड हजार रुपयांचे मोल गरजू बहिणींसाठी खूप आहे. त्यांना या रकमेतून कुटुंबाच्या गरजा पूर्ण करण्यासोबत आर्थिक उन्नती साधता येईल, असे मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

पान 3 वर

### *लाडक्या बहिणी पहिल्याच दिवशी भावाला वैतागल्या मुख्यमंत्र्यांच्या भाषणावेळीच खुर्च्या सोडल्या*

***कोल्हापूर ।*** *पहिल्याच दिवशी लाडकी बहीण भावाला काहीशी वैतागल्याची दिसून आलं. जिल्हा प्रशासनाकडून आज रामकृष्ण हॉल येथे मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेअंतर्गत लाभार्थी महिलांचा सन्मान मेळावा आयोजित केला होता. सकाळी साडेनऊ वाजता या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलं होतं. मात्र, काही कारणास्तव अचानक जिल्हा प्रशासनाने हा कार्यक्रम एकवाजेपर्यंत पुढे ढकलला. दरम्यान जिल्हाभरातून या कार्यक्रमासाठी महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती. सकाळी साडेनऊ वाजता कार्यक्रम असल्याने सकाळी लवकरच महिलांनी घराबाहेर पडून कार्यक्रमस्थळी हजेरी लावली होती. मात्र अचानक कार्यक्रमात बदल केल्यामुळे महिलांची मोठी गैरसोय झाली. तसंच सकाळी साडेनऊचा कार्यक्रम दुपारी एक वाजता सुरू झाल्याने महिलांनी प्रचंड नाराजी दाखवली. सकाळी लवकर बाहेर पडल्याने महिलांची दुपारपर्यंत उपासमार झाली. त्यामुळे नाराज झालेल्या महिलांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या भाषणावेळी कार्यक्रम स्थळावरून खुर्ची सोडल्या. व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे मुख्यमंत्री शिंदे यांचं भाषण दाखवलं जात होतं.*

# एक वादळ आलं आणि अदृश्य शक्तीने आमचं घर उद्ध्वस्त केलं

**प्रतिनिधी**
**जळगाव**

लाडकी बहिण योजना चांगली योजना आहे. मी तिचं स्वागत करते. सरकार किती वाईट असलं तरी ज्या महिलांच्या खात्यात पैसे जमा झाले आहेत त्यांनी तातडीने बँकेत जा आणि ते पैसे काढा. कारण यांचा भरोसा नाही. यांचा एक आमदार म्हणतो मतदान केलं तर ठिक. नाहीतर डिसेंबरमध्ये पैसे देणार नाही. मात्र या आमदाराला हेच माहीत नाही की डिसेंबरमध्ये यांचं सरकार नसणार, असा टोला खासदार सुप्रिया सुळे यांनी लगावला.

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी वेगळा राजकीय निर्णय घेतल्याने राष्ट्रवादीत फूट पडली. त्याचा परिणाम केवळ पक्षावर आणि राजकारणावरच झाला नाही तर कुटुंबातही त्यावरून कटुता आली. आज खासदार सुप्रिया सुळे यांनी पक्षातील या घडामोडींवर भाष्य केलं. आमच्या आयुष्यात एक वादळ आलं आणि त्याने आमचं कुटुंब उद्ध्वस्त केलं. कुटुंब म्हणजे पवार कुटुंब नाही, तर राष्ट्रवादी पक्ष हा आमचं कुटुंब आहे. ते उद्ध्वस्त झालं, अशी मनातील खदखद सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केली.

खासदार सुप्रिया सुळे या आज जळगावच्या दौऱ्यावर आहेत. अमळनेरमध्ये बोलताना त्यांनी मनातील खदखद व्यक्त केली. या मतदारसंघातून पाच वर्षांपूर्वी



### अखेर सुप्रिया सुळे यांची खदखद बाहेर

एक आमदार तुम्ही निवडून दिला होता त्याबद्दल मी तुमचे आभार मानते. प्रत्येकाच्या आयुष्यात वेगवेगळ्या घटना घडत असतात. तशा माझ्या आयुष्यातही घडल्या आहेत. माझा काळ मी बदलू शकत नाही. आमच्या घरात मुलं आणि मुलींमध्ये कधी अंतर नव्हतं, अशा पुरोगामी कुटुंबामध्ये मी जन्माला आले आहे.

वडीलधाऱ्या माणसांचा मान सन्मान करायचा, कधीकधी एक पाऊल मागे घेतलं. फार जबाबदाऱ्या घेतल्या नाही. वडिलांच्या जागेवर काम करायचा निर्णय झाला, असं सांगतानाच यानंतर आमच्या आयुष्यात एक वादळ आलं. एक अदृश्य शक्ती आली आणि अदृश्य शक्तीला आमचं सुख काय बघवलं गेले नाही आणि या अदृश्य शक्तीने आमचं घर उद्ध्वस्त केलं. घर म्हणजे पवार कुटुंब नाही, तर राष्ट्रवादी पक्ष उद्ध्वस्त करण्याचा पाप या शक्तीने केल्याच ते म्हणाल्या.

# अजित पवारांकडे इतका पैसा आला कुठून ?

## सामाजिक कार्यकर्त्या अजंली दमानिया यांचा सवाल

**प्रतिनिधी**
**मुंबई**

राष्ट्रवादीचे अध्यक्ष व राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांची सुरु असलेली जनसन्मान यात्रा ही निव्वळ गुलाबी यात्रा असून पक्ष कार्यकर्त्यांना 40 मोटरगाड्या वाटण्यासाठी इतका पैसा कोठून आला कुठून, असा सवाल सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केली आहे.



आपल्याकडे अनेक नेत्यांच्या बेहिशोबी उत्पन्नाची माहिती असून त्यांचा गैरव्यवहार बाहेर काढण्यासाठी आपला लढा सुरुच राहील, असा इशाराही त्यांनी दिला आहे. राष्ट्रवादीचे युवक अध्यक्ष सूरज चव्हाण यांनी दमानिया यांच्या परदेशी दौऱ्यांचा संदर्भ देत आरोप केले होते. त्याला उत्तर देताना दमानिया म्हणाल्या की, 2014 मध्ये माझ्या कुटुंबाने एक कोटींहून अधिक उत्पन्न दाखवले होते. यंदा आपल्या कुटुंबाने 27 कोटी उत्पन्न दाखवले असून दोन कोटी कर भरला आहे. मागच्या 12 महिन्यांमध्ये आपण 10 परदेशी प्रवास केले आहेत. पाने संपल्याने आपल्याकडे पाच पारपत्र आहेत. आपल्याकडे सर्व राजकीय नेत्यांची माहिती असून अजित पवार, उद्धव ठाकरे, नाना पटोले यांच्यासह सर्व नेत्यांच्या उत्पन्नाची चौकशी करावी, अशी मागणीही दमानिया यांनी केली. भ्रष्टाचाराने राज्याची वाट लावली असून महायुतीचे सरकार जनतेचा पैसा खिरापतीसारखा वाटत आहे, असा आरोपही त्यांनी केला.

# नाईलाजास्तव अजित मी पवारांसोबत गेलो

## राजेंद्र शिंगणेंकडून शरद पवारांचे तोंडभरुन कौतुक

**प्रतिनिधी**
**वर्धा**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या फुटीनंतर दोन गट पडून अनेक आमदारांनी अजित पवार यांना समर्थन दिलं आहे. मात्र आता अजित पवार गटातील आमदारांची घरवापसी होताना दिसत आहे. शरद पवार यांच्या गळाला अजित पवार यांच्या गटातील आणखी एक आमदार लागल्याची शक्यता आहे. अजित पवार गटाचे सिंदखेडराजाचे आमदार राजेंद्र शिंगणे हे शरद पवार यांच्या गळाला लागल्याची चर्चा सुरु झाली आहे. वर्ध्यातील एका कार्यक्रमात राजेंद्र शिंगणे यांनी मोठा गौप्यस्फोट केला आहे. या कार्यक्रमात शरद पवार हे देखील उपस्थित होते. यावेळी अजित पवार यांच्यासोबत नाईलाजामुळे गेल्याचे राजेंद्र शिंगणे यांनी म्हटलं आहे. तसेच राजेंद्र शिंगणे यांनी यावेळी शरद पवार यांचे तोंडभरुन कौतुक देखील केलं आहे. वर्ध्यात माजी आमदार सुरेश देशमुख यांच्या ७५व्या वाढदिवसाच्या निमित्तानं एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलं होतं.



## दिल्ली, झारखंडनंतर आता कर्नाटकचे मुख्यमंत्री भाजपच्या रडारवर

# सिद्धरामय्यांच्या चौकशीला राज्यपालांची मंजुरी

**बंगळुरु**

कर्नाटकचे राज्यपाल थावरचंद गहलोत यांनी म्हैसूर शहर विकास प्राधिकरणाच्या जमीन घोटाळा प्रकरणासंबंधी मुख्यमंत्री सिद्धरामय्यांवर जे आरोप झाले आहे त्याच्या चौकशीला मान्यता दिली आहे. त्यामुळे मुख्यमंत्री सिद्धरामय्यांच्या विरोधात खटला चालवला जाणार आहे. आरटीआय कार्यकर्ते टी. जे. अब्राहम यांच्याद्वारे जी तक्रार दाखल केली गेली त्यानंतर हा निर्णय झाला आहे. ज्यामुळे कर्नाटकात राजकीय तणाव वाढला आहे.

कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्याविरोधात MUDA द्वारा करण्यात आलेल्या जमीन अधिग्रहण प्रकरणात घोटाळा केल्याचा आरोप आहे. सिद्धरामय्या यांनी या प्रकरणात घोटाळा करुन त्यांच्या पत्नीला लाभ मिळवून दिल्याचे म्हटले जाते.

# रत्नागिरीच्या आरे वारे समुद्रात पनवेलमधील दोघे बुडाले

## एकाचा मृत्यू तर दुसऱ्याला वाचविण्यात यश

**रत्नागिरी**

तालुक्यातील आरे वारे समुद्राच्या पाण्यात पनवेल येथील शनिवारी दोघेजण बुडाले. यातील एकाला वाचवण्यात यश आले असून सिद्धार्थ विनायक फासे (वय 19) या तरुणाचा यात मृत्यू झाला. तर प्रविंद्र बिरादार याला वाचविण्यात स्थानिकांसह जिवरक्षकांना यश आले आहे. शनिवारी दुपारी अडीज वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली.

रत्नागिरीच्या कोषागार कार्यालयात काही वर्षांपुर्वी कार्यरत असलेले व सध्या वसई-विरार महानगरपालिकेचे मुख्य लेखा परिक्षक विनायक फासे हे 15 ऑगस्टला आपल्या कुटुंबासह फिरण्यासाठी रत्नागिरीत आले होते. शनिवारी दुपारी ते कुटुंबासमवेत आरे-वारे येथील समुद्र किनारी गेले होते. समुद्र किनाऱ्यावर फिरत असताना त्यांच्या मुलगा सिद्धार्थ हा गुडघाभर पाण्यात उतरला.

अशातच अचानक आलेल्या एका लाटेमुळे सिद्धार्थ पाण्यात ओढला गेले. प्रविंद्र बिरादार यांनी त्याला वाचविण्यासाठी पाण्यात धाव घेतली. मात्र पाण्याचा प्रवाह जास्त असल्याने सिद्धार्थ आत ओढला गेला. सिद्धार्थला वाचविताना प्रविंद्र बिरादार यांच्या श्वास गुदमरु लागल्याने ते पाण्यात कोसळले.

## मोदींचे एकीकडे 'वन इलेक्शन'चे तुणतुणे...

# मात्र महाराष्ट्राच्या निवडणुका लांबणीवर

**प्रतिनिधी**
**नागपूर**

लाल किल्ल्यावरून भाषण देताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संबंध देशाच्या निवडणुका एकाचवेळी व्हाव्यात अशा प्रकारची भूमिका मांडली. ही भूमिका मांडून काही तास होत नाही तोच आपल्याला जम्मू-कश्मीर आणि हरियाणाची निवडणूक जाहीर झाल्याचे ऐकायला मिळाले. मात्र यावेळी झारखंड आमि महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक जाहीर झाली नाही. वन नेशन,



वन इलेक्शनचे धोरण मोदी मांडत असताना महाराष्ट्राच्या निवडणुकीसंदर्भातील त्यांचा हा निर्णय एक प्रकारचा विरोधाभास आहे, असा टोला शरद पवार यांनी लगावला. ते नागपूर येथे पत्रकारांशी बोलत होते.

**पान 3 वर**



**मुंबई :** भारतीय जनता पार्टी चांदिवली विधानसभेच्या वतीने भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त पेनिन्सुला ग्रँड हॉटेल ते जंगलेश्वर महादेव मंदिर रोड पर्यंत तिरंगा यात्रेचे आयोजन करण्यात आले. पक्षाचे प्रवक्ते ॲड. अनिकेत उज्वल निकम, जिल्हा उपाध्यक्ष शुभ्रांशू दीक्षित, विधानसभा अध्यक्ष, माजी नगरसेवक प्रकाश मोरे, चांदिवली निवडणूक प्रमुख, माजी नगरसेवक हरीश भांदिर्गे, मुंबई अल्पसंख्याक अध्यक्ष वसीम खान, ॲड. जयप्रकाश शेट्टी आदीसह चांदिवली विधानसभेतील पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



## थोडक्यात

### मुलुंडमधील रस्ते होणार मजबूत आणि टिकाऊ

**मुंबई:** मुलुंडमधील राजा इंडस्ट्रीयल इस्टेट ते एलबीएस रोड, ईस्टर्न एक्स्प्रेस हायवेदरम्यान डीपी रस्त्यांचे मजबुतीकरण केले जाणार आहे. यासाठी मुंबई महापालिका तब्बल २४ कोटी ५३ लाख ७३ हजार रुपये खर्च करणार आहे. रस्त्यांचा दर्जा सुधारण्यासाठी मुंबईतील रस्ते सिमेंट काँक्रीटचे करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे; तर महापालिकेच्या विकास नियोजन आराखडा अंतर्गत येणाऱ्या रस्त्यांची सुधारणा करण्यात येणार आहे. राजा इंडस्ट्रीयल इस्टेट ते लालबहादूर शास्त्री (एलबीएस) मार्गावरील १८.३० मीटरचा रस्ता, १३.४० किलोमीटर लांब गाला इंडस्ट्रीयल इस्टेट रोड आणि ईस्टर्न एक्स्प्रेस हायवे ते टाटा कॉलनीचा १८.३० किलोमीटर लांब रस्त्यांचा दर्जा सुधारण्यासाठी निविदा प्रक्रिया राबवण्यात आली आहे. निविदा प्रक्रियेत पात्र कंत्राटदाराला पावसाळा वगळून १८ महिन्यांत काम पूर्ण करणे बंधनकारक असणार आहे.

### जिल्हा मध्यवर्ती बँकांमध्ये गर्दी

**वाडा:** सरकारच्या लाडकी बहिण योजनेंतर्गत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये शुक्रवार(दि.१६) रोजी तीन हजार रुपयांचा पहिला हप्ता जमा झाला आहे. त्यानंतर ज्यांचे पैसे जमा झाले अशांनी पैसे काढण्यासाठी तर काहींचे पैसे जमा झाले नाहीत, अशा महिला चौकशीसाठी बँकांमध्ये येत असल्याने महिलांचा एकच गर्दी उसळलेली आज बँकेमध्ये पाहायला मिळाली. महिलांनी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळविण्यासाठी बँकेत खाती उघडली. मात्र त्या खात्याला आधार कार्ड व पॅन कार्ड लिंक नसल्याने त्याचा लाभ या महिलांना मिळणार नाही. दरम्यान या अटीमुळे बऱ्याच बहिणींचे आधार कार्ड बँक खात्याला लिंक नसल्याने त्यांची सध्या बँकेत धावाधाव सुरू आहे. बँकेत आधार सिडिंग असल्याशिवाय पैसे खात्यावर जमा होणार नाहीत. याची खात्री पटल्याने अनेक महिला बँकेत धावाधाव करू लागल्या आहेत. त्यामुळे बँकेच्या कर्मचाऱ्यांवर ताण येऊ लागला आहे. आधार सीडींगचे काम वाढल्याने बँकेत पैसे काढण्यासाठी, जमा करण्यासाठी येणाऱ्या ग्राहकांचा खोळंबा होत आहे. सध्या या योजनेचे पैसे जमा होणाऱ्या जिल्हा मध्यवर्ती बँकात महिलांची गर्दी मोठी दिसून येत आहे.

### फ्लॅटसाठी 75 लाख रुपये घेऊन वृद्धेची फसवणूक

**मुंबई:** फ्लॅटसाठी सुमारे 75 लाख रुपये घेऊन एका 75 वर्षांच्या वृद्धेची फसवणूक केल्याप्रकरणी राकेश रामचंद्र सावंत या आरोपीविरुद्ध काळाचौकी पोलिसांनी अपहारासह फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. खरेदी केलेल्या फ्लॅटची परस्पर विक्री करुन राकेशने तक्रारदार महिलेची फसवणूक केल्याचा आरोप आहे.

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

# मालमत्ताकराचे सर्वेक्षण करणाऱ्या एजन्सीकडून लूट

## हितेंद्र ठाकूरांकडून एजन्सी काढून टाकण्याचे निर्देश

प्रतिनिधी
■ वसई

वसई विरार मध्ये वाढीव मालमत्तांचा शोध घेण्यासाठी पालिकेने नेमलेली एजन्सी तडजोडी आणि आर्थिक लूट करत असल्याचे समोर आले आहे. ही खासगी एजन्सी त्वरीत काढून टाका आणि पालिकेच्या कर्मचाऱ्यांमार्फत सर्वेक्षण करा असे निर्देश आमदार हितेंद्र ठाकूर यांनी दिले आहेत. यापूर्वी देखील विधानसभेत आमदार राजेश पाटील यांनी एजन्सी आर्थिक लूट करत असल्याचा आरोप केला होता. आमदारांच्या या विरोधामुळे मालमत्ता सर्वेक्षण मोहीम पालिकेला गुंडाळावी लागण्याची शक्यता आहे.

मागील काही वर्षांपासून वसई विरार शहराचे नागरिकरण वाढले आहे. त्यातच विविध प्रकारच्या व्यावसायिक आस्थापना सुद्धा तयार झाल्या आहेत. तर काही ठिकाणी व्यावसायिक आस्थापनांचे वाढीव बांधकाम करण्यात आले आहे. अशा मालमत्तांचे नव्याने सर्वेक्षण न झाल्याने जुन्याच क्षेत्रफळाच्या आधारे कर आकारणी केली जात होती. सद्यस्थितीत शहरात १ लाख ४२ हजार इतक्या व्यावसायिक मालमत्ता आहेत. त्यामुळे मालमत्ता कर वाढीसाठी वाढीव मालमत्तांचा जीआयएस प्रणाली द्वारे सर्वेक्षण करण्याचा निर्णय पालिकेने घेतला होता. त्यासाठी खासगी एजन्सी नेमून मालमत्तांचे सर्वेक्षण करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार मागील वर्षी ऑगस्ट मध्ये मेसेर्स सीईई इन्फो सिस्टीम लिमिटेड या कंपनीला देण्यात आले होते. जीआयएस प्रणाली द्वारे सर्वेक्षण करून मालमत्तेची डिजिटल स्वरूपातील छायाचित्रे जिओ-टॅगिंग, अंतर्गत व बाह्य मोजमाप आणि त्यांचे कार्पेट, बांधकाम क्षेत्र डिजिटल उपकरणाद्वारे मोजमाप करणे असे या कामाचे स्वरूप होते.

### सर्वेक्षणातून लूट होत असल्याचा आमदारांचा आरोप

*मात्र ही एजन्सी सर्वेक्षणाच्या नावाखाली तडजोडी करत असल्याच्या तसेच औद्योगिक कंपन्यांकडून आर्थिक लूट करत असल्याच्या तक्रारी येत होत्या. त्याचे पडसाद गुरूवारी झालेल्या जनता दरबारात उमटले. पालिकेच्या खासगी एजन्सीकडून आर्थिक लूट होत असल्याने आमदार हितेंद्र ठाकूर चांगलेच भडकले. मालमत्ता धारकांना वाढीव देयके देऊन आर्थिक लूट करीत असतात असा आरोप त्यांनी यावेळी केला. या एजन्सी सर्वात आधी काढून टाका असे आदेश आमदार हितेंद्र ठाकूर यांनी पालिकेच्या अधिकाऱ्यांना दिले आहेत. या सर्वेक्षणाच्या नावाखाली जुन्या ग्रामपंचायतीमधील घरांना वाढीव घरपट्टी आकारली जाते तसेच ती तोडण्याची कारवाई केली जात असल्याचा आरोप बोईसरचे आमदार राजेश पाटील यांनी जुलै महिन्यातील पावसाळी अधिवेनात केला. पालिकेत सध्या प्रशासकीय राजवट आहे. ते मनमानी पध्दतीने असे सर्वेक्षण करत असून सर्वसामान्य नागरिकांना वेठीस धरत असल्याचे त्यांनी सांगितले होते. सध्या सुरू असलेले हे सर्वेक्षण थांबवावे तसेच घरांना लावलेली वाढीव घरपट्टी रद्द करावी अशी मागणी त्यांनी सभागृहात केली होती. आमदार राजेश पाटील आणि आता आमदार हितेंद्र ठाकूर यांनी देखील एजन्सीकडून लूट होत असल्याचा आरोप केल्याने पालिकेला खासगी एजन्सी मार्फत सर्वेक्षणाचा गाशा गुंडाळावा लागण्याची शक्यता आहे.*

### यापूर्वी ठाकूरांच्या विरोधामुळे ड्रोन सर्वेक्षण रद्द

*आमदार हितेंद्र ठाकूर यांचा दबदबा असल्याने त्यांच्या संमतीशिवाय कुठलेही काम वसई विरार महापालिकेला करता येत नाही. त्यांनी विरोध केला तर पालिकेला आपले निर्णय रद्द करावे लागतात. दोन वर्षांपूर्वी नवीन मालमत्ता शोधण्यासाठी पालिकेने शहराचा ड्रोन द्वारे सर्वेक्षण करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार खासगी कपंनीला काम देऊन ७० कोटी रुपयांची निविदा काढण्यात आली होती. परंतु आमदार हितेंद्र ठाकूर यांनी या सर्वेक्षणाला विरोध केला होता. त्यामुळे ती निविदा पालिकेला रद्द करावी लागली होती.*

तीन तरुणींचा बनाव उघड झाला

# पाण्याच्या बाटलीतून लघुशंका प्यायला दिल्याचा रचला बनाव



प्रतिनिधी
■ वसई

पगार मिळत नाही म्हणून अनेक लोक मालकाशी भांडतात. पगार मिळवण्यासाठी वेगवेगळ्या क्लुप्त्या लढवतात. मात्र वसईतील एका कंपनीत काम करणाऱ्या तीन तरुणींनी एक अजब शक्कल लढवली होती. या तरुणींनी आपल्यापाण्याच्या बाटलीत मालकाने लघुशंका भरून दिल्याची तक्रार पोलीस ठाण्यात केली. सुरुवातीला पोलीस देखील या अजब आरोपाने चक्रावले होते मात्र पोलीस तपासात हा बनाव असल्याचे निष्पन्न झाले.

इमिटेशन ज्वेलरीच्या कारखान्यात घडली घटना

वसई पूर्वेच्या नवघर येथे इमिटेशन ज्वेलरी बनाविन्याचा एक छोटा कारखाना आहे. या कारखान्यांमध्ये काम करणाऱ्या तीन तरुणींनी माणिकपूर पोलीस ठाण्यामध्ये एक अजब तक्रार दाखल केली. आमच्या पाण्याच्या बाटलीमध्ये कंपनी मालकाने लघुशंका केल्याचा खळबळजनक आरोप त्यांनी या तक्रारीत केला होता. या विचित्र आरोपाने पोलीस देखील चक्रावले.

पोलिसांनी लगेच कंपनीमध्ये चौकशी सुरू केली रात्रपाळीत काम करणाऱ्या सर्व कामगारांना आणले त्यांची कसून चौकशी सुरू केली. त्यांना पोलिसी भाषेत 'प्रसादही' दिला मात्र कोणीच कबुली कबुली देईना. कंपनीत सीसीटीव्ही कॅमेरे देखील नव्हते त्यामुळे नेमका काय घडलं हे कळायला मार्ग नव्हता.


इमिटेशन सगळा किळसवाणा प्रकार रात्री झोपायला आलेल्या कामगारांनीच केल्याचा आरोप या मुलींनी केला होता. याची तक्रार कंपनीच्या मालकाकडे केली असता त्या मालकाने उलट त्या मुलींवरच संशय घेतला होता. त्यानंतर संतापलेल्या त्या मुलींनी थेट वसईचं माणिकपूर पोलीस ठाणे गाठलं आणि आपली लेखी तक्रार पोलिसांना दिली. मात्र पोलिसांनी जेव्हा या मुलींची उलट तपासणी केली तेव्हा घडलेला प्रकार समोर आला.

काहीही समोर येत नसल्याने मोठा पेच निर्माण झाला होता. अखेर पोलिसांना संशय आला आणि त्यांनी या तीन तरुणीची उलट चौकशी केली. तेव्हा त्यांनी हा बनाव रचल्याची बाब समोर आली. स्पष्ट झाले. कंपनी मालकाने त्यांना पगार दिला नव्हता. हा रखडलेला पगार मिळावा आणि कंपनी मालकाला धडा शिकवावा यासाठी त्यांनी हा बनाव रचल्याचे माणिकपूर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजू माने यांनी सांगितले.

# डहाणू तालुक्यात पुन्हा भूकंपाचे धक्के

प्रतिनिधी
■ डहाणू

डहाणू तालुक्यातील धुंदलवाडी, कासा, गंजाड परिसरात आज (१७ ऑगस्ट) पहाटे ६.३५ वाजताच्या सुमारास तीव्र आणि सौम्य स्वरूपाचे दोन भूकंपाचे धक्के बसले आहेत. भूकंपामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. आज पहाटे ६.३५ च्या सुमारास भूकंपाचा पहिला धक्का बसला असून ६.४० च्या सुमारास दुसरा सौम्य धक्का जाणवला. दोन धक्क्यांपैकी एकाची तीव्रता ३.६ रिष्टर स्केल इतकी नोंदविण्यात आली असून याची खोली १० किलोमीटर इतकी आहे. तर दुसरा धक्का हा सौम्य असल्यामुळे त्याची नोंद झाली नसल्याची माहिती मिळत आहे.




पालघर जिल्ह्यात २०१८ पासून भूकंपाचे धक्के बसण्याचे प्रकार सुरू आहेत. मध्यंतरी भूकंपाचे प्रमाण कमी झाल्यामुळे धोका टळल्याची शक्यता व्यक्त होत होती. मात्र पुन्हा भूकंपाचे धक्के जाणवल्यामुळे भूकंपाचे सत्र पुन्हा सुरू होण्याची भीती व्यक्त होत असून भूकंप प्रवण क्षेत्रात राहणाऱ्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

भूकंपाचे धक्के जाणवल्यानंतर त्या संदर्भातील माहिती मिळवण्यासाठी शासकीय यंत्रणा प्रयत्नशील होती. मात्र किमान दोन तास त्याविषयी संबंधित संकेतस्थळावर माहिती उपलब्ध न झाल्याने हे धक्के सौम्य असावेत असा शासकीय यंत्रणेचा समज झाला. मात्र नंतर भूकंप संकेतस्थळावर घडलेल्या भूकंपाची तीव्रता निर्देशित करण्यात आल्यानंतर ३.६ तीव्रतेचा भूकंप झाल्याचे स्पष्ट झाले. शासकीय संकेतस्थळावर याचा प्रभाव व्यापक दृष्टीने दिसत असला तरी त्याची तीव्रता डहाणू तालुक्यात जाणवल्याचे सांगण्यात आले. या भूकंपात कोणतेही मोठे नुकसान झाल्याची माहिती अजून पर्यंत पुढे आली नाही.

### मुंबईतील रस्त्यांवर केवळ 83 खड्डे शिल्लक

**मुंबई:** गणेशोत्सवापूर्वी मुंबईतील रस्त्यांवरील सर्व खड्डे बुजविण्याचे आदेश पालिका आयुक्तांनी दिले आहेत. त्यामुळे खड्डे बुजवण्याच्या कामाला वेग आला आहे. जून ते आतापर्यंत १६ हजार ६४५ खड्ड्यांपैकी १६ हजार ५६२ खड्डे बुजवण्यात आल्याचा दावा पालिकेने केला आहे. मुंबईतील रस्त्यांवर फक्त ८३ खड्डेच शिल्लक असून गणेशोत्सवापूर्वी मुंबईतील रस्ते खड्डेमुक्त होतील, असे पालिकेने स्पष्ट केले आहे. मुंबईतील रस्ते खड्डेमुक्त करण्यासाठी मुंबई महापालिकेकडून दरवर्षी कोट्यवधी रुपयांचे कंत्राट देण्यात येते.




**मुंबई ।** माजी नगरसेवक, सिद्धीविनायक मंदिर विश्वस्त भास्कर शेट्टी यांनी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचे पैसे बहिणींच्या खात्यात आल्याबद्दल धारावी जनसंपर्क कार्यालय येथे जल्लोष साजरा केला.

# 13 लाखांची अवैध दारु जप्त

## चारोटी येथे राज्य उत्पादन शुल्क विभागाने सापळा रचुन केली कारवाई

प्रतिनिधी
■ डहाणू

पर राज्यातून अवैद्य रित्या येणारी विदेशी दारू चा साठा केला जप्त राज्य उत्पदन शुल्क, डहाणू खात्रीलायक बातमी नुसार स्वातंत्र्य दिनी कोरडा दिवस असल्याने लगतच्या केंद्र शासित प्रदेशातुन होणा-या मद्य तस्करीवर आळा घालणेकामी दिवसरात्र गस्त व करडी नजर ठेवत असुन त्या अनुषंगाने सुनिल देशमुख, निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांनी सापळा रचुन धडक कारवाई करुन, मौजे चिल्लार फाटा, ओव्हर ब्रिजच्या खाली, मुंबई अहमदाबाद हायवे येथे मारुती सुझुकी कंपनीची पांढ-या रंगाची ब्रिझा क्र. DD-03 M-0130 या गाडीची झडती घेतल्याने सदर



लपवुन ठेवलेले परराज्यातील अवैध मद्य मिळुन आल्याने गाडी सोडुन फरार झाल असून परराज्यातील मद्य विदेशी मद्याचे एकुण ५० बॅक्स सदर गुन्हयांत जप्त केलेला सर्व मुद्देमाल दादरा नगर हवेली राज्यात विक्री करीता आहे. जप्त मुद्देमालाची एकुण किंमत रु.१३,१९,६००/- इतकी आहे. आरोपी फरार झाला निरीक्षक सुनिल देशमुख, इतर त्यांचा संपूर्ण अधिकारी आणि कर्मचारी यांनी सदरची कामगिरी पार पाडली .

### विशेष मुलांनी बनवल्या आकर्षक राख्या

**वाडा:** श्री रामकृष्ण शिक्षण मंडळाच्या सदाफुली कार्यशाळेत (मानसिक दिव्यांग व कर्णबधिर विद्यार्थ्यांची कार्यशाळा) विशेष मुलांनी बनवलेल्या आकर्षक राख्या लक्ष वेधून घेतात. गेल्या १५ दिवसांपासून विद्यार्थी या राख्या बनवण्यामध्ये व्यग्र होते. नुकतीच आर दक्षिण विभागातील अभियंता आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कार्यशाळेला भेट देऊन विद्यार्थ्यांचे कौतुक केले. श्री रामकृष्ण शिक्षण मंडळाच्या सदाफुली कार्यशाळेत एकूण ३५ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. विद्यार्थ्यांनी आकर्षक अशा सुंदर मण्यांच्या राख्या तयार केल्या आहेत.

### म्हाडा सोडत ऑनलाईन अर्ज प्रक्रियेबाबत माहिती देण्यासाठी मुंबई मंडळातर्फे 19 ऑगस्ट रोजी लाईव्ह वेबिनार

प्रतिनिधी
■ मुंबई

म्हाडाच्या ऑनलाईन संगणकीय सोडतीसाठी अर्जदारांना अधिक सुलभतेने अर्ज सादर करता यावा, याकरिता म्हाडाच्या मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळातर्फे दिनांक १९ ऑगस्ट २०२४ रोजी दुपारी १२ वाजता लाईव्ह वेबिनार आयोजित करण्यात आला आहे.

मुंबईतील विविध गृहनिर्माण प्रकल्पांतील २०३० सदनिकांच्या विक्रीसाठी दि. ०९ ऑगस्ट २०२४ पासून म्हाडाचे संकेतस्थळ https://housing.mhada.gov.in व मोबाइल ॲपद्वारे ऑनलाईन अर्ज नोंदणी व अर्ज स्वीकृती प्रक्रियेला प्रारंभ झाला आहे.

म्हाडा सदनिका विक्रीची संगणकीय सोडत ही पूर्णतः ऑनलाईन असल्याने सोडत प्रक्रियेमध्ये सहभागी होण्याकरिता अर्जदारांना मार्गदर्शन करण्यासाठी मंडळातर्फे हा उपक्रम राबविण्यात येत आहे. मंडळातर्फे आयोजित या वेबिनारमध्ये सहभागी होण्यासाठी म्हाडाच्या सोडतीकरिता यापूर्वी व सध्या चालू असलेल्या सोडतीसाठी ज्या अर्जदारांनी नोंदणी केली आहे तसेच नोंदणी करण्यास इच्छुक आहेत त्यांनी https://youtube.com/live/asSycqY6Dvc?feature=share या लिंकवर जाण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच म्हाडाच्या सोडतीसाठी नोंदणी केलेल्या अर्जदारांना एसएमएसद्वारे व म्हाडाच्या https://mhada.gov.in या संकेतस्थळावरही Live Webinar ची Link उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. म्हाडाचे अधिकृत यूट्यूब चॅनल व फेसबुक पेज @mhadaofficial वरही या वेबिनारचे थेट प्रक्षेपण केले जाणार आहे. या वेबिनारमध्ये मुंबई मंडळाचे उपमुख्य अधिकारी (पणन) राजेंद्र गायकवाड, म्हाडाच्या मुख्य माहिती व संचार तंत्रज्ञान अधिकारी श्रीमती सविता बोडके, माहिती व संचार तंत्रज्ञान अधिकारी संदीप बोदेले इच्छुक अर्जदारांच्या शंकांचे निरसन करून माहिती देणार आहेत. इच्छुक अर्जदारांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंडळातर्फे करण्यात येत आहे.

# मुंबईतील `बायकर्स`नी दिले डहाणूमध्ये 170कुटुंबियांना मोफत रेशन

प्रतिनिधी
■ डहाणू

स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने मुंबई रायडर्स क्लब फाऊंडेशन तर्फे डहाणूतील दुर्गम अशा लिलाक पाडा येथे नागरिकांना धान्य तसेच विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले. लिलाकपाडा येथील शाळेत हा सोहळा उत्साहात झाला.

येथील सामाजिक कार्यकर्ते शैलेश विद्याधर पिंपळे यांच्या हस्ते ध्वजरोहण करण्यात आले. यावेळी विशेष आमंत्रित म्हणून मुंबई रायडर्स क्लब फाऊंडेशन या संस्थेला आमंत्रित करण्यात आले होते. गावकऱ्यांतर्फे झाडांची रोपटे देऊन सर्वांचे स्वागत करण्यात आले. शाळेचे मुख्य शिक्षक दिपक देसले यांनी शाळेतील उपक्रमांची माहिती दिली. विद्यार्थ्यांचा यामध्ये सक्रीय सहभाग असतो हे त्यांनी नमूद केले. यात पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी तसेच मुलांना पर्यावरणाची माहिती व्हावी या हेतूने मुलांकडून सीडबॉल तयार केले जातात. ज्यामध्ये विविध झाडांच्या बिया एकत्रित करून सुरक्षित ठेवल्या जातात व नंतर त्या जंगलात, रस्त्याच्या कडेला व इतर ठिकाणी ठेवण्यात येतात. ज्यातून पावसाळ्यात त्यातून रोपटी निर्माण होतात. पुढील वर्षी एक लाख सीडबॉल बनवण्याचे उद्दीष्ट ठेवल्याचा उल्लेखही देसले यांनी केला. प्लॅस्टिक चा पर्यावरणाला असलेला धोका लक्षात घेता शाळेमध्ये पूर्णपणे प्लास्टिकबंदी आहे. प्लास्टिकच्या बाटल्या टाळण्यासाठी शाळा मुलांना शाळेत मधल्या सुट्टीत काही वेळ फक्त पाणी पिण्यासाठी दिला देते.



समाजाला आपण देणे लागतो, आणि हे देणे शिक्षण, अन्न, सुविधा, रक्तदान आणि श्रमदान या माध्यमातून करून भावी पिढीला सक्षम बनवण्याच्या उद्देशाने मुंबई रायडर्स क्लब फाऊंडेशन तर्फे सामाजिक उपक्रमाच्या अंतर्गत फाऊंडेशन तर्फे या पाड्यातील जवळजवळ १७० कुटुंबियांना मोफत रेशन देण्यात आले. यात तांदुळ, मसुर डाळ, तेल, चहा, साखर, हळद, मिरची, मीठ यांचा समावेश होता. तसेच सदर शाळेतील सर्व म्हणजेच जवळजवळ ४८ मुलांना वह्या आणि स्टिलच्या पाण्याच्या बाटल्या यांचे वाटप करण्यात आले.

◆ स्वातंत्र्य दिनानिमित्त मुंबई रायडर्स क्लब फाऊंडेशन चा सामाजिक उपक्रम
◆ शालेय मुलांना वह्या आणि स्टिलच्या वॉटर बॅगचे वाटप

तसेच शाळेसाठी ब्लू टूथ स्पिकर ही देण्यात आला. यावेळी बोलताना मुंबई रायटर्स क्लब फाऊंडेशन चे फाऊंडर कपिल जैन म्हणाले की शिक्षण आणि पोषण हे समृद्ध समाजाचे मुख्य घटक आहेत आणि आम्ही सकारात्मक प्रभाव पाडण्यासाठी समर्पित आहोत. आज आमचे जवळजवळ ५०० रायडर्स सभासद आहेत. पुढच्या वर्षीपर्यंत हे दुप्पट होतील असे आम्हाला वाटते, त्यावेळी यापेक्षाही कामाचा विस्तार करू असेही कपिल यांनी सांगितले.

> **यापूर्वी आम्ही काही छोटे सामाजिक कार्यक्रम केले. मुंबई बाहेर जाऊन एवढ्या मोठ्या प्रमाणात आम्ही पहिल्यांदाच मोठा उपक्रम करीत आहोत. आमचा क्लब हे एक कुटुंब आहे. आता यापेक्षाही मोठे उपक्रम आम्ही पुढे करणार आहोत. आम्ही वाहन चालवण्याच्या आनंदाबरोबरच त्याला सामाजिक कार्याची जोड देत आहोत.**
> - प्रशांत चव्हाण,

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts

Year - Twenty Nine
Issu - 59
R.N.I. Registration No. - 65609/96

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबावदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.

वर्ष- एकोणतीसावे
अंक - ५९
आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६

**मुंबई ।** अखिल भारतीय काँग्रेस कार्यकारिणीच्या विशेष निमंत्रीत सदस्यपदी माजी मंत्री व प्रदेश काँग्रेसचे कार्याध्यक्ष नसीम खान यांची नियुक्ती झाल्याबद्दल शनिवारी त्यांचा महाराष्ट्र पक्ष कार्यालय, टिळक भवन, दादर येथे प्रमुख नेत्याच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला. यावेळी माजी मंत्री सुरेश शेट्टी, आमदार भाई जगताप, प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष संघटन व प्रशासन नाना गावंडे, प्रदेश सरचिटणीस राजेश शर्मा, राजन भोसले, शितल म्हात्रे, ईब्राहिम भाईजान, प्रवक्ते निजामुद्दीन राईन, रवी राजा, अशोक जाधव, अमरजीत मनहास, जेनेट डिसूजा, भावना जैन,भरत सिंह, संदेश कोंडविलकर, हुकुमराज मेहता, जीशान सय्यद, राजन भोसले, शरीफ खान, त्रिलोकी मिश्रा, अनिल चौरसिया त्यांच्यासह काँग्रेसचे इतर ज्येष्ठ नेते उपस्थित होते.



# आता RCF सुद्धा अदानीच्या घशात घालणार का?

## उद्धव ठाकरे यांचा जळजळीत सवाल

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

मुंबईतले मोक्याचे भुखंड अदानी लोढाच्या घशात घातले जात आहे असा घणाघात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केला. तसेच मुंबईला हद्दपार करण्याची सुपारी या सरकारने घेतली आहे असेही उद्धव ठाकरे म्हणाले.

आरसीएफच्या कर्मरी संघटनेला उद्धव ठाकरे यांनी संबोधित केले. त्यावेळी उद्धव ठाकरे म्हणाले की, संकटं नव्याने आपल्यापुढे उभी राहत आहेत आताच्या खोके सरकारने मुंबई विकायला काढली आहे. मुंबईतला मराठी माणूस हद्दपार झालाच पाहिजे अशी या सरकारने सुपारी घेतली आहे. इथे खासगीकरणाचा विषय निघाला आहे, बघुया कुणाला एवढी खाज आली आहे ती. ही व्यापारी वृत्ती अतिशय घाणेरडी वृत्ती आहे असे उद्धव ठाकरे म्हणाले.

मुंबईला संपवायचं, वैशिष्ट्य मारायचं, मराठी माणसाला बेकार करायचं. आता नोकरीच्या जाहिराती येत आहेत, मुंबईत मराठी माणसाला नो एन्ट्री. बिल्डिंग ज्या उभ्या राहिल्या त्यात नो एन्ट्री. 1966 चा काळ जर पुन्हा उभा करायचा ठरवला तर त्यात चुकीचं काय? या मुंबईत सगळे गुण्यागोविंदाने राहत आहेत, या हिंदुंचं संरक्षण आम्ही हिंदू म्हणून केलं. आता आपल्यासोबत इतर समाजाचेही लोक येत आहेत. एवढं सगळं व्यवस्थित सुरू असताना मिठाचा खडा का टाकताय? असा सवाल उद्धव ठाकरे यांनी विचारला.

RCF ही संपूर्ण देशाची अन्नदाता आहे. त्यांना तुम्ही खतं देता. त्या खतावर मोदींचा फोटो, लसीकरणाच्या सर्टिफिकेटवर मोदींचा फोटो होता. लस त्यांनी निर्माण केली असा आमचा उपमुख्यमंत्र्यांचा सूर होता. खताचं काय, खत कोणी तयार केलं असेही उद्धव ठाकरे म्हणाले.

वांद्र्यात सरकारी कर्मचाऱ्यांची वसाहत होती. ही जागा कोर्टाला गेली होती. पण मी मुख्यमंत्री असताना ही जागा मी सरकारी कर्मचाऱ्यांसाठी राखीव ठेवली. पण आता काय निर्णय झाला माहित नाही. आता आरसीएफ सुद्धा अदानीच्या घशात घालणार का? नाहीतर वांद्रे रेक्लमेशनला सरकारी कर्मचाऱ्यांना घरं द्या आमचा पाठिंबा आहे असेही उद्धव ठाकरे यांनी नमूद केले.

बीकेसीचा मोक्याचा भुखंड बुलेट ट्रेनला देऊन टाकला. ज्याची गरज नाही, ते आमच्या माथी मारले जाते आहे आणि जे मराठी माणसं आहेत, त्यांना मिठागरात फेकून देणार. धारावीच्या जास्तीत जास्त लोकांना अपात्र ठरवून मिठागर, दहिसर, मुलुंडला फेकून द्यायचे. आणि मोक्याचे भुखंड अदानी आणि लोढाच्या घशात घालायचे. हे होऊ देणार नाही असेही उद्धव ठाकरे म्हणाले.

सरकारने नवीन योजना आणली आहे, लाडकी बहीण योजना. गद्दारांना 50 खोके आणि लाडक्या बहिणीला पंधराशे रुपये. गद्दारांना भरभरुन द्यायचे आणि निवडून देण्यासाठी लाच देता. पुन्हा निवडून आल्यावर हे बेघर करणार. हे होऊ न देण्यासाठी आमदार आणि नगरसेवक निवडून आले पाहिजे असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.




**मुंबई ।** देशात महिलांवरील अन्याय अत्याचाराच्या घटनात मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. त्याच्या विरोधात काल संध्याकाळी ४.३० वाजता AIDWA, SFI, DYFI, वर्किंग वुमेन्स कोऑर्डिनेशन कमिटी (CITU), जाति अंत संघर्ष समितीच्यावतीने दादर (पूर्व) स्थानकाबाहेर संयुक्त आंदोलन करण्यात आले

# खुनशी कोण हे संपूर्ण महाराष्ट्राला दिसून आलेय

## भाजपा गटनेते दरेकरांचे जरांगेंवर टिकास्त्र

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**



तुम्ही एवढे मोठे आंदोलन उभे करत असताना खुन्नस काय असतो हे देवेंद्र फडणवीस यांनी दाखवून दिले असते. लोकशाही मार्गाने ते आंदोलन करायला देताहेत. सुडाची भावना असती तर ते तसे वागले असते. परंतु ते लोकशाही मार्गाला मानणारे आहेत. तुम्हीच आंदोलनाआडून किती खूनशी आहात हे महाराष्ट्र पाहतोय. सर्वांना अरेतुरे करता. त्यामुळे खूनशी कोण आहे हे तुमच्या प्रत्येक वाक्यावाक्यात महाराष्ट्राला दिसून येतेय, अशी टीका भाजपा गटनेते आमदार प्रविण दरेकर यांनी मनोज जरांगे पाटील यांच्यावर केली.

पत्रकारांशी बोलताना दरेकर म्हणाले की, राजकारणात कोण येत असते, कोण जात असते. परंतु मनोज जरांगे आपण काळजी घ्या की, आपल्या आंदोलनात पहिल्या दिवसापासून असणारी लोकं आपल्या सोबत आहेत का? मला अनेक जण भेटले. येणाऱ्या काळात तुमच्यापासून किती लोकं बाहेर पडतील त्याची मोजदादही करता येणार नाही, याची काळजी घ्या. देवेंद्र फडणवीस आणि भाजपाची काळजी घेऊ नका. महाराष्ट्रातील जनता त्यासाठी सक्षम आहे.

तसेच जरांगे मराठा आरक्षण विषयापासून दूर गेलेत. त्यांचा राजकीय पक्ष होतोय. ते पक्ष काढतील किंवा अपक्ष राहतील, कुठल्यातरी पक्षाला पाठिंबा देतील. त्यामुळे ज्यांना तिकीट मिळणार नाही, पक्षापेक्षा जे उमेदवारीला महत्व देतात असे लोकं भेटत असतात. आता त्यांना एक नवीन राजकीय दुकानं मिळालेय त्या दुकानात जातील, असा टोलाही दरेकरांनी लगावला.

दरेकर पुढे म्हणाले की, लाडक्या बहिणींनी विरोधकांची त्रेधातिरपट उडवली आहे. जेजे बोलताहेत ते तोंडावर आपटताना दिसताहेत. त्यांच्या वक्तव्याचे उत्तर आमचे महायुती सरकार देतेय त्यामुळे ह्यांची थोबाडं काळी होताना दिसताहेत. राऊत म्हणतात आमचे सरकार आल्यावर दीड हजाराचे तीन हजार करणार. तुम्ही काय जादू करणार की आकशातून पैसे आणणार आहात. बजेटमध्ये वर्षभराची तरतूद केली असल्याचे आम्ही सांगितले. आमचे सरकार बहाद्दर आहे. एक महिन्याचे नाही दोन महिन्याचे तीन हजार रुपये महिलांच्या खात्यात टाकले. विरोधक तोंडावर आपटताहेत. उलट राज्याचे मुख्यमंत्री आज म्हणाले आपला आशीर्वाद लाभला आणि ही योजना चिरंतर टीकावी असे वाटत असेल तर दीडचे दोन, दोनचे तीन हजार करू. पुढची शाश्वती आमचे सरकार देतेय. त्यामुळे खोटा नॅरेटिव्ह सेट करण्याचा विरोधकांचा प्रयत्न आहे.

# लाडक्या बहिणींच्या जीवनात सुखाचे-आनंदाचे क्षण यावेत हीच या भावाची इच्छा- मुख्यमंत्री

**पान1 वरुन...**

आता मदतीसाठी कुणासमोर हात फैलावे लागणार नाही. महिलांना योजनेचे अर्ज भरण्यासाठी ३१ ऑगस्ट पर्यंत मुदत आहे. अर्ज भरल्यानंतर त्यांना जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर महिन्याची एकत्रित रक्कम त्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात येईल. काही महिलांचे बँक खाते आधार क्रमांकाशी जोडले गेल्यानंतर त्यांच्या खात्यात रक्कम जमा होईल. प्रत्येक पात्र भगिनीला योजनेचा लाभ दिला जाईल. लाखो बहिणींच्या खात्यात दर महिन्याला निश्चित रक्कम जाईल याचे खूप समाधान आहे, अशा शब्दात श्री. शिंदे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. महिला भगिनींसाठी मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेच्या माध्यमातून वर्षाला तीन गॅस सिलेंडर मोफत देण्याचा निर्णय घेतला. भावालाही मदत करण्यासाठी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना सुरू केली. सर्वांच्या जीवनात सुखाचे क्षण यावे यासाठी कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. जनतेची सेवा हेच शासनाचे ध्येय असून प्रत्येक योजना यादृष्टीनेच गतीने राबविण्यात येत आहे, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

# 21 ऑगस्टला आझाद मैदानात 'दलित संघटनांचे एकता धरणे '

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

अनुसूचित जाती, जमातींचे उप वर्गीकरण करण्याच्या सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या वादग्रस्त निकालाच्या निषेधार्थ उत्तर भारतातील अनेक दलित संघटनांनी येत्या बुधवारी २१ ऑगस्ट रोजी ' भारत बंद ' ची हाक दिली आहे. त्याला महाराष्ट्रातील आंबेडकरवादी संघटनांनी प्रतिसाद दिला असून त्यासाठी जोरदार तयारी जिल्ह्या - जिल्ह्यात सुरू झाली आहे.



मुंबईत ' आंबेडकरवादी भारत मिशन ' तर्फे भारत बंदच्या दिवशी आंदोलनाच्या पूर्वतयारीसाठी दलित संघटनांची एक बैठक आज मुंबईतील प्रेस क्लब मध्ये आयोजित करण्यात आली होती. त्यात २१ ऑगस्ट रोजी दुपारी १ वाजता आझाद मैदानात ' दलित एकता धरणे ' आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला. ही माहिती बैठकीचे निमंत्रक दलित पँथरचे नेते सुरेश केदारे आणि ज्येष्ठ पत्रकार दिवाकर शेजवळ यांनी एका पत्रकाद्वारे दिली.

या बैठकीला रिपाइं ( सेक्युलर) चे अध्यक्ष श्यामदादा गायकवाड, बहुजन रिपब्लिकन सोशलिस्ट पार्टीचे अध्यक्ष ॲड. डॉ. सुरेश माने, ज्येष्ठ रिपब्लिकन नेते सयाजी वाघमारे, ज्येष्ठ पत्रकार सुनील खोब्रागडे, समाजवादी पार्टीचे राज्य महासचिव राहुल गायकवाड , ॲड. जयमंगल धनराज, सतीश डोंगरे, पीपल्स रिपब्लिकन पार्टी ऑफ महाराष्ट्रचे अध्यक्ष मिलिंद सुर्वे, मुंबई प्रदेश अध्यक्ष मंगेश पगारे, दिवंगत रामविलास पासवान यांच्या दलित सेनेचे नेते रवी गरुड, सी पी आय एम एल ( लिब्रेशन) नेते श्याम गोहिल हे नेते उपस्थित होते.

मुंबईत आंबेडकरी बालेकिल्ले अशी ओळख असलेल्या वसाहतींमधील अनेक आंबेडकरवादी कार्यकर्ते या बैठकीला आवर्जुन उपस्थित होते. त्यात भगवान गरुड, भीमराव चिलगावकर, शरद कांबळे, जयवंत हिरे, संजय जगताप, सचिन गायकवाड, विनोद ढोके, दीपक चौगुले यांचा प्रामुख्याने समावेश होता.

# MPSC व IBPS च्या परीक्षा एकाच दिवशी, MPSC ने तारखा बदलाव्यात अन्यथा उच्च न्यायालयात जाऊ : अतुल लोंढे

## कर्नाटक सरकार जर तारखा बदलू शकते तर महाराष्ट्रात काय अडचण?

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

महाराष्ट्र लोकसेवा आयोग युवकांचे आयुष्य घडवणारे आहे की त्यांची कत्तल करणारा जनावरांसारखा कत्तलखाणा आहे. १८ व २५ ऑगस्ट रोजी IBPS ने देशपातळीवर परीक्षा आयोजित केलेल्या असताना त्याच तारखांना महाराष्ट्र लोकसेवा आयोगानेही परीक्षा आयोजित केल्या आहेत, यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. एमपीएससीने परिक्षांच्या तारखांमध्ये बदल करुन दोन तीन दिवसांनी परीक्षा घेऊन विद्यार्थ्यांना न्याय द्यावा अन्यथा हाय कार्टात दाद मागू, असा इशारा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी दिला आहे.

टिळक भवनमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलताना अतुल लोंढे म्हणाले की, राज्य आयोग परिक्षांच्या तारखा ठरवताना UPSC/IBPS/ Staff Selection commission च्या परिक्षांच्या तारख्यांचा अंदाज घेऊन ओव्हरलॅप होणार नाहीत अशा पद्धतीने तारखा ठरवण्याचा प्रघात चालत आला आहे. पण महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने त्याची दखल घेतल्याचे यावेळी तरी दिसत नाही. एमपीएससी विद्यार्थ्यांवर सुड उगवण्याचे काम करत आहे. एकतर जागा निघत नाहीत आणि जागा निघल्या तर त्याचे नियोजन व्यवस्थित नसते. परीक्षा फक्त रविवारीच घ्यावी असा काही नियम नाही, कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांनी तातडीने या प्रकरणी लक्ष घालून परिक्षांच्या तारखा ओव्हरलॅप होत असल्याचे दिसताच विद्यार्थ्यांचे हित पाहून आयोगाच्या परिक्षांची तारिख बदलण्याचे निर्देश दिले. जे कर्नाटक सरकार करू शकते ते महाराष्ट्र सरकार का करु शकत नाही. सर्वसामान्यांचे सरकार आहे असा दावा करणाऱ्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नाकाखाली एमपीएससी मनमानी कारभार करते त्यात लक्ष लागण्याची गरज आहे.

ॲग्रिकल्चर संवर्गातील २०२ जागांवर विद्यार्थ्यांची निवड झाली असताना अद्याप त्यांना नियुक्त्या दिलेल्या नाहीत, त्याच कृषी संवर्गातील २५८ जागांची मागणी सरकारने एमपीएससीकडे केलेली आहे पण एमपीएससीने त्या संवर्गाची लिंकच ओपन केलेली नाही, त्यामुळे २५ तारखेला जी परिक्षा होत आहे ती होऊ नये अशी आमची मागणी आहे. ती लिंक ओपन करण्यासंर्भात एमपीएससीकडून काहीही हालचाल होत नाही आणि मुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार व फडणवीस या प्रकरणी लक्ष घालण्यास तयार नाहीत असेही लोंढे म्हणाले.

एमपीएससीचे अधिकार अत्यंत मग्रूर आहेत, विद्यार्थ्यांच्या हिताशी त्यांचे काहीही देणेघेणे नाही. एमपीएसी परिक्षा उत्तिर्ण होऊन अधिकारी होण्याचे स्वप्न पाहणारे ग्रामीण भागातील विद्यार्थी मोठ्या संख्येने आहेत, त्यांची आर्थिक परिस्थितीही अत्यंत हलाखीची आहे. एमपीएससी आडमुठी भूमिका घेऊन त्यांच्या स्वप्नाचा चुराडा करण्याचे पाप करत आहे. आयोगाच्या या भोंगळ कारभाराला विद्यार्थी कंटाळले आहेत, त्यांना नैराश्य आले असून ते प्रचंड मानसिक ताणात आहेत. सरकारने लाडकी बहिण योजना काढली आहे तशीच लाडका भाचा स्पर्धा परिक्षा योजनाही काढावी, असा टोलाही अतुल लोंढे यांनी लगावला आहे.

# भव्य रक्तदान शिबीर संपन्न




**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

मुंबईतील प्रतिष्टीत मंडळांपैकी असलेले आग्रीपाडा विभागातील आग्रीपाडा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ हे अमृत महोत्सव व श्री महालक्ष्मी मंदिर नवरात्रोत्सव मंडळ हे सुवर्ण महोत्सव साजरा करत आहेत.

दोन्ही मंडळ हे आपल्या सामाजिक,शैक्षणिक, वैद्यकीय, नैसर्गिक आपदग्रस्तांसाठी मदत या निरनिराळ्या कामासाठी प्रसिद्ध आहेत. रक्तदान हेच जीवन दान या उक्ती प्रमाणे दोन्ही मंडळांनी संयुक्तिक रित्या रविवार दिनांक ११/०८/२४ रोजी सकाळी ९.०० ते दुपारी २.०० या कालावधीत बी.आय.टी. चाळ क्रमांक ३ व ४ मधील पटांगणात भव्य रक्तदान शिबीबीराचे आयोजन केले होते.

विभागातील रक्तदात्यांनी या भव्य रक्तदान शिबिरास उपस्थित राहून मोठ्या प्रमाणात रक्तदान केले. एकूण २२५ रक्तदात्यांनी रक्तदान केले. रक्तदात्यास आकर्षक भेटवस्तू देण्यात आल्या. सदर महारक्तदान शिबिरास विभागातील माजी नगरसेविका सौ. गीताताई गवळी,काँग्रेस चे नेते श्री. शमीमभाई अन्सारी,पोलीस दलातील सह पोलीस निरीक्षक श्री. टोटवाड साहेब तसेंच पोलिस कॉन्स्टेबल श्री. विलास पाटील,विश्व हिंदू परिषदेचे श्री.सतीश वाळके,श्री.संतोष झगडे, श्री. गणेश श्रीवर्धकर आणि इतर मान्यवरांनी सदिच्छा भेट घेतली.

**मध्य रेल्वे**

ईएमयू एमआरव्हिसी कोच बोगीजचे पीओएच

**ई-निविदा सूचना क्र. आरआर/पीआर/ एसएनपीडी/२०६/२३-२४/५९ आर**

कामाचे नाव: ईएमयू कार्यशाळा सानपाडा येथे ईएमयू एमआरव्हिसी कोच बोगीजचे पीओएच. कामाचे अंदाजे मूल्य: रु. ६८४६८५५६ इसारा रक्कम: रु. ४९२४०० निविदा अर्जाचे शुल्क: नाही. पूर्तता कालावधी: २४ महिने. निविदा सादरीकरण समाप्तीचा दिनांक आणि वेळ: ०३.०९.२०२४ रोजी १३:०० वा. पर्यंत बोलीकरण सुरु दिनांक: २०.०८.२०२४ निविदा www. ireps.gov.in संकेतस्थळाद्वारे केवळ ई-निविदाकरण स्वरूपात स्वीकारल्या जातील. निविदा कागदपत्रे संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. 336

रेल्वे फाटक बंद स्थितीमध्ये असल्यास ओलांडण्यास मनाई आहे



**मुंबई ।** महाराष्ट्राचे नवनियुक्त राज्यपाल महमहिम डॉ.सी पी राधाकृष्णन यांची आज रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री ना.रामदास आठवले यांनी आज सदिच्छा भेट घेतली. महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल पद स्विकारल्या नंतर आज प्रथमच राज्यपाल डॉ सी पी राधाकृष्णन यांची ना.रामदास आठवले यांनी पहिल्यांदा भेट घेऊन अभिनंदन केले.

# कोणत्याही समाजाच्या धार्मिक भावना दुखवणे चूक - आठवले

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

कुणाच्याही धार्मिक भावना कोणीही दुखावू नये. महंत रामगिरी महाराज यांनी नाशिकमध्ये वादग्रस्त वक्तव्य केल्यामुळे मुस्लिम समाजाच्या भावना दुखावल्या. दोन समाजात तेढ निर्माण होईल आणि बंधुभाव शांतता भंग होईल असे वक्तव्य कोणीही करू नये.समाजात बंधुभाव वाढावा सामाजिक ऐक्य अबाधित राहावे आणि समाजात शांतता टिकावी यासाठी प्रयत्न करणे हे संत महंत आणि सर्वांचीच जबाबदारी आहे. त्यानुसार महंत रामगिरी महाराज यांचे वक्तव्य चुकले असून महंत म्हणून त्यांची समाजात बंधुभाव वाढविण्याची जबाबदारी अधीक आहे. समाजात बंधुता वाढविणारे वक्तव्य करावे अशीच त्यांच्याकडून समाजाची अपेक्षा आहे.

# मात्र महाराष्ट्राच्या निवडणुका लांबणीवर

**पान 1 वरुन...**

दरम्यान, बांगलादेशात हिंदूंवर होत असलेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ पुकारलेल्या बंदला नाशिकमध्ये हिंसक वळण लागले. यावरही पवारांनी भाष्य केले. जे काही घडले ते राज्याच्या आणि समाजाच्या हिताचे नाही. आत शांततेची गरज असून ती प्रस्थापित करायची असेल तर समाजकारण, राजकारण या क्षेत्रातील लोकांनी याची खबरदारी घ्यायला हवी. तसेच अन्य देशात घडलेल्या गोष्टीवरून आपल्या देशातील सर्वसामान्य लोकांचे जनजीवन विस्कळीत होईल असे वागू नये, असे आवाहन शरद पवार यांनी केले.

# राष्ट्र प्रगतीपथावर नेण्यासाठी विद्यार्थ्यांनी अभ्यास करुन यश संपादन करावे - वाबळे

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

१५ ऑगष्ट १९६० साली स्थापन झालेल्या सहकार शिक्षण संस्थेचा ६४ वा वर्धापन दिन व शालांत परीक्षेत दहावी-बारावी यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव ना. म. जोशी मार्ग महापालिका शाळा, मुंबई - ११ येथे स्वातंत्र्यदिनाच्या पूर्व संध्येला करण्यात आला, त्याप्रसंगी बोलताना दैनिक शिवनेरचे संपादक व मुंबई मराठी पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष नरेंद्र वाबळे यांनीवरील उद्गार काढले.

सरस्वती देवीस पाहुण्याच्या शुभहस्ते पुष्पहार व दीप प्रज्वलन करुन, स्वागत गीत होऊन या कार्यक्रमाची सुरुवात झाली.




पाहुण्यांचा परिचय स्वागत मुख्याध्यापक वसंत भागवत यांनी शाल-श्रीफळ व षुष्पगुच्छ देऊम केला, यावेळी प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीवर वक्तृत्व, गीत आणि नृत्य केले. उपस्थित पाहुण्यांच्या शुभहस्ते दहावी - बारावी परीक्षेत अनुक्रमे पहिल्या तीन क्रमांकांने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना संस्थेच्या सदस्यांनी दिलेल्या रोख रक्कमेने गौरविण्यात आले. यावेळी संस्थेने दहावी परीक्षेत १००% यश संपादन केल्याने मासूम संस्थेच्या संस्थापिका निवृत्त आय. ए. एस्. अधिकारी निकिता केतकर यांच्यावतीने मासूम एस्. एस्. सी. विभाग प्रमुख शशिकांत गवस यांनी संस्थेचे कार्याध्यक्ष गजानन रेवडेकर, हायस्कूल अध्यापक भूषण वाक्षे व मुख्याध्यापक वसंत भागवत यांना प्रशस्तिपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविले.

याप्रसंगी अनंत सोलकर, तळवडकर सर, शशिकांत गवस, गजानन रेवडेकर, जगदीश नलावडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी संस्था पदाधिकारी खजिनदार रत्नाकर पवार, धुरी, तोरस्कर तसेच आजी-माजी विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे सुंदर सुत्र संचालन सुमित्रा ठाकुर, शरद गिरमकर आणि स्वरा वंजारे यांनी केले. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी गुंडू नाईक, प्रवीण गुंजाळ, अभिजित परब, धापूरकर यांनी परिश्रम घेतले.

**पश्चिम रेल्वे**

**विद्युत काम**

वरी. डीईई/पी/बीसीटी, पश्चिम रेल्वे, मुंबई सेन्ट्रल, मुंबई – ४००००८ निविदा सूचना क्र.: ईएल/ मेंट/८१/८६०/डब्ल्यूए/२, दिनांक: १२.०८.२०२४ मागवित आहेत. काम आणि ठिकाण: मुंबई विभाग उपनगर अनुभाग : २ वर्षांसाठी सिलिंग फन्सची स्वच्छता आणि सुरखा तपासणी आणि लाईट फिटिंग्जची स्वच्छता. कामाचे अंदाजे मूल्य: रु. ४७,१०,८००/- इरठे: रु. ९४,२००/- सादरीकरण दिनांक आणि वेळ : १२.०९.२०२४ रोजी १५:०० वा. पर्यंत. उघडण्याचा दिनांक आणि वेळ: १२.०९.२०२४ रोजी १५.३० वा. टिप: निविदा कागदपत्रे, शुद्धिपत्रक आणि अधिक तपशील डाऊनलोड करण्यासाठी कृपया आमचे संकेतस्थळ www.ireps.gov.in ला कृपया भेट द्या. ०४५५

आम्हाला लाईक करा : facebook.com/WesternRly


**पश्चिम रेल्वे**

**विविध कामे**

विभागिय रेल्वे व्यवस्थापक (डब्ल्यूए), पश्चिम रेल्वें, ६ वा मजला, अभि. विभाग, मुंबई सेन्ट्रल, मुंबई – ४००००८ मागवित आहेत: अनु. क्र.: १. ई-निविदा सूचना क्र.: बीसीटी/२४-२५/१३६ दिनांक: १३.०८.२०२४: काम आणि ठिकाण: विरार – जोरावसन अनुभाग: अतुल मेगा डेपो येथे ट्रॅक बलास्टच्या स्पष्टीकरण म्हणजेच आयएस/ आरडीएसओ-जीई/०००१:२०२३) फेब्रुवारी २०२३ किंवा आजच्या दिनांकापर्यंत अनुसार मशीन मध्ये बारीक केलेल्या ५० मिमी आकाराच्या दगडी खडीचा पुरवठा आणि खडी हूपर्समध्ये भरणे. परी.: १,००,००० सीयूएम. कांचे अंदाजे मूल्य: रु. ९,२८,४१,०००/- इरठे: रु. ६,१४,२००/- अनु. क्र.: २. ई-निविदा सूचना क्र.: बीसीटी/२४-२५/१३७ दिनांक: १३.०८.२०२४. काम आणि ठिकाण: विरार – जोरावसन अनुभाग: एडीईएन/ बीएल ह्यांच्या अनुभागाच्या अंतर्गत डुंगरी-संजाण अनुभागादरम्यान सध्याच्या स्टाफ क्वार्टर्स आणि अन्य सर्व्हिस बिल्डिंग्जची दुरुस्ती आणि रंगकाम. कामाचे अंदाजे मूल्य: रु. २,९७,६९,१६५.६० इरठे: रु. २,९८,९००/- दोन्ही निविदांच्या सादरीकरणाचा दिनांक आणि वेळ: १०.०९.२०२४ रोजी १५.०० वा. दोन्ही निविदा उघडण्याचा दिनांक आणि वेळ: १०.०९.२०२४ रोजी १५:३० वा. अधिक माहितीसाठी कृपया www. ireps.gov.in ला भेट द्या. ०४५६

आम्हाला लाईक करा : facebook.com/WesternRly

चांगली कर्म स्वत:ला बळ
देतात तसेच इतरांना चांगली
कर्म करण्याची प्रेरणाही देतात.



- प्लेटो
ग्रीक तत्त्वज्ञ






**१८-०८-२०२४ ते २४-०८-२०२४ (रविवार ते शनिवार)**

**मेष - संयम वाढवावा लागेल.**
ग्रहप्रभाव पहाता प्रतिकुल सप्ताह जाऊ शकेल.कामे करतांना संयम बराराहील.अडुन रहाण्यापेक्षा पर्यायीमार्ग शोधावा.या सर्व दिवसांत बोलतांना विचार करूनच बोलावे. कारण नसताना एखादी गोष्ट आंगलट येऊ शकते हे विस रु नये.इतरांच्या काही गोष्टी नाही पटल्या तरी त्या पटवून घ्याव्या लागतील.सध्या हो म्हणा व सोडून द्या. प्रतिक्रिया देत बसू नका.उगाचच अडून बसू नका.२२चा कर्केतला वक्री बुधबदल बरा राहील.२४चा कन्येततुन शुक्रबदल वाद टाळन्यास सुचवतो.२६चामिथुनेतला मंगळबदल बरा. व्यवसायात खरेदी विक्रीचे व्यवहार करताना भावनिक गोष्टी टाळा.नोकरदार वरिष्ठांच्या मर्जीने काम करावे.
**महिला -** वेळिच आर्थिक बचत करणे योग्य राहु शकल.उगाच कुटुंबात राग करू नका.जोडीदाराचा आदर करावा. आध्यात्मिक गोष्टीत गुंतून राहा.मानसिक शांतता जपावी.
**विद्यार्थी -** आरोग्याची काळजी घ्यावी.
**शुभदिनांक-२२-२३-२४.**

**वृषभ - समतोल राखणे बरे राहील.**
ग्रप्रभाव पहाता सप्ताहाचा पूर्वार्ध पोषक राहु शकेल.नियोजित कामे करतांना लाभाचे प्रमान वाढते राहु शकेल.कौटुंबिकस्तरावर वावरतांना बोलतांना संयम ठेवावाच लागेल.महत्वाचे निर्णय घेतांना सर्व दिवस जपून पाऊल टाकावे लागेल.एक गोष्ट लक्षात ठेवावी.जबरदस्तीने कोणती गोष्ट करायला गेलात तर कदाचित त्याचा त्रास वाढु शकतो. धीर धरलेला बरा राहील.कोणी काय करावे करू नये सल्ला देऊनका. व्यवहारात भावनिकता टाळा.बुधबदल पोषक असेल मंगळबदल लाभ वाढवील.शुक्रबदल बरा.व्यावसायिकदृष्ट्या जरा पण यशस्वी धावपळ होऊ शकेल.नोकरदार वर्ग कामकाजात बदल होऊ शकतील.
**महिला -** वायफळ खर्च कमी करावे लागतील.मुलांसाठी वेळ द्यावा लागेल.कौटुंबिक मतभेद दूर ठेवावे लागतील. जोडीदाराच्या साह्याने निर्णय घ्यावे.विचारपूर्वक वागावे.
**विद्यार्थी -** योग साधनेला महत्त्व द्या.
**शुभदिनांक-१८-१०-२०.**

**मिथुन - पोषक आठवडा जाईल.**
ग्रहप्रभाव पहाता संपूर्ण सप्ताह लाभदायक जाऊ शकेल. नियोजित कामे करतांना उत्तम यश मिळवु शकाल.गरज नसतांना उगाचच स्पष्ट बोलणे टाळलेले पोषक राहील.सध्या आपण म्हणाल ती पूर्वदिशा असणार आहे.तरिसुध्दा समोरच्याचे म्हनने ऐकून घ्यावे लागेल. कौटुंबिकस्तरावर समाधानात उत्तम वाढ होईल.चांगली स्थितीअसेल. सामाजिक कामे करतांना योग्य नियोजन घेतले जाईल.प्रतिष्ठेत चांगली वाढ होऊ शकेल.बुघबदल लाभ देईल.शुक्रबदल पोषक होऊशकेल. मंगळबदल अचानकलाभ देईल.व्यवसायात उत्तम प्रगती होऊ शकेल. नोकरदार वर्गाला कामावर पूर्णपणे लक्ष केंद्रित करावे लागेल.यश मिळेल.
**महिला -** आर्थिकविवंचना सहजतेने दूर करु शकाल.समाजसेवेची आवड राहु शकेल.मुलांची प्रगती होऊ शकेल. उपस्थितिने घरगुती वातावरण आनंदी राहु शकेल.
**विद्यार्थी -** प्रकृती उत्तम असेल.
**शुभदिनांक-१९-२०-२१.**

**कर्क - यश मिळवु शकाल.**
ग्रहप्रभावपहाता सप्ताहाचा उत्तरार्ध चांगला जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना यशाचे स्तर वाढवु शकाल.निर्णय घेतांना गोंधळुन जाऊ नका.कौटुंबिकस्तरावर वावरतांना चांगला प्रतिसाद मिळु शकेल.कोर्टकचेरितिल कामांनाचांगली गति मिळु शकेल.कदाचित मालकीहक्कही मिळु शकेल.सर्व कालावधी बर्यापैकी बरा राहील.या कालावधीमध्ये राहिलेली कामे होऊन जातील.तेव्हा त्वरेने कामे करण्याचा प्रयत्न करत चला.बुधबदल बर्यापैकी बरा राहु शकेल.शुक्रबदल यशस्वी.मंगळबदल खर्च वाढवील.व्यावसायिकदृष्ट्या केलेली गुंतवणूक फायद्याची ठरु शकेल. नोकरदार वर्ग वरिष्ठांची शाब्बासकी वेळीच मिळु शकेल.
**महिला -** शक्यतोविशेषआर्थिक चणचण भासणार नाही. घरामध्ये स्थावर मालमत्तेचा प्रश्न निकालात लागु शकेल. मालकी हक्क मिळेल. आरोग्याच्या तक्रारी दूर होतील,
**विद्यार्थी -** मनस्वास्थ्य लाभले.
**शुभदिनांक-२१-२२-२३.**

**सिंह - संघर्ष करावा लागेल.**
ग्रहसंकेत पहाताप्रतिकुल सप्ताह जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना शांततेने व वेळेत पूर्ण करावे लागतील.सर्व दिवस संघर्षाचे असतील हे विसरु नये.कोणत्याही कामाची काळजी घ्यावी.बेफिकिरी चालणार नाही.कौटुंबिकस्तरावर वावरतांना कमी बोलणेच बरे राहील जबाबदारिला झटकुन चालनार नाही.सामाजिक कामे करतांना "तोंडात साखर व डोक्यावर बर्फ" हे यशाचे सुत्र अंमलात आणा. रागावर अंकुश ठेवावालागेल.बुधबदल खर्चकमी सुचवतोय.शुक्रबदल बराअसेल. मंगळबदल लाभास चांगला.व्यवसायात आलेले प्रस्ताव भंपकच असु शकतील.नोकरदार वर्गाला घेतलेली जबाबदारी पार पाडावीच लागेल.
**महिला -** मनमानी करु चालणारनाही.काटकसर करत आर्थिक बचत करावी लागेल.नातेवाईकांच्या कार्यक्रमानिमित्त होनार्या भेटीगाठी कटाक्षाने टाळाव्या लागतील.
**विद्यार्थी -** आरोग्य सांभाळावे लागेल.
**शुभदिनांक-२२-२३-२४.**

**कन्या - दडपन झटकुन टाकावे लागेल.**
ग्रहसंकेत पहाता पूर्वार्ध सप्ताहाचा चांगला जाऊ शकेल. नियोजित कामे करतांना अविश्वास कमी करावा लागेल.तरच उत्कर्षाचे वलय मजबुत होऊ शकेल.हे सर्व दिवस तसे बर्यापैकी बरे राहु शकतील.हा कालावधी धडाडीचा राहु शकेल.विश्वासाने प्रयत्न केल्यास चांगल्या कामासाठी जास्तवेळ लागणार नाही.धावपळ आता बर्यापैकी कामी येईल. थोडीशी कामातून उसंत घेता येऊ शकेल.निर्णय बरेहोतील.बुधबदल बर्यापैकी असुशकेल.शुक्रबदल पोषक राहील.मंगळबदल समाधानात वाढ करु शकेल.व्यवसायात चाललेल्या घडामोडींत जबाबदारीने पाऊल टाका.नोकरदार वर्गाचे कामकाज सुरळीत चालू राहील.
महिला - आर्थिक नियोजन मार्गी लागु शकेल.केलेले प्रयत्न यशात हळुवारपणे परिवर्तित होऊ शकतील.कदाचित राजकीय क्षेत्रात बर्यापैकी मानाचे स्थान मिळु शकेल.
विद्यार्थी - आरोग्य बरे राहील.
शुभदिनांक-१८-१९-२०.

तूळ - लाभास पोषक आठवडा असेल.
ग्रहसंकेत पहाता संपूर्ण सप्ताह लाभदायक जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना उत्तम सफलता मिळवु शकाल.रखडलेली महत्त्वाची कामे सहज होतील.सर्वच दिवसांचा कालावधी उत्तम राहील.अचानक धनलाभ होऊ शकतील.चांगला कालावधी म्हणजे चांगल्या गोष्टी घडतात असे म्हणायला हरकत नाही.असेच चांगले वातावरण चालत आलेआहे.कोणत्याही गोष्टीसाठी संघर्ष करावा लागणार नाही.महत्त्वाची कामे पूर्ण होतील.बुधबदल सर्वस्तरावर पोषक असेल.शुक्रबदल आनंदी करेल.मंगळबदल बरा. व्यवसायात हाती घेतलेले सर्व काम तडीस नेऊ शकाल. नोकरदार वर्गाला वरिष्ठांचे सहकार्य उत्तम मिळु शकेल.
**महिला -** आर्थिक बाबतीत समाधानाची बाब राहु शकेल. कौटुंबिक वातावरण आनंदी राहु शकेल.मानसिक समाधान लाभु शकेल.मनसोक्त खरेदि करु शकाल.
**विद्यार्थी -** शारीरिकत्रास दूर होईल.
**शुभदिनांक-१९-२०-२१.**

**वृश्चिक - व्यवहार जपून करावेत.**
ग्रहसंकेतपहाता उत्तरार्ध सप्ताहाचा चांगला जाऊ शकेल.नियोजितकामे करतांना चिडचिड करु नका.दिवस जरासे ताणतणावाचे असतील. ताणतणाव घेऊन कोणतीही गोष्ट साध्य होणार नाही.हे विसरु नये. त्यातून पर्यायी मार्ग काढणे खूप गरजेचे राहील.एकघाव दोनतुकडे करून चालणार नाही.शांतमार्गाने गोष्टी हाताळाव्या लागतील.सकारात्मक विचार करायची तयारी ठेवावी लागेल.म्हणजे नुकसान होणारनाही. बुधबदल चांगला राहु शकेल.शुक्रबदल बर्यापैकी बरा राहु शकेल. मंगळबदल कामे करु शकेल.व्यवसायात आवक-जावक बर्यापैकी बरा राहु शकेल.नोकरदार वर्ग कामातील तांत्रिक अडचणी दूर होऊ शकतील.
**महिला -** आर्थिक व्यवहार जपून केलेले बरे राहु शकेल. समाजमाध्यमांचा वापर जेवढ्यास तेवढा करत चला.जोडीदाराचीसाथ मिळु शकेल.सकारात्मक विचारांवर भर द्या.
**विद्यार्थी -** उत्साह वाढेल.
**शुभदिनांक-२१-२२-२३.**

**धनू - सहनशीलता वाढवावी.**
ग्रहबळ पहाता प्रतिकुल सप्ताह जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना रागावर नियंत्रण ठेवणे बरे राहु शकेल.सप्ताहातील हे सर्व दिवस कसे संयमाने घालवता येतील ते पाहाणे उचीत ठरेल.काही गोष्टी तुमच्या मनाविरोधी घडू शकतात.रागाचा पारा अचानक चढू शकतो. नुकसानही होऊ शकते.एक गोष्ट लक्षात ठेवावे.आपण शांत राहणे खूप गरजेचेअसते.शांत राहिलात तर नुकसान होणार नाही.सहनशीलता वाढवा.बुधबदल सोम्यआहार सुचवतोय. शुक्रबदल आळस वाढवील. मंगळबदल बरा राहु शकेल. व्यवसायात नियोजन यशस्वी करण्यासाठी धावपळ होईल.नोकरदार स्विकारलेल्या कामात व्यस्त राहावे लागेल.
**महिला -** फालतु खर्च वेळीच कमी करावे लागतील.जोडीदाराचा सल्ला घ्यावा लागे.आध्यात्मिक गोष्टीत गुंतून राहावे लागेल.नियमीत उपासनेवर वेळिचभर द्यावा लागेल.
**विद्यार्थी -** शारीरिक स्वास्थ्य जपा.
**शुभदिनांक-२२-२३-२४.**

**मकर - यशाचे गणीत जुळुन येईल.**
ग्रहबळ पहाता सप्ताहाचा पूर्वार्ध चांगला जाऊ शकेल. नियोजित कामे करतांना बर्यापैकी सफलता मिळु शकेल.यास्पाहात सर्व दिवसांचा कालावधी तसा बर्यापैकी बरा राहु शकेल.कौटुंबिकस्तरावर वावरतांना असे वातावरण आले आहे.तेव्हा उगाचच वेळ घालवु नका.त्याचा पुरेपूर वापर करून घ्यावा.जेकाम करायचे आहे आणि ते पूर्ण होत नाही त्याचा श्रीगणेशा आता करायला हरकत नाही.सध्या तुमचे काम बर्या पैकी होणार आहे.बुधबदल पोषक.शुक्रबदल भाग्यास बरा. मंगळबदल वाद टाळन्यास सुचवतो.व्यवसायातून अपेक्षेपेक्षाही बरे प्रमाणात उत्पन्न मिळेल. नोकरदार वर्गाचीं कामे वेळेतच पूर्ण होऊ शकतील.
**महिला -** आर्थिक अडचण तितकिसी जाणवणार नाही. कदाचित राजकीय क्षेत्रात प्रतिष्ठा वाढु शकेल.नातेवाईकांशी जिव्हाळा वाढेल.मानसिक तणाव कमी होईल.
**विद्यार्थी -** आरोग्य मध्यम राहील.
**शुभदिनांक-१८-१९-२०.**

**कुंभ - यशस्वी आठवडा जाईल.**
ग्रहबळ पहाता संपूर्ण सप्ताग लाभदायक जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना अनुकूल वातावरण असु शकेल.हा कालावधी उत्तम राहु शकेल.वरिष्ठांची चांगली मदत मिळु शकेल.कामाव्यतिरिक्त इतर गोष्टीत लक्ष घालायला वेळ मिळणार नाही.सर्व कामे साध्य होणार आहे. दुसऱ्याने केलेले मार्गदर्शन मोलाचे ठरणारआहे.कौटुंबिकस्तरावर वावरतांना आनंदीआनंद चोहिकडे असेअनुभव मिळु शकतील. प्रतिष्ठा वाढेल.बुधबदल वादापासुन दूरता सुचवतोआहे.शुक्रबदल लाभ वाढवील.मंगळबदल पोषक असेल. व्यवसायात लाभाचे प्रमाण उत्तम राहु शकेल.नोकरदार वर्ग काम करताना कोणतीही तडजोड स्वीकारु नका.
**महिला -** दडपन जाणवणार नाही.आर्थिक सफलता मिळु शकेल.राजकीय क्षेत्रात महत्त्वाच्या गोष्टीवर चर्चा होईल. घरगुती वलयअनुकूल असेल.मानसिक समाधान लाभेल.
**विद्यार्थी -** प्रकृती ठणठणीत असेल.
**शुभदिनांक-१९-२०-२१.**

**मीन - बर्यापैकी पोषक सप्ताह.**
ग्रहबळ पहाता सप्ताहाचा उत्तरार्ध चांगला जाऊ शकेल.
नियोजित कामे करतांना समाधानात हळुहळु वाढ होऊ शकेल.या सर्व दिवसांत निर्णय घेताना विचार करुन घेणे बरे राहील.घाईने निर्णय घेऊ नका.ज्या गोष्टीतून मनस्ताप होणार आहे तिथे शांतराहणे सर्वात उत्तम राहील.स्वत:च्या कामाची जबाबदारी इतरांवर टाकू नका.चांगल्या गोष्टींसाठी उशीर झाला तरी चालेल.हे ब्रीदवाक्य ध्यानी ठेवावे लागेल. तसा हा कालावधीही बरा असेल.बुधबदल पोषक असेल.शुक्रबदल पोषक.मंगळबदल बरा असेल. व्यवसायातून बर्यापैकी मनासारखे उत्पन्न मिळु शकेल.नोकरदार वर्गकदाचित अधिकार प्राप्ती होऊ शकेल.
**महिला -** आर्थिकप्रश्न बर्यापैकी मिटु शकल.कुटुंबात असणारे मतभेद दूर होण्यासाठी प्रयत्न वाढवावे लागतील.नातेवाईकांच्या सुखदु:खात सहभागी व्हावे लागेल.
**विद्यार्थी -** प्रकृती जपत चला.
**शुभदिनांक-२१-२२-२३.**

# भारत विरोधी शेजारी ; भारताची नवी डोकेदुखी

चीन, पाकिस्तान, नेपाळ, म्यानमार, बांगलादेश, श्रीलंका, अफगाणिस्तान, म्यानमार हे भारताचे सख्खे शेजारी देश आहेत. मात्र मागील काही वर्षात हे सर्व देश अस्थिरतेच्या कचाट्यात सापडले आहेत. यातील पाकिस्तान आणि चीन हे आपले पारंपरिक शत्रू आहेत तर उर्वरित देश हे भारताचे मित्र देश राहिले आहेत. या देशाचे भारताशी कायम सौहार्दाचे संबंध राहिले आहेत मात्र गेल्या काही वर्षापासून या देशांशी भारताचे खटके उडत आहे कारण या देशात सध्या जे सरकार अस्तित्वात आहे ते प्रखर राष्ट्रवादी सरकार असून ते चीनच्या कच्छपी लागून भारताला त्रास देण्याचे काम करत आहेत. या सर्व देशात सध्या भारत विरुद्ध वातावरण असून तेथील नागरिकांमध्ये जाणीवपूर्वक भारत विरोधी प्रचार केला जात आहे जेणेकरून तेथील नागरिकांमध्ये भारत विरोधी भावना निर्माण व्हावी. मालदीव हा देश तसा पाहिला तर शांत देश. अवघी चार कोटी लोकसंख्या असलेल्या या देशाची अर्थव्यवस्था पर्यटनावर चालते विशेष म्हणजे मालदीवला जाणारे ७० टक्के पर्यटक हे भारतीय असतात यावरून त्यांची अर्थव्यवस्था भारतावर अवलंबून आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही असे असतानाही मालदीवने इंडिया आऊट हे धोरण अवलंबले त्यामुळे मालदीव आणि भारत यांच्या संबंधात मिठाचा खडा पडला. नेपाळ हा भारताचा असाच एक सख्खा शेजारी देश. जगातला एकमेव हिंदू देश असलेल्या नेपाळशी भारताचे मागील काही शतकांपासून सौहार्दाचे संबंध. दोन्ही देशाची संस्कृती जवळपास सारखीच. असे असतानाही त्या देशात सध्या अस्तित्वात असलेल्या के पी ओली सरकारने भारत विरुद्ध भूमिका घेऊन सीमावाद उकरून काढत भारताला त्रास देण्याचा प्रयत्न केला. के पी ओली हे पूर्वी पंतप्रधान असताना त्यांनी कायम भारत विरोधी भूमिका घेतली आहे. के पी ओली हे चीन समर्थक आहेत हे जगजाहीर आहे. ते कायम चीनची बाजू घेतात. ते चीनच्या हातचे बाहुले आहेत असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

म्यानमार या भारताच्या शेजारील देशात सध्या लष्कराचे राज्य असून तेथील लष्कर भारताच्या विरोधात आहे कारण भारताने कायम लष्करशाहीला विरोध करून लोकशाहीला पाठिंबा दिला आहे. तेथे लोकनियुक्त सरकार स्थापन व्हावे अशीच भारताची भूमिका आहे. हीच भूमिका तेथील लष्करशाही सरकारला मान्य नाही. श्रीलंका हा देखील भारताचा मित्र असलेला शेजारी देश. भारत आणि श्रीलंका यांचे संबंध देखील पूर्वीसारखे राहिले नाहीत. आज बांगलादेशची अवस्था झाली होती तीच अवस्था अडीच वर्षापूर्वी श्रीलंकेची झाली होती. श्रीलंकेत देखील भयानक अराजकता पसरली होती. तिथे ही सरकारच्या विरोधात उठाव झाल्याने तेथील राज्यकर्त्यांनात देश सोडून पळून जावा लागले होते. श्रीलंकेत आता अस्तित्वात असलेले सरकार हे देखील चीन धार्जिणे आहे. पाकिस्तान आणि अफगाणिस्तान बद्दल तर न बोललेलेच बरे कारण पाकिस्तान हा आपला शत्रूच आहे तर अफगाणिस्तान मध्ये अतिरेक्यांचे तालिबान सरकार आहे. भारताच्या शेजारी देशांपैकी बांगलादेश हाच कायम भारताच्या बाजूने उभा राहणारा देश होता. बांगलादेशच्या निर्मितीत भारतानेच महत्वाची भूमिका बजावली होती. वंगबंधू मुजिबिर रहेमान हे भारताचे मित्र होते. त्यांना बांगलादेशचे राष्ट्रपिता म्हंटले जाते. त्यांचीच कन्या असलेल्या शेख हसीना या गेल्या अनेक वर्षापासून बांगलादेशच्या पंतप्रधान होत्या. भारताशी त्यांनी कायम मैत्रीचे संबंध ठेवले. भारत - पाकिस्तान आणि भारत - चीन संबंधात त्यांनी कायम भारताची बाजू घेतली. बांगलादेशात अल्पसंख्यांक असलेल्या हिंदू समाजाला संरक्षण देण्याचीच त्यांची भूमिका राहिली आहे त्यामुळेच तेथील कट्टर पंथीयांच्या हीटलिस्टवर त्या होत्या. त्यांचे सरकार उलथून लावण्यासाठी ते प्रयत्नशील होते. त्यासाठी ते संधीच शोधत होते त्यांच्या या प्रयत्नांना लष्कराची ही साथ होती. अखेर त्यांनाही संधी मिळाली ती विद्यार्थ्यांच्या आरक्षण विरोधी आंदोलनामुळे. बांगलादेशात स्वातंत्र्य सैनिकांच्या वारसांना तीस टक्के आरक्षण होते. हे आरक्षण रद्द करावे अशी विद्यार्थी वर्गाची मागणी होती.

विद्यार्थी वर्गाची ही मागणी शेख हसीना यांनी मान्य देखील केली होती मात्र तेथील सुप्रीम कोर्टाने आरक्षण कायम ठेवले मात्र त्याची टक्केवारी कमी केली. हा कोर्टाचा निर्णय असूनही विद्यार्थी वर्गाला सरकार विरोधात चिथवण्यात आले. या आंदोलनामध्ये पाकिस्तानच्या आय एस आय या गुप्तचर यंत्रणेचा हात होता हे आता उघड झाले आहे. विद्यार्थ्यांचे आंदोलन आरक्षण विरोधी असले तरी त्यांच्या मनात भारत विरोधी रोष निर्माण करण्यात आला. शेख हसीना या भारत सरकारच्या हातचे बाहुले असून त्या भारताच्या इशाऱ्यावर सरकार चालवत आहे असा फेक नॅरेटिव्ह पसरवण्यात आला. या आंदोलनात मुस्लिम कट्टर पांथियांचा अधिक भरणा होता त्याच कट्टरपंथीयांनी बांगलादेशातील हिंदूंना टार्गेट केले. हिंदूंच्या घरात घुसून हिंदूंना मारले. तेथील विद्यार्थी वर्गात तसेच आंदोलकांमध्ये जाणीवपूर्वक भारत विरोधी वातावरण निर्माण करण्यात आले. आता नोबेल पुरस्कार विजेते मोहंमद युनूस यांनी अंतरिम सरकारच्या पंतप्रधान पदाची सूत्रे हाती घेतली असली तरी ते काही काळापुरतेच पंतप्रधान राहतील त्यानंतर तिथे बेगम खालिदा झिया या पंतप्रधान होतील अशी चिन्हे आहेत. बेगम खालीदा झिया या भारत विरोधी असून त्या पंतप्रधान असताना त्यांनी कायम चीनची बाजू उचलून धरली आहे. भारताच्या शेजारी देशांना अस्थिर करून तिथे आपल्या मर्जीचे सरकार आणण्याचे चीनचे धोरण आहे त्यात ते यशस्वी ठरत आहे. भारतासाठी ही मोठी डोकेदुखी आहे. आताचा भारत हा १९६२ चा भारत नाही त्यामुळे भारताशी युद्ध करण्यापेक्षा भारताच्या शेजारी असलेल्या देशांना साम, दाम, दंड, भेद या मार्गाने आपल्याकडे वळवून त्यांचा वापर भारत विरोधी कारवाया करण्यासाठी करायचा हा चीनचा हेतू आहे. भारत सरकारने याचा गांभीर्याने विचार करावा. शेजारील राष्ट्रात भारत विरोधी भावना असलेले सरकार अस्तित्वात येणे भारतासाठी नवी डोकेदुखी आहे. भारताच्या सुरक्षेच्या दृष्टीने ही मोठी गंभीर बाब आहे.

- श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे

## पत्र मानस

### भगिनींनो.... स्वत:चे रक्षण स्वत:च करूया !

रक्षाबंधनाच्या एक आठवडा आधीपासून बाजारपेठा रंगीबेरंगी राख्यांच्या स्टॉल्सने सजल्या आहेत. रक्षाबंधनच्या दिवशी बहीण आपल्या भावाला राखी बांधून त्याच्याकडून तिच्या रक्षणाचे वचन घेते. त्रेतायुगापासून सुरु असलेल्या या प्रथेला बंधू भगिनीमधील अतूट प्रेमाची झालर आहे. काळ बदलला तशी स्त्री अधिकाधिक असुरक्षित होत गेली आहे. आज स्त्रियांवरील अत्याचाराच्या घटना प्रतिदिन आपल्याला वर्तमानपत्रांतून वाचायला मिळतात. गेल्या काही वर्षांत स्त्रियांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. कोणत्याही स्त्रीवर प्रतिकूल प्रसंग कधी ओढवेल, ही वेळ सांगून येत नाही. अशा प्रत्येक कठीण प्रसंगी आपला भाऊ किंवा पोलीस आपले रक्षण करण्याकरिता उपलब्ध असतीलच असे नाही. यासाठी प्रत्येक स्त्रीने प्रतिकूल प्रसंगात आपले रक्षण कसे करावे, याचे सामान्य प्रशिक्षण घेणे अत्यावश्यक बनले आहे. स्व संरक्षण प्रशिक्षणाने केवळ शारीरिक नव्हे, तर मानसिक बळही वाढते. आजची स्त्री भौतिकदृष्ट्या उत्तुंग शिखरे पादाक्रांत करत आहे; मात्र समाजाची ढासळलेली नीतिमत्ता यामध्ये अडथळा ठरत आहे. अशा समाजाला तोंड देण्यासाठी मन आणि शरीर सामर्थ्यवान करण्याची आज नितांत गरज आहे. त्यामुळे यंदाच्या रक्षाबंधन सणाला भावाला राखी बांधताना 'मी स्वतः माझे रक्षण करण्यास समर्थ आहे' असे ठासून सांगूया !

**- मोक्षदा घाणेकर, काळाचौकी**

### निवडणुका एकत्र का होत नाहीत?

जम्मू-काश्मीरसह हरियाणा विधानसभा निवडणुका सप्टेंबर व १ ऑक्टोबरच्या सुरुवातीला होणार आहेत? महाराष्ट्राच्या नोव्हेंबरमध्ये होण्याची शक्यता निवडणूक आयोगाने दिली आहे. झारखंड, महाराष्ट्र,जम्मू काश्मीर आणि हरियाणा राज्याच्या निवडणुका एकत्र का केल्या नाहीत? संपूर्ण देशाच्या लोकसभेच्या निवडणुका एकत्र झाल्या होत्या.तर या चार राज्यांच्या निवडणुका एकत्र का होत नाहीत? जम्मू-काश्मीर दहशतवादी कारवाया होत असल्या तरीही निवडणुका होणार आहेत.तर निवडणूक आयोगाचे बरेचसे काम पाऊस असल्याने महाराष्ट्र राज्यात बाकी असल्याचे कारण निवडणूक आयोग देत आहे. जम्मू-काश्मीर सह हरियाणा विधानसभा निवडणुकांच्या निकालाचा परिणाम महाराष्ट्र राज्याच्या मतदानावर होण्याची शक्यता आहे.राज्यातील निवडणूक पुढे ढकलण्याचे मुख्य कारण कोणते? सत्ताधारी सरकारची कामे शिल्लक राहीली असल्याने निवडणूक लांबणीवर जाणे हे सत्ताधारी पक्षाच्या फायद्याचे आहे का?

**- विवेक तवटे , कळवा ,ठाणे**

### के/पूर्व मनपा कार्यालयात ई.डी. व लाचलूचपत विभागाची कार्यालये सुरु करावी

अंधेरी पूर्व भागातील के पूर्व विभाग कार्यालयातील वाढता भ्रष्टाचार पहाता शासकीय कार्यालयेही त्या पुढे फीकी पडू लागली आहेत असे वाटू लागले आहे. के/पूर्व कार्यालयात गत ५ सलात एकूण ३ लाचखोरीच्या प्रकरणात अधिकारी रंगेहात पकड़ले गेले आहेत. तेही तक्रारी करण्यात आल्या म्हणून पण तक्रारी करण्यात येत नसलेल्या किती घटना घडत असाव्यात याची कल्पना यायला काहीच हरकत नाही.लाचखोरीत सदर विभाग पुढे आहे.आताचे प्रकरण तर सर्व रकमा हद्द पार करणारे आहे. या विभागातील इमारत खात्यातील सहाय्यक अभियंता मंदार अशोक तारी यांनी त्यांच्या वतीने लाचार्थी नामे महम्मद शेख व प्रतीक पिसे यांना ठरलेल्या २ कोटी लाचेच्या रकमे पैकी पहिला ७५ लाख रकमेचा लाचलाभ घेताना रंगेहाथ पकडण्यात आले. गुन्ह्यातील अहवालात २ कोटी रकमेचा उल्लेख पहाता संताप अनावर होतो.या रकमेत किती विधायक कामे झाली असती?लाचेची रक्कम पहाता सदर प्रकरण किती गंभीर व हद्द ओलांडणारेअसेल? या लाच प्रकरणात अहवालात नमूद असलेल्या गुन्हेगारांच्या व्यतिरिक्त आणखी किती वरिष्ठ असतील? गेल्या अड़ीच वर्षात पालिकेत विकास निधी अपुरा असल्याने सार्वजनिक कामे होत नाहीत, लोक त्रस्त झाले आहेत. सोमवार व शुक्रवार अभ्यागत भेटी वेळी कार्यालय प्रमुख उपस्थित नसतात,या खात्यातील स्वयंचालित दरवाजा हा डोकेदुखी ठरला आहे.एकाही अधिकाऱ्यांच्या दालना समोर नामफलक नाही,माहिती अधिकार अधिकाऱ्यांकडून उत्तरे समर्पक दिली जात नाहीत. अपील केल्यावरही उत्तरे ठीक नसतात या सर्व बाबीमुळे सामान्य तक्रारदार भयंकर वेदनेतून जात आहेत.सदर लाचखोरी प्रकरण पालिका आयुक्तांनी अति गंभीर म्हणून घ्यावे.तसेच हरएक मनपा कार्यालयात ई डी व लाचलूचपत लघु कार्यालय सुरु करावे त्याची सुरवात के/पूर्व पासून करावी.

**- सदानंद वसन्त साटम, अंधेरी पूर्व**

## दिव्यात भव्य आरोग्य शिबीर उत्साहात संपन्न

**दिवा :** भारतीय जनता पार्टीचे श्री नंदू परब (कल्याण जिल्हा सरचिटणीस, कल्याण ग्रामीण विधानसभा निवडणूक प्रमुख) यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच दिवा-शीळ मंडळ अध्यक्ष सचिन भोईर यांच्या नेतृत्वात भाजप युवा मोर्चा ठाणे शहर जिल्हा सरचिटणीस डॉ. सतीश केळशीकर यांच्या आयोजनाने व ममता मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल (दिवा) यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. प्रसंगी मोफत मेडीकल आणि हेल्थ चेकअप कॅम्प आयोजित करण्यात आला आहे. प्रसंगी हृदयरोग सल्ला व तपासणी (ECG), आस्थिरोग सल्ला व तपासणी, मधुमेह सल्ला व तपासणी, पोटाचे विकार सल्ला व तपासणी, स्त्रीरोगतज्ञ विषयक सल्ला व तपासणी करण्यात आले. मधुमेहचे औषधे मोफत दिली गेली. प्रसंगी असंख्य लोकांनी आपला सहभाग नोंदवला असून संपूर्ण शारीरिक तपासणी आरोग्य शिबीरात मोफत करण्यात आली.



## महत्त्वाचे

### मर्सिडीज कारची पादचाऱ्याला धडक, तीघे जखमी

**पनवेल :** मर्सिडीज कारने पादचाऱ्याला धडक दिल्याने तो स्कुटीवर जाऊन आदळला आणि स्कुटीवरून दोघे खाली पडले त्यात दोघेजण गंभीर जखमी झाले आहेत. त्यानंतर मर्सिडीज कार चालक पळून गेला. या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. युवराज दिवे हे तळोजा फेस टू येथे राहत असून ते खारघर पोलीस ठाण्यात पोलीस शिपाई आहेत. 15 ऑगस्ट रोजी दुपारी एमडीटी वर कॉल पडला की सायन पनवेल हायवे वर रेल्वे स्टेशनच्या समोर स्काय वॉक खाली खारघर येथे अपघात झाला आहे. त्या ठिकाणी पाहणी केली असता पांढऱ्या रंगाच्या मर्सिडीज कारचालकाने भरधाव वेगाने व वेगाने कार चालवून एका पादचाऱ्याला जोराची धडक मारली. हा इसम धडक मारल्याने एक्टिवा स्कुटीवर जाऊन आदळला व स्कुटी वरील सदाम शेख व त्याची पत्नी खाली पडून ते जखमी झाले. त्यांना एमजीएम हॉस्पिटल कामोठे येथे नेण्यात आले. या प्रकरणी मर्सिडीज कारचालका विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

### महात्मा फुले महाविद्यालयात गांधी विचार परिक्षेत यश

**पनवेल :** पनवेल येथील महात्मा फुले कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी गांधी रिसर्च फाउंडेशन तर्फे घेण्यात आलेल्या गांधी विचार संस्कार परीक्षा २०२३-२४ मध्ये यश संपादन केले. इयत्ता अकरावीमध्ये कु. जगताप श्रुती प्रभू (जिल्ह्यात प्रथम - सुवर्ण पदक ), कु.पाटील जान्हवी मधुकर ( जिल्ह्यात द्वितीय - रौप्य पदक ), कु.मोकल नेत्रम अनिल ( जिल्ह्यात तृतीय - कांस्य पदक ) तसेच इयत्ता बारावीमध्ये कु.मुखर्जी मनाली प्रद्योत ( जिल्ह्यात प्रथम - सुवर्ण पदक ), कु.पाटील सोहम सुरेश ( जिल्ह्यात द्वितीय - रौप्य पदक ), कु.यादव आरुषी स्वामिनाथन ( जिल्ह्यात द्वितीय - रौप्य पदक) मिळाले. गांधी विचार संस्कार कमिटीच्या चेअरमन नावडकर आर.ए. , सदस्य वाघे एम.एस, .कनोजा.एच.सी.व मदने ए.एस. यांनी विद्यार्थ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन केले. या सर्व विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गणेश ठाकूर, उपप्राचार्य डॉ.आर.ए.पाटील , डॉ.एन.बी.पवार, ज्युनिअर विभाग सायन्स इन्चार्ज .एस. आर.काटकर व आर्ट्स - कॉमर्स इन्चार्ज डॉ.व्ही.एस.विशे.यांनी अभिनंदन केले.

### इनॉर्बिट मॉलसह 26 मॉल्समध्ये बॉम्ब ठेवल्याची धमकी

**नवी मुंबई :** नवी मुंबईतील वाशी रेल्वे स्थानकाजवळ असलेल्या इनॉर्बिट मॉल आणि पनवेलमधील ओरीयन मॉलसह एकूण 26 मॉलमध्ये बॉम्ब ठेवल्याची धमकी पोलिसांना ई-मेल द्वारे मिळाली होती. या धमकीमुळं सर्वत्र एकच खळबळ उडाल्याचं बघायला मिळालं. मॉलमध्ये खरंच बॉम्ब आहे की नाही याची माहिती नसल्यामुळं सावधगिरीचा उपाय म्हणून दोन्ही मॉल्स रिकामे करण्यात आले. मात्र, तपासणीदरम्यान वाशीच्या इनॉर्बिट मॉलमध्ये कोणत्याही प्रकारच्या संशयास्पद वस्तू आढळून न आल्यानं, मॉल पुन्हा सुरू करण्यात आला. 12 वाजेच्या सुमारास इनॉर्बिट मॉलच्या मेल आयडीवर 'हॅलो, मी या बिल्डिंगमध्ये बॉम्ब पेरलेत. इमारतीतील प्रत्येक व्यक्तीला मारलं जाईल' अशा आशयाचा मेल पाठवण्यात आला होता.

# रामगिरी महाराजांकडून मुद्दामहून शब्द वदवून घेण्यात आले, हा खेळ महाराष्ट्राला जाळून टाकेल...

## जितेंद्र आव्हाडांचा गंभीर इशारा

**प्रतिनिधी**
**■ ठाणे**

महाराष्ट्रातील धार्मिक तसेच सामाजिक स्वास्थ्य त्यानिमित्ताने हे सत्ताधारी बिघडविण्याचा प्रयत्न करीत आहेत, हे आता लपून राहिलेले नाही. हा खेळ आता महाराष्ट्राला जाळून टाकेल. रामगिरी महाराजांकडून मुद्दामहून शब्द वदवून घेण्यात आले असा खळबळजनक आरोप शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे. महंत रामगिरी महाराज यांनी केलेल्या विधानाबद्दल जितेंद्र आव्हाड यांनी ट्विट केले आहे.

जितेंद्र आव्हाड यांनी आपल्या ट्विटमध्ये राज्य सरकारवर गंभीर आरोप केले आहेत. "काल महंत रामगिरी महाराज यांनी प्रेषित मोहम्मद पैगंबर यांना अपमानित करणारे, त्यांचे चारित्र्य हनन करणारे विधान मुद्दामहून केले, असे माझे मत आहे. कारण, कोणत्याही महंताने कोणत्याही प्रेषिताबाबत असे उद्गार काढणे अशक्य आहे. महाराष्ट्राच्या संतपरंपरेत तुम्ही कोणत्याही संतसाहित्य उघडून बघा; संतांच्या अभंगांचे पुस्तक उघडून बघा; संत



कबीर, संत रविदास, जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांची पुस्तके उघडून बघा, तुम्हाला कुठेही धर्मद्वेष दिसणार नाही. किंबहुना, या सर्वांची शिकवणच होती की,सर्व धर्मांनी एकत्र राहिले पाहिजे. असे असताना महंत रामगिरी हे ज्या पद्धतीने बोलले आहेत; त्याकडे पाहता , हे शब्द मुद्दामहून त्यांच्याकडून वदवून घेण्यात आले, असेच होते", असे जितेंद्र आव्हाड यांनी म्हंटले आहे.

पुढे ते म्हणाले आहेत की, "मी जे म्हणतोय त्याला अर्थ आहे. कारण, मागे स्वतः मुख्यमंत्री बसलेले असताना, हे महंत एवढे बोलण्याची हिमंत दाखवत असतील तर त्यामागे नक्कीच काहीतरी कारण असू शकते. ते जाऊ द्या ! पण, महाराष्ट्रातील धार्मिक तसेच सामाजिक स्वास्थ्य त्यानिमित्ताने हे सत्ताधारी बिघडविण्याचा प्रयत्न करीत आहेत, हे आता लपून राहिलेले नाही. हा खेळ आता महाराष्ट्राला जाळून टाकेल; महाराष्ट्राचे सामाजिक स्वास्थ्य पूर्णपणे बिघडवून टाकेल अन् हा खेळ महाराष्ट्राला परवडणार नाही. सत्ता येते अन् जाते. पण, एकदा मने दुभंगली की ती जोडता - जोडता आयुष्य निघून जाते. या द्वेषाच्या राजकारणापासून आपण सर्वांनीच लांब रहायला हवे", असा आरोप जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे

अहमदनगर आणि औरंगाबाद या दोन्ही जिल्ह्याला खेटून गोदावरी नदी किनाऱ्यावरील सराला बेट या ठिकाणी संत गंगागीर महाराजांचा मठ आहे. लोकजागृतीच्या उद्देशाने साधारण दीडशे, पावणे दोनशे वर्षांपासून दरवर्षी वेगवेगळ्या ठिकाणी अखंड सप्ताहाचे आयोजन केले जाते. या सप्ताहादरम्यान लाखो लोक उपस्थित असतात. महाराष्ट्रभर मठाच्या अनुयायांचे मोठे जाळे आहे. गंगागिरी महाराज यांचे निधन झाल्यानंतर कीर्तनाची ही परंपरा त्यांच्या शिष्यांनी पुढे सुरू ठेवली. साधारण पंधरा वर्षांपासून रामगिरी महाराज मठाधिपती म्हणून कामकाज पाहत आहेत.

महंत रामगिरी महाराज यांनी मोहम्मद पैगंबर यांच्याबद्दल वादग्रस्त व्यक्तव्य केले होते. या वक्यव्यानंतर छत्रपती संभाजीनगर आणि अहमदनगर जिल्ह्यात लोक रस्त्यावर उतरले होते. यावेळी या आंदोलकांनी रामगिरी महाराज यांच्या अटकेची मागणी केली होती. तसेच काही ठिकाणी दगडफेकीच्या घटनाही घडल्या होत्या. त्यामुळे त्यांच्यावर अनेक ठिकाणी गुन्हा दाखल झाला आहे.

## बदलापुरात तीन वर्षांच्या दोन मुलींवर शाळेतच अत्याचार; आरोपी अटकेत

**प्रतिनिधी**
**■ बदलापूर**

बदलापूर शहरातील पूर्वेत असलेल्या एका नामांकीत शाळेत अवघ्या तीन वर्षांच्या दोन मुलींवर लैंगिक अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. पालकांच्या हा प्रकार लक्षात आल्यानंतर त्यांनी शाळा आणि पोलिसात धाव घेतली. पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यास मोठा वेळ घेतल्याने पालकांत संतापाचे वातावरण आहे. याप्रकरणी आरोपीला अटक करण्यात आली आहे. मात्र या प्रकारानंतर शाळेतील पालककांच्या मनात भितीचे वातावरण आहे.

बदलापूर पूर्वेतील एक नामांकीत शैक्षणिक संस्थेत हा प्रकार घडल्याने एकच खळबळ उडाली आहे. शाळेतील छोट्या शिशु वर्गात शिकणाऱ्या तीन वर्षांच्या दोन मुलींसोबत हा प्रसंग घडला. एका मुलीने आपल्या पाल्यांना शाळेतील दादा नावाने परिचीत असलेल्या एका व्यक्तीने आपल्या गुप्तांगाला हात लावल्याची माहिती दिली. त्यानंतर पालकांनी त्या मुलीच्या वर्गातील दुसऱ्या मुलीच्या पालकांना याबाबत कळवले. त्यांना संशय आल्याने त्यांनी आपल्या मुलीला बदलापूर पूर्वेतील एका रूग्णालयात तपासणीसाठी नेले. या तपासणीनंतर रूग्णालयाने त्यांना अत्याचार झाल्याबाबत दुजोरा दिला. त्यानंतर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पदाधिकारी आणि पालकांनी पोलीस ठाण्यात धाव घेत याबाबत तक्रार दिली. मात्र बदलापूर पूर्व पोलिसांनी गुन्हा दाखल करण्यात मोठा वेळ घेतल्याचा आरोप पालकांनी केला आहे. अखेर याप्रकरणी १६ ऑगस्ट रोजी रात्री दहाच्या सुमारास अनोळखी इसमाविरूद्ध गुन्हा दाखल केला.

## कळंबोली सर्कलवर शॅम्पूचा कंटेनर पलटी

### एका महिलेचा मृत्यू; अनेक गाड्यांना अपघात

**प्रतिनिधी**
**■ पनवेल**

कळंबोली सर्कलवर शाम्पू ने भरलेला ट्रक कंटेनर वर आदळल्यामुके पलटी होवून ट्रक मधील शाम्पू रस्तावर पडून या रस्त्यावरून जाणारी स्कूटी घसरली. या स्कूटी वरील महिलेला मागून येणाऱ्या एस टी बसने धडक दिल्याने तिचा मृत्यू झाला. यावेळी चार पाच वाहने घसरून अपघात झाले यात कोणीही जखमी झाले नाहीत

कळंबोली वाहतूक शाखेच्या हद्दीमध्ये १७ ऑगस्ट रोजी सकाळी 06 ते 07 च्या दरम्यान एक कॉइल भरलेला ट्रक क्र. MH46AF3666 व दुसरा टँकर क्र.MH06AQ6609 ज्यामध्ये साबण शाम्पू बनविण्याचे कच्चे लिक्विड असे दोन्ही ट्रक मुंब्रा वरून जेएनपीटी कडे जात असताना शाम्पू लिक्विड भरलेल्या टँकर चालकाचे सर्कल या ठिकाणी आल्यानंतर नियंत्रण सुटल्याने सदर कंटेनर हा कॉईल च्या कंटेनर जाऊन धडकला व एका बाजूला पलटी झाला. सदर अपघातामध्ये कोणीही जखमी झाले नाही परंतु लिक्विड सोप चे केमिकल संपूर्णपणे रस्त्यावर पडल्याने वाहनाचे टायर द्वारे ते संपूर्ण आजूबाजूच्या परिसरात पसरल्याने वाहने घसरून अपघात घडण्याच्या घटना घडल्या होत्या.




त्याचदरम्यान सदर लिक्विड हे पनवेल बाजूकडील लेनवरही पसरलेले असल्याने सदर ठिकाणी सकाळी 7.30 वा सुमारास एका स्कुटी चालक (MH46BR2941) महिलेची दुचाकी घसरून अपघात झाला. तिला बसची ठोकर लागल्याने सदर महिला ही गंभीर जखमी झाली होती तिला पुढील उपचारासाठी पनवेल उपजिल्हा रुग्णालय या ठिकाणी पाठविण्यात आले होते. परंतु डॉक्टरांनी त्यांना मयत घोषित केले आहे.

## धर्मांतराविरूद्ध उल्हासनगरात मोर्चा

### मराठी मुलीच्या धर्मातर प्रकरणानंतर संघटना एकटवल्या




**प्रतिनिधी**
**■ उल्हासनगर**

उल्हासनगरात झालेल्या हिंदू धर्मांतराच्या घटनेनंतर शनिवारी सकल हिंदू समाजाच्या वतीने शहरात भव्य मोर्चा काढण्यात आला. कैलास कॉलनी, समता नगर येथून तहसीलदार कार्यालयापर्यंत काढण्यात आलेल्या या मोर्चात मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते. मोर्चात हिंदू धर्मांतराच्या घटनांविरोधात तीव्र निषेध नोंदवण्यात आला. आमदार नितेश राणे यांच्या नेतृत्वाखाली हा मोर्चा निघाला.

काही महिन्यांपूर्वी कुर्ला कॅम्प येथे राहणाऱ्या कल्पना चौधरी यांची मुलगी दृष्टी चौधरी हिने धर्मांतर केल्याचा प्रकार समोर आला होता. या प्रकरणात बनावट कागदपत्रे सादर करत धर्मांतर केल्याचा आणि फूस लावल्याचा आरोप कुटुंबियांनी केला होता. त्यामुळे विठ्ठलवाडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल झाल्यानंतर पोलिसांनी तत्काळ कारवाई करत दृष्टी चौधरी आणि सलीम चौधरी अशा दोघांना अटक केली होती. या घटनेनंतर शहरात संतापाचे वातावरण होते.

## महावितरणकडून एक हजार एक वृक्षांचे रोपण

### उल्हासनगर दोन विभागाचा उपक्रम; प्रधानमंत्री सूर्यघर योजनेसाठी मेळावा

**प्रतिनिधी**
**■ कल्याण**

महावितरणच्या उल्हासनगर दोन विभागाकडून 'वृक्षारोपण व संवर्धन कार्यक्रमा'त उत्स्फुर्त सहभाग नोंदवण्यात आला. या कार्यक्रमांतर्गत एक हजार एक वृक्षांचे रोपण करण्याची कामगिरी करण्यात आली. पर्यावरण संवर्धनाच्या उद्देशाने वन विभागाच्या सहकार्यातून हा उपक्रम राबवण्यात आला.

वन विभागाकडून १ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट दरम्यान 'वृक्षारोपण व संवर्धन कार्यक्रम' हाती घेण्यात आला होता. वृक्षारोपणासाठी जागा आणि रोपट्यांची उपलब्धताही वनविभागाने करून दिली. त्यानुसार




पंधरा दिवसात एक हजार रोपट्यांची लागवड करण्यात आली. तर स्वातंत्र्य दिनानिमित्त कल्याण परिमंडलाचे मुख्य अभियंता चंद्रमणि मिश्रा यांच्या हस्ते शेवटच्या रोपट्याचे रोपण करून उपक्रमाची सांगता करण्यात आली. याप्रसंगी कल्याण मंडल दोनचे अधीक्षक अभियंता दिलीप भोळे, कल्याण मंडल एकचे अधीक्षक अभियंता दीपक पाटील, कार्यकारी अभियंता देबाशिष दत्ता, उल्हासनगर विभागाचे कार्यकारी अभियंता प्रवीण चकोले यांच्यासह अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. या उपक्रमांतर्गत रोपण केलेल्या रोपट्यांचे वृक्षांमध्ये रुपांतर होईपर्यंत संगोपन करण्याचा निर्धार उल्हासनगर दोन विभागातील कर्मचारी, अधिकाऱ्यांनी व्यक्त केला. वन अधिकारी व्ही. नातू यांचे मोलाचे सहकार्य या उपक्रमाला लाभले.

## दरोड्यातील 4 आरोपींना राजस्थान मधून अटक

### दोन बंदुका व तीन जिवंत काडतुसांसह मुद्देमाल हस्तगत

**प्रतिनिधी**
**■ नवी मुंबई**

खारघर मधील बीएम ज्वेलर्स वर हेल्मेटधारी तीन इसमानी बंदुकीच्या धाकावर रात्री दहाच्या सुमारास, दरोडा टाकून दुकानातून 11 लाख 80 हजार रुपयांचे सोन्याचे दागिने लुटण्याचा प्रकार, दिनांक 29 जुलै रोजी घडला होता. याबाबत खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा देखील दाखल करण्यात आला होता. सीसीटीव्ही व तांत्रिक तपासाच्या आधारावर गुन्हे शाखेने उदयपूर राजस्थान येथून चौघा जणांच्या




मुसक्या आवडळल्या असून, त्यांच्या जवळून दोन अग्निशस्त्र तीन जिवंत काढतोस व दरवड्यातील मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे.

आरोपींनी नागरिकांच्या दिशेने गोळीबार करून दुचाकीवरून तिघेही फरार झाले होते. तीनही आरोपींनी हेल्मेट घातल्यामुळे आरोपींची ओळख पटवणे अवघड होते. मात्र गुन्हे शाखेच्या पथकाने आठ दिवस सीसीटीव्हीच्या मदतीने व तांत्रिक तपासाच्या आधारावर चार आरोपी असल्याचे निष्पन्न केले, व विविध पथके तपास कामासाठी सुरत, गुजरात, उदयपूर, राजस्थान व नेरळ, माथेरान या ठिकाणी पाठवली. शेवटी चारही आरोपी उदयपूर राजस्थान मध्ये असल्याची माहिती पोलिसांना मिळतात, पोलिसांनी छापा टाकून आरोपींच्या मुसक्या आवळल्या.

## स्लॅब कोसळून 15 वर्षीय मुलाचा मृत्यू

**प्रतिनिधी**
**■ भिवंडी**

जिल्ह्यातील भिवंडी शहरात एक हृदयद्रावक घटना घडली असून घराचा छत कोसळल्याने झालेल्या घटनेत एकाचा मृत्यू झाला आहे. भिवंडीतील बाहत्तर गाला परीसरात असलेल्या एका चार मजली इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरील फ्लॅटचा स्लॅब अचानक पडल्याने घरात झोपलेल्या 15 वर्षीय मुलाचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली. किसन पटेल असं या मृत मुलाचे नाव असून लेकांचा असा दुर्दैवी मृत्यू झाल्याने आईने टाहो फोडला. या घटनेनं परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. दरम्यान, याप्रकरणी घरमालकाने स्लॅबचं काम वेळेत न करुन दिल्यानेच ही घटना घडल्याचंही त्यांनी म्हटलंय.

भिवंडीतील बाहत्तर गाला परीसरात असलेल्या इमारतींमधील अनेक फ्लॅटची अवस्था बिकट झाली असून घरात झोपेत असताना अचानक स्लॅब अंगावर पडल्याने दुखापत झाल्याने 15 वर्षीय किसन पटेल हा गंभीर जखमी झाला होता. किसनला कुटुंबीयांनी व स्थानिकांनी तात्काळ जखमी अवस्थेत जवळील शासकीय रुग्णालयात नेले. मात्र, डॉक्टरांनी तपासून त्याला मृत घोषित केले. या संदर्भात भोईवाडा पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पोलीस या घटनेचा अधिक तपास करीत आहेत.

## सुखी आणि सफल जीवनाचे भावपूर्ण दर्शन घडविणारी 'तारा' - मोरे

**प्रतिनिधी**
**■ कल्याण**

"कोणत्याही स्वरुपाचा अतिरेकी दृष्टिकोण हा दुःखाला जन्म देत असतो. बुद्धाच्या मध्यम मार्गाचे अनुसरण केले तर माणूस अनेक जटील समस्या सहज सोडवू शकतो. दुःखमुक्तीच्या दिशेने जात सफल आणि सुखी जीवन कसे जगू शकतो त्याचे भावपूर्ण दर्शन " तारा " कादंबरीत घडते " असे प्रतिपादन मराठी हिंदी साहित्यिक प्रा. दामोदर मोरे यांनी येथे केले.



सुधीर भालेराव यांच्या "तारा" या कादंबरीचा प्रकाशन समारंभ सर्वोदय सभागृहात झाला त्यावेळी प्रा .मोरे अध्यक्षपदावरुन बोलत होते.

प्रा. मोरे पुढे म्हणाले की, "तारा" ही या कादंबरीतील संघर्षनायिका आहे. तिला सम्यक दृष्टी आहे. ती जे समाज हितकारी सम्यक संकल्प करते. ते ती धाडसीपणे सिद्धीस नेते. स्त्रिया सक्षम, स्वावलंबी झाल्या पाहिजेत. त्यांनी स्वतः स्वतःचा उद्धार केला पाहिजे. असा संदेश ही कादंबरी देते. कायदा हातात न घेता सनदशीर मार्गाने एखादी स्त्री समस्या कशा सोडवते त्याचा आदर्शच ताराच्या रुपाने लेखकाने उभा केला आहे."

कार्यक्रमाचे उद्घाटक प्रा. शुक्राचार्य गायकवाड यांनी या कादंबरीतील काही प्रसंगावर भाष्य करुन लेखक भालेराव यांचे अभिनंदन केले.

## 'लाडकी बहीण' योजनेसाठी पालिका मुख्यालयात थेट प्रक्षेपण व्यवस्था

### पालिका आयुक्तांसह महिलांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती

**प्रतिनिधी**
**■ नवी मुंबई**

'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेचा राज्यस्तरीय शुभारंभ आज बालेवाडी, पुणे येथे भव्यतम स्वरूपात मुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे यांच्या शुभहस्ते. उपमुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री ना.अजित पवार, महिला व बालविकास मंत्री ना.श्रीम.आदिती तटकरे आणि इतर मान्यवर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

हा समारंभ नवी मुंबईतील महिलांना पहाता यावा यादृष्टीने नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयातील ॲम्फिथिएटरमध्ये या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण बघण्याची व्यवस्था करण्यात आली होती. यावेळी महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे तसेच योजनेचे बेलापूर विधानसभा क्षेत्र समिती अशासकीय सदस्य विजय माने व श्रीम.कांताबाई घुले आणि उपआयुक्त शरद पवार, किसनराव पलांडे, सोमनाथ पोटरे, डॉ.कैलास



गायकवाड व महिला बाल विकास विभागाच्या नवी मुंबई बाल विकास प्रकल्प अधिकारी श्रीम. ज्योती पाटील आणि इतर अधिकारी उपस्थित होते.

योजनेचा लाभ अनेक महिलांच्या बँक खात्यात 14 ऑगस्टपासून डिबीटीव्दारे थेट जमा होण्यास सुरूवात झालेली असून त्याचा आनंद याप्रसंगी उपस्थित अनेक महिलांनी व्यक्त केला.

कार्यक्रमानंतर उपस्थित महिलांशी संवाद साधताना आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेचा लाभ मिळालेल्या महिलांचे अभिनंदन केले व लवकरच इतरही पात्र महिलांना याचा लाभ मिळण्याच्या दृष्टीने कार्यवाही सुरू असल्याचे सांगितले.

ठाणे तालुक्यात 1 जुलैपासून प्राप्त 1 लाख 77 हजार लाभार्थ्यांमध्ये नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील साधारणत: 50 हजार लाभार्थी होते. त्यामधील अनेक महिलांना लाभ प्राप्त झालेला असून कागदपत्र अपूर्णतेअभावी अंशत: नाकारण्यात आलेल्या 8712 अर्जांकरिता आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून घेण्याच्या कामाला गती द्यावी असेही आयुक्तांनी सूचित केले.

याशिवाय नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील साधारणत: 19 हजार महिलांची बँक खाती आधार संलग्न नसल्याने त्यांना अद्याप योजनेचा लाभ मिळू शकला नाही. यास्तव अशा महिलांशी संपर्क साधून आधार कार्ड संलग्न करून घेण्याबाबत सूचित करण्यात येत आहे. याकरिता बँकाही सुरू ठेवण्यात आलेल्या आहेत. अशा अर्ज दाखल केलेल्या महिलांची बँक खाती आधार कार्डशी संलग्न करून घेण्यासाठी अधिक विशेष प्रयत्न करावेत असेही आयुक्तांमार्फत निर्देशित करण्यात आले.

## इकोफ्रेंडली गणेशोत्सव साजरा करण्याचे पालिकेचे आवाहन

### मंडप परवानगीसाठी ऑनलाईन प्रणाली कार्यान्वित

**प्रतिनिधी**
**■ नवी मुंबई**

यावर्षी दि. 7 ते 17 सप्टेंबर 2024 या कालावधीत श्रीगणेशोत्सव - 2024 आणि 03 ते 12 ऑक्टोबर 2024 या कालावधीत नवरात्रौत्सव साजरा होत आहे. सार्वजनिक गणेशोत्सव व नवरात्रौत्सवामध्ये अवलंबावयाच्या प्रक्रियेबाबत महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री ना.श्री. एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली दि.14 ऑगस्ट 2024 रोजी विशेष बैठक संपन्न झाली असून या बैठकीत देण्यात आलेले निर्देश तसेच शासनाकडून मागील वर्षी पर्यावरणपूरक सण साजरा करणेच्या अनुषंगाने प्राप्त मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करण्यात येत आहे. त्यानुसार –

सार्वजनिक गणेशोत्सवासाठी गणेशोत्सव मंडळांनी महापालिका / स्थानिक प्रशासन यांची त्यांचे धोरणानुसार यथोचित पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील. मा.न्यायालयाने निर्गमीत केलेले आदेश आणि महापालिका तसेच संबधीत स्थानिक



प्रशासनाचे मंडपांबाबतचे धोरण यांचेशी सुसंगत असे मर्यादित स्वरुपाचे मंडप उभारण्यात यावेत. सर्व गणेशभक्त, गणेशोत्सव मंडळे आणि नागरिक / भक्तजनांना विनम्र आवाहन करण्यात येते की, शक्यतो प्लास्टर ऑफ पॅरिस (पी ओ पी) पासून घडविलेल्या श्री गणेशमूर्ती / दुर्गामातेची विक्री अथवा खरेदी करु नये.

प्लास्टर ऑफ पॅरिस (पी ओ पी) मूर्तीऐवजी शाडू मातीपासून घडविलेल्या मूर्तींची प्रतिष्ठापना करावी.


पारंपारिक गणेशमूर्तीऐवजी घरातील धातू / संगमरवर आदी मूर्तींचे पूजन करावे. मूर्ती शाडूची / पर्यावरणपूरक असल्यास त्याचे विसर्जन शक्यतो घरच्या घरी करावे. विसर्जन घरी करणे शक्य नसल्यास नजिकच्या कृत्रिम विसर्जन स्थळी विसर्जन करण्यात यावे.

सार्वजनिक उत्सवाकरिता वर्गणी / देणगी स्वेच्छेने दिल्यास त्यांचा स्विकार करावा. जाहिरातीच्या प्रदर्शनामुळे गर्दी आकर्षित होणार नाही असे पहावे. तसेच आरोग्य विषयक व सामाजिक संदेश असलेल्या जाहिराती प्रदर्शित करण्यास पसंती देण्यात यावी. सांस्कृतिक कार्यक्रमांऐवजी आरोग्य विषयक उपक्रम / शिबीरे (उदा.रक्तदान) आयोजित करण्यास प्राधान्य देण्यात यावे आणि त्याद्वारे, मलेरिया, डेंग्यू इ. आजार आणि त्यांचे प्रतिबंधात्मक उपाय तसेच स्वच्छता याबाबत जनजागृती करण्यात यावी. प्रतिबंधित प्लास्टिक पिशव्या व वस्तू यांचा वापर टाळण्यात यावा.

वृत्तमानस महाराष्ट्र
मुंबई, रविवार, १८ ऑगस्ट २०२४

## स्वारगेट ते कात्रज... मेट्रोचा होणार विस्तार

**पुणे :** मंत्रिमंडळानं पुणे मेट्रो फेझ वनच्या विस्तारीकरणालाही मान्यता दिली आहे. त्यानुसार स्वारगेट ते कात्रज असा पाऊणे सहा किलोमीटर लांबीचा, मेट्रोचा दक्षिण पुण्यात विस्तार होणार आहे. यासाठी सुमारे 3 हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. हे दोन्ही प्रकल्प 2029 पर्यंत पूर्ण होणं अपेक्षित आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत आज केंद्रीय मंत्रिमंडळाने पुणे मेट्रो च्या पीसीएमसी ते स्वारगेट या सध्याच्या पहिल्या टप्प्याच्या स्वारगेट ते कात्रज अशा भूमिगत मार्ग प्रकल्प विस्ताराला मंजुरी दिली. या नवीन विस्तारित प्रकल्पाची Line-1 B विस्तार अशी ओळख आहे आणि त्याचा विस्तार 5.46 किमी असेल. या विस्तारित प्रकल्पात तीन भूमिगत स्थानकांचा समावेश असेल, जे मार्केट यार्ड, बिब्बेवाडी, बालाजी नगर आणि कात्रज उपनगर यांसारख्या प्रमुख भागांना जोडेल. पुण्यामध्ये अतिशय सुविहित दळणवळण सुविधा उपलब्ध करण्याचा उद्देश असलेला हा प्रकल्प फेब्रुवारी 2029 पर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. या प्रकल्पाचा अंदाजे खर्च रु. 2954.53 कोटी आहे, ज्यासाठी भारत सरकार आणि महाराष्ट्र सरकार यांच्या समान वाट्यातून, तसेच द्विपक्षीय संस्था आदींच्या योगदानासह निधी पुरवला जाईल.



# काही मिनिटांच्या पावसाने पुणेकरांना झोडपले

## गुडघाभर पाणी साचल्याने मुख्यमंत्र्यांचा कार्यक्रमालाही फटका

प्रतिनिधी
■ पुणे

दहा दिवसाच्या विश्रांतीनंतर पुण्यात मुसळधार पाऊस पडला आहे. काही मिनिटांच्या पावसामुळे रस्त्यावर गुडघ्या इतके पाणी साचले आहे. हडपसर भागात मुसळधार पाऊस झाला आहे. थोड्याच वेळात मुख्यमंत्री हांडेवाडी या भागात श्रीराम शिल्पाच्या अनावरणासाठी येणार आहेत. कार्यक्रमाच्या स्थळी मोठ्या प्रमाणावर पाणी साचलं आहे.शहरात अनेक ठिकाणी मुसळधार पाऊस सुरू आहे. अचानक सुरू झालेल्या पावसाने पुणेकरांची धावपळ उडाल्याचं पाहायला मिळालं. दहा दिवसाच्या



विश्रांतीनंतर शहरात पाऊस सुरू झालाय. त्यामुळे छत्रीशिवाय बाहेर पडलेल्या पुणेकरांना मनस्ताप सहन करावा लागला. अनेक भागात दमदार पावसाची हजेरी पाहायला मिळत आहे.

पुण्यात अचानक पावसाला सुरुवात झाली. जवळपास १ ते २ तास पावसाने पुण्याला झोडपले. हडपसरच्या हांडेवाडी येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते श्रीरामच्या मंदिराचे उद्घाटन आहे. यावेळी याठिकाणी जोरदार पाऊस झाला. याठिकाणी आणण्यात आलेल्या खुर्च्या देखील पाण्यात तरंगत होत्या. मोठ्या प्रमाणात याठिकाणी पाणी साचलं आहे. पावसाचा जोर कमी झाल्याने हळूहळू पाण्याचा निचरा होत आहे.

पुण्याच्या अनेक ठिकाणी पाणी साचलं आहे. अचानक सुरु झालेल्या पावसामुळे लोकांची तारांबळ उडाली. रस्त्यावर गुडघाभर पाणी साचलं आहे. त्यामुळे लोकांना पाण्यातून वाट काढत प्रवास करावा लागत आहे. दहा दिवसांपूर्वी याच पुण्यामध्ये पूर आला होता. त्यामुळे बिकट परिस्थिती निर्माण झाली होती. पण, त्यानंतर पावसाने विश्रांती घेतली होती. पण, आज अचानक पावसाचे आगमन झाले.. पुण्यात काहीठिकाणी जनजीवन विस्कळीत झाले आहे. रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचलं आहे. त्यामुळे ट्रॅफिक कोंडीची स्थिती निर्माण झाली आहे. रात्रीच्या वेळी पावसाला सुरु झाली. केवळ एक दीड तासांतच मोठ्या प्रमाणात पाणी साचलं. दरम्यान, ऑगस्ट महिन्यातील पहिल्या 15 दिवसांमध्ये तर पाऊस सरासरीपेक्षा 15 टक्के अधिक राहीला. तर 15 ऑगस्टपर्यंत यंदाच्या पावसाळ्यात 105 टक्के पाऊस पडला, असा हवामान विभागाच्या आकडेवारीवरून स्पष्ट होते. ला निना परिस्थिती ऑगस्ट महिन्याच्या शेवटी विकसित होऊ शकते, असा अंदाज आहे.

# कोलकाता बलात्कार प्रकरणामुळे पुण्यातील 20 हजार डॉक्टर संपावर

प्रतिनिधी
■ पुणे

कोलकाता येथील आरजी कर मेडिकल कॉलेज रुग्णालयातील एका महिला डॉक्टरची बलात्कार करून हत्या करण्यात आलीय. या प्रकरणामुळं देशभरातून संताप व्यक्त केला जात आहे. आज इंडियन मेडिकल असोसिएशन तसंच डॉक्टरांच्या संघटनांनी संप पुकारला आहे. त्यामुळं आज देशभरातील डॉक्टर संपावर आहेत. या संपात पुण्यातील 20 हजार डॉक्टरांनी सहभाग घेऊन कोलकाता घटनेचा निषेध केला. त्यामुळं पुण्यातील आरोग्य सेवा विस्कळीत झालीय.



पुणे शहरातील सर्व रुग्णालये 24 तास बंद असून केवळ अत्यावश्यक सेवा सुरू आहेत. अत्यावश्यक सेवा वगळता कोणतंही रुग्णालय ओपीडी सुरू ठेवण्यात येणार नाही, असा निर्णय इंडियन मेडिकल असोसिएशनच्या डॉक्टरांनी घेतला आहे. पुण्यातील ससून रुग्णालयात इंडियन मेडिकल असोसिएशन तसंच विविध संघटनांच्या वतीनं आंदोलन करण्यात आलं. यावेळी डॉक्टरांनी जोरदार घोषणाबाजी केली. या संपात शहरातील 20 हजार डॉक्टर सहभागी झाले आहेत. तसंच पुण्यातील 900 रुग्णालये बंद ठेवण्यात आली आहेत. त्यामुळं आरोग्य सेवेवर विपरित परिणाम होत आहे.

कोलकतामध्ये घडलेल्या घटनेच्या निषेधार्थ आज बंद पुकारण्यात आल्याचं आंदोलक डॉक्टरांनी यावेळी बोलताना सांगितलं. सर्व डॉक्टरांना सुरक्षा मिळावी, अशी आमची मागणी आहे. घटनेतील आरोपींना कठोर शिक्षा व्हावी. तसंच रुग्णालयांची सुरक्षा झोन म्हणून नोंद करावी, अशी मागणी डॉक्टरांनी केलीय.

# ‘तिलारी‘ला भगदाड पडल्याने गोव्याचा पाणीसाठा होणार बंद

प्रतिनिधी
■ दोडामार्ग

ताडपत्री घालून तात्पुरती डागडुजी केलेला तिलारी धरणाच्या डाव्या कालव्याला शनिवारी भगदाड पडले. ही घटना कुडासे धनगरवाडी येथे घडली. कालव्याचे पाणी रस्त्यावर आल्याने रस्त्याला नदीचे स्वरूप प्राप्त झाले. तसेच ते भातशेतीतही घुसले. लागलीच या घटनेची माहिती जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना देण्यात आली. त्यानंतर पाण्याचा प्रवाह बंद करण्यात आला.

भगदाड पडलेल्या कालव्याच्या ठिकाणी एक मोरी आहे. कालव्यालगतच्या डोंगराळ भागातील पाणी या मोरीतून सखल भागात जाते. या कालव्याच्या बांधकामास जवळपास २५ ते ३० वर्षांचा कालावधी लोटला आहे. परिणामी ही



मोरी खचली. मात्र याकडे जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी पूर्णतः दुर्लक्ष केले व याचा विपरीत परिणाम शनिवारी सकाळी जाणवला आणि कालव्याला भगदाड पडण्याची दुर्दैवी घटना घडली. परिणामी गोव्याला होणारा पाणीपुरवठा सध्या बंद आहे. शिवाय सध्या पाऊस पडत असल्याने काम सुरू करण्यास अडचणी येणार आहेत. तरीही लवकरच काम सुरू केले जाईल असे कार्यकरी अभियंता विनायक जाधव यांनी सांगितले.

# शिंदे गटातील आमदाराने वाढदिवसाला लाडक्या सुपुत्राला तलवारीने भरवला केक

## पोलीस कारवाई करणार की नाही?

प्रतिनिधी
■ बुलढाणा

बुलढाण्याचे शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांचे सुपुत्र मृत्युंजय गायकवाड यांचा 15 ऑगस्टला बुलढाण्यात वाढदिवस साजरा करण्यात आला. गुरूवारी रात्री झालेल्या या कार्यक्रमात आमदार संजय गायकवाड यांनी भल्या मोठ्या तलवारीने स्टेजवर केक कापला. त्यानंतर कापलेला केक तलवारीनेच पत्नी सुविध्या आणि मुलाला भरवला. या सर्व कार्यक्रमाचा व्हिडिओ सोशल मीडियावर आता जोरदार व्हायरल होत आहे. सामान्य व्यक्तीने तलवारीने केक कापल्यास त्या व्यक्तीवर आर्म ॲक्ट नुसार गुन्हा दाखल होतो. मात्र आता शिंदेंच्या शिलेदाराने तलवारीने



केक कापल्याने पोलीस त्यांच्यावर कारवाई करतात की नाही हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

तलवारीने केक कापणे हा गुन्हा होऊ शकत नाही. तलवार ने केक कापताना चां हेतू कुणाला इजा पोहचवण्याचा नाही. यावरून गुन्हा दाखल करणे चुकीचे आहे. नेत्यांना तलवार देणं म्हणजे मर्दांगीचे प्रतीक आहे. पोलीस परेड वेळी सुद्धा पोलीस तलवार दाखवतो , मग तो लोकांना धमकवतो का? ऑलिम्पिक मधील तलवार बाजीचा गेम सुद्धा बंद करणार का? असा सवाल करत संजय गायकवाड यांनी टीका करणाऱ्यांना उत्तर दिले.

## चाकूचा धाक दाखवत महिलेला लुटले

■ संभाजीनगर

वॉचमन म्हणून घरी काम करणाऱ्या आरोपीने साथीदारांच्या मदतीने सीए महिलेला चाकूचा धाक दाखवत महागड्या मोबाईलसह साडेतीन लाख रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने लंपास केल्याची घटना उल्कानगरीत घडली.या प्रकरणी जवाहर नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुनील उर्फ स्वदेश सर्जेराव शिंदे (वय 30) रा. गल्ली नंबर 9 आंबेडकर पुतळ्याजवळ संजयनगर मुकुंदवाडी असे आरोपीचे नाव आहे. महिमा ऋषिकेश कुंकलोळ ३१ या चार्टर अकाउंटट आहे. त्यांच्या सोसायटीच्या बिल्डिंगमध्ये त्यांनी एक वॉचमन कामाला ठेवला आहे. हा वॉचमन मागील दहा महिन्यांपासून त्याच्या कुटुंबीयास बिल्डींगमध्ये राहतो.

# 50 हून अधिक विद्यार्थ्यांना बिस्किटातून विषबाधा

## छत्रपती संभाजीनगरच्या पैठणमधील शाळेतील प्रकार

प्रतिनिधी
■ संभाजीनगर

छत्रपती संभाजीनगरमधून जिल्हा परिषद शाळेत 50 हून अधिक विद्यार्थ्यांना विषबाधा झाल्याचा प्रकार घडला आहे. विद्यार्थ्यांना बिस्किटातून विषबाधा झाल्याचे समोर आले आहे. बिस्कीट खाल्ल्यानंतर विद्यार्थ्यांना मळमळ, उलट्यांचा त्रास सुरू झाले. अनेक विद्यार्थी तापाने फणफणले आहेत. त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. पैठण तालुक्यातील केकत जळगावमधील जिल्हा परिषद शाळेत हा प्रकार घडला आहे.

जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शनिवारी बिस्किट वाटप



करण्यात आले होते. हे बिस्किट खाल्ल्यानंतर विद्यार्थ्यांचे पोटदुखी सुरू झाली. तर काही जणांना मळमळ, उलट्या झाल्यानंतर विद्यार्थ्यांना ताप भरला आहे. या सर्व विद्यार्थ्यांना पाचोडच्या ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले. तर काहींना सलाइन लावण्यात आले आहे. या सर्व मुलांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती रुग्णालयातील सूत्रांनी दिली आहे.

# बहिणीला व्हिडीओ कॉल करत भावाने संपवले जीवन

## रक्षाबंधनाआधीच रत्नागिरीत घडली घटना

प्रतिनिधी
■ रत्नागिरी

बहिणीला व्हिडीओ कॉल करून मी ट्रेनखाली आत्महत्या करत असल्याचे सांगून एका ३८ वर्षीय तरुणाने रेल्वे पुलावरून उडी मारून रेल्वेखाली आत्महत्या केली. ही घटना रत्नागिरी शहराजवळील टीआरपी येथे गुरुवारी सायंकाळी घडली. सुरेंद्र राजेंद्र कीर (रा. मुरुगवाडा-पेठकिल्ला रोड, रत्नागिरी) असे तरुणाचे नाव आहे.

सुरेंद्रला दारूचे व्यसन होते. तो गुरुवारी दुपारी शहराजवळील कुवारबाव येथील टीआरपीजवळ असणाऱ्या रेल्वे पुलावर गेला होता. तिथून त्याने बहिणीला मोबाइलवर व्हिडीओ कॉल केला आणि मी ट्रेनखाली आत्महत्या करत आहे, असे सांगून फोन कट केला. त्यानंतर त्याने पुलावरून रेल्वे गाडीवर उडी घेत आत्महत्या केली. मृतदेहाचे अक्षरशः तुकडे झाले. या घटनेची माहिती मिळताच आजूबाजूचे नागरिक मोठ्या संख्येने घटनास्थळी दाखल झाले.

पोलिसांना याबाबत माहिती रत्नागिरी ग्रामीण पोलिस स्थानकाचे पोलिस उपनिरीक्षक निखार्गे, हवालदार मंदार मोहिते, हवालदार रूपेश भिसे, हवालदार रोशन सुर्वे, अजय कांबळे घटनास्थळी दाखल झाले होते. मृतदेह छिन्नविच्छिन्न अवस्थेत असल्याने पोलिसांना मृतदेहाचे तुकडे गोळा करावे लागले.

## सायबर चोरट्यांकडून 8 जणांची 80 लाखांची ऑनलाईन फसवणूक

■ पुणे

सायबर चोरट्यांकडून फसवणुकीचे सत्र सुरु असून चोरट्यांनी 8 जणांची तब्बल 80 लाख 10 हजार 64 रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार घडला आहे. मुंबई ते इराण पाठवण्यात येणाऱ्या पार्सल मध्ये अंमली पदार्थ पाठवण्यात आल्याचे खोटे सांगून आंबेगाव येथील एकाची २० लाख ९० हजार ४१ रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे. याप्रकरणी ४३ वर्षीय तरुणाने सिंहगड पोलीस ठाण्यात आरोपी विरोधात फिर्याद दाखल केली.

# मी नवीन आहे, मला साथ द्या

## अशोक चव्हाणांच्या लेकीची मतदारांना साद

प्रतिनिधी
■ नांदेड

"मी नवीन आहे मला साथ द्या माझ्या आजी आजोबा आई बाबा यांना तुम्ही साथ दिली आता मला ही द्या", असं म्हणत भाजप नेते अशोक चव्हाण यांची लेक श्रीजया चव्हाण यांनी नांदेडमधील मतदारांना साद घातली आहे. आज भोकर तालुक्यातील पिंपळढव येथे गिरीश महाजन यांच्या हस्ते अशोक चव्हाण यांच्या उपस्थितीत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण तसेच महायुती सरकारच्या लोककल्याणकारी योजनांचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी श्रीजया चव्हाण बोलत होत्या.



भोकर मतदारसंघात आज 926 कोटींचा भूमिपूजन कार्यक्रम पालकमंत्री गिरीश महाजन यांचा उपस्तित पार पडले. मात्र या भूमीपूजन सोहळा चर्चेत आला तो श्रीजया चव्हाण यांचा भाषणामुळे. श्रीजया चव्हाण यांनी विधानसभेसाठी रणशिंग फुंकल्याचे बोलले जात आहे. गेल्या काही दिवसांपासून श्रीजया चव्हाण भोकर मतदारसंघात फिरताना दिसत होत्या,मात्र त्यांनी थेट मतदारांना साद घातली आहे.

गेल्या काही दिवसांत श्रीजया या वडील अशोक चव्हाण यांच्यासोबत अनेक कार्यक्रमात दिसून आल्या होत्या. 26 मे रोजी त्यांचा वाढदिवस असतो. गेल्या वर्षी देखील श्रीजया चव्हाण यांचे 'भावी आमदार' अशा आशयाचे शुभेच्छापर होर्डिंग नांदेड शहरात झळकलेले पाहायला मिळाले होते. त्यामुळे चव्हाण कुटुंबातील तिसरी पिढी राजकारणात सक्रिय होतेय हे नक्की. दरम्यान, भारतीय जनता पक्षाने अशोक चव्हाण यांना राज्यसभा दिली आहे.



*पंढरपूर : शहर तालुक्यातील सकल मुस्लिम समाज सोशल ग्रुपच्या वतीने स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून राष्ट्रीय एकात्मता तिरंगा रॅली पंढरपूर शहरात सर्वत्र काढण्यात आली. यावेळी समस्त मुस्लिम समाज बांधवांच्या वतीने मनसे नेते दिलीप बापू धोत्रे यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी मुस्लिम समाजाचे नेते ॲड यासिन शेख, साजसेवक बशीर शेख, आरिफ बेळगांवकर, बाळासाहेब शेख, गौस धारूरकर इत्यादी उपस्थित होते.*

# संजय मंडलिक मुश्रीफांच्या पाठिशी, घाटगे एकाकी

## विधानसभेत घाटगेंनी मुश्रीफांविरोधात ठोकला शड्डू?

प्रतिनिधी
■ कोल्हापूर

आमदारकीसाठी शड्डू ठोकलेल्या समरजित घाटगेंना कागलमध्ये एकाकी झुंज द्यावी लागणार अशी चिन्ह आहेत. कारण माजी खासदार संजय मंडलिकांनीही पाठिंबा दिल्यानं हसन मुश्रीफ यांचं पारडं जड झालंय. त्यामुळे भाजप नेते समरजित घाटगे एकला चलोच्या भूमिकेत असणार की तुतारी हाती घेणार याची उत्सुकता आहे.

कोणत्याही परिस्थितीत कोल्हापूर जिल्ह्यातील कागल विधानसभेचं रण जिंकण्यासाठी कंबर कसलेल्या भाजप नेते समरजिसिंह घाटगे यांच्या समोरीतील अडचणी वाढत चालल्या आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कागलमधून मंत्री हसन मुश्रीफ यांची उमेदवारी जाहीर केली आहे. त्यामुळे फडणवीसांचे निकटवर्तीय असलेले समरजितसिंह घाटगे कोणती राजकीय भूमिका घेतात याकडे सर्वांचं लक्ष आहे. पहिल्यांदा माजी आमदार संजय बाबा घाटगे यांनी कागलमधून माघार घेत मुश्रीफांना जाहीर पाठिंबा दिला. आता माजी खासदार संजय मंडलिक यांनी सुद्धा मुश्रीफ यांच्या एका कार्यक्रमात हजेरी लावून त्यांच्या पाठीशी उभे राहिले आहेत.

लोकसभा निवडणुकीमध्ये संजय मंडलिक यांना हसन मुश्रीफ आणि घाटगे गटाकडून अपेक्षित मदत झाली नसल्याचा आरोप होत होता. त्यामुळे विधानसभेला मंडलिक कोणती भूमिका याबाबत उत्सुकता होती. मात्र आता त्यांनी पाठिंबा दिल्यानं हसन मुश्रीफ यांचं कागलसाठी पारडं आणखी मजबूत झालं आहे. दुसरीकडे गेल्या काही दिवसांपासून शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून समरजित घाटगे यांना चुचकारण्याचे प्रयत्न सुरू आहेत. त्यांनी तुतारी चिन्हावर लढण्यासाठी गळ घालण्याचा प्रयत्न सुरु आहे. त्यामुळे पुढील काही दिवसांमध्ये समरजित एकला चलो रे भूमिका घेऊन अपक्ष लढणार की हातात तुतारी घेणार ? याकडे कोल्हापूरकरांचं लक्ष आहे.

# विवाहाच्या आमिषाने मुलीला पळवून नेणाऱ्या तरुणाला सक्तमजुरी

■ पुणे

अल्पवयीन मुलीला विवाहाचे आमिष दाखवून पळवून नेल्याप्रकरणी तरुणाला अतिरिक्त सत्र न्यायाधीश एस. आर. नरवडे यांनी यांनी सहा महिने सक्तमजुरी आणि १५ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. दंड न भरल्यास तीन महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा भोगावी लागेल, तसेच दंडातील रकमेपैकी १० हजार रुपये मुलीला देण्याचे आदेश न्यायालयाने दिले.


विनोद उर्फ विनायक सुरेश चव्हाण अल्पवयीन मुलगी शाळेत कार्यक्रम आहे, असे असे सांगून घराबाहेर पडली. रात्री उशीरापर्यंत ती घरी परतली नाही. पालकांनी शाळेत जाऊन चौकशी केली. तेव्हा शाळेत कार्यक्रम आयोजित करण्यात आला नसल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पालकांच्या मोबाइल क्रमांकावर मुलीने संपर्क साधला. ‘मी नाशिकला आहे. चार दिवसांनी परत येईल’, असे तिने सांगितले. मोबाइल बंद असल्याचे उघडकीस आले. त्यानंतर पालकांनी मुलगी बेपत्ता झाल्याची तक्रार दिली.

# मुस्लिम समाजाने रस्त्यावर उतरावे हाच दंगलखोरांचा उद्देश

## पवार गटाच्या नेत्या फौजिया खान यांची रामगिरी महाराजांवर टीका

प्रतिनिधी
■ परभणी

देशामध्ये दंगली घडवणारी शक्तीच रामगिरी महाराज यांच्या पाठीमागे उभी आहे. मात्र मुस्लिम समाजाने त्यांच्या भूलथापांना बळी पडू नये. मुस्लिम समाजाने रस्त्यावर उतरावे हाच या दंगलखोरांचा उद्देश आहे. त्यामुळे मुस्लिम समाजाने त्यांच्या भूलथापांना बळी न पडण्याचे आवाहन शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्या खासदार फौजिया खान यांनी केले आहे. रामगिरी महाराजांच्या वक्तव्यामुळे राज्यात तणाव निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर त्यांनी मुस्लिम समाजाला शांतता



राखण्याचे आवाहन केले आहे.

रामगिरी महाराजांनी मुस्लिम समाजातील भावना भडकवणारे वक्तव्य केले असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या संदर्भात त्यांची एक व्हिडिओ क्लिप देखील सोशल मीडियाच्या माध्यमातून व्हायरल करण्यात आली आहे. ही व्हिडिओ क्लिप व्हायरल झाल्यानंतर राज्यभरात तणाव निर्माण झाला होता. रामगिरी महाराज यांच्यावर गुन्हा दाखल करून त्यांना तात्काळ अटक करण्यात यावी, अशी मागणी मुस्लिम समाजाने केली होती. त्यातच नाशिकमध्ये देखील पुकारण्यात आलेल्या बंदाच्या दरम्यान दोन समुदायांमध्ये तणाव निर्माण झाला होता. या सर्व पार्श्वभूमीवर खासदार फौजिया खान यांनी मुस्लिम समुदायाला भूलथापांना बळी न पडण्याचे आवाहन केले आहे.

मुस्लिम धर्माबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य केल्याच्या आरोपावरून वैजापूरच्या गोदावरी धाम सराला बेट येथील महंत रामगिरी महाराज यांच्याविरोधात नाशिक, छत्रपती संभाजीनगर व अहमदनगर जिल्ह्यातील मुस्लिम समाजातून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. रामगिरी महाराजांविरोधात गुन्हा दाखल करण्याच्या मागणीसाठी ठिकठिकाणच्या पोलिस ठाण्याबाहेर शेकडो नागरिकांनी ठिय्या आंदोलन केले. या संतापाची दखल घेत महाराजांविरोधात येवल्यात एक, वैजापूरमध्ये एक तर नगर जिल्ह्यात तीन असे एकूण 5 गुन्हे दाखल झाले आहेत. महंत रामगिरी महाराज यांचा सिन्नर येथे हरिनाम सप्ताह सुरू आहे. गुरुवारी त्यांनी आपल्या प्रवचनात मुस्लिम समालाबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य केले होते.

# शक्तीपीठ महामार्गाच्या विरोधात मुख्यमंत्र्यांसमोर होणार आंदोलन

प्रतिनिधी
■ नागपूर

नागपूर आणि गोव्याला जोडणा-या शक्तिपीठ महामार्गाविरोधात शतेरी चांगलेच आक्रमक झाले आहेत. शक्तिपीठ महामार्ग रद्द करण्यासाठी 12 जिल्ह्यातील शेतकरी एकटले आहेत. नागपूर आणि गोवा शक्तिपीठ महामार्ग रद्दच करावा. शक्तिपीठ महामार्ग रद्द झाल्याचा आदेशच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेऊन यावा अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या 20 ऑगस्ट रोजी कोल्हापूर दौऱ्यावर जाणार आहेत. मुख्यमंत्र्यांच्या कोल्हापूर दौ-यावेळी निदर्शनं करणार असल्याचा इशारा, शक्तिपीठ महामार्ग विरोधी संघर्ष समितीनं दिलाय. महामार्ग रद्द केल्याशिवाय मंत्र्यांना कोल्हापुरात पाय ठेवू देणार नाही. तसंच फेररचना नको, स्थगिती नको, महामार्ग रद्द झाल्याचा आदेश घेऊनच मुख्यमंत्र्यांनी कोल्हापुरात यावं असं शक्तिपीठ महामार्ग विरोधी कृती समिती म्हंटल आहे.



नागपूर- गोवा शक्तिपीठ महामार्गा विरोधात सांगलीमध्ये देखील शेतक-यांनी आंदोलन केले होते. महामार्गामुळे बाधित होणा-या शेतक-यांसह स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्यावतीनं जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आले. शासनानं हा महामार्ग रद्द करावा अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा यावेळी आंदोलकांनी दिला होता.

प्रामुख्याने कोल्हापूर आणि सांगलीमधील शेतकरी नागपूर आणि गोवा शक्तिपीठ महामार्गला विरोध करत आहेत. कोल्हापूर तसंच सांगलीसह एकूण 11 जिल्ह्यांतून शक्तीपीठ महामार्ग जातोय.. मात्र शेकडो एकर जमीन प्रभावीत होत असल्याने तो रद्द करण्याची मागणी शेतकरीच नाही तर सत्ताधारी पक्षातले मंत्री तसंच आमदारसुद्धा करत आहेत. शक्तिपीठ महामार्गासाठी संपादित करत असलेल्या जमिनीपैकी बहुतांश जमीन ही जिरायती आणि बागायती आहे.. कोल्हापूर जिल्ह्यातील जवळपास 59 गावांमध्ये शेकडो एकर जमीन यामुळे प्रभावित होणार आहे.. हा महामार्ग रद्द करावा अशी मागणी कोल्हापूरच नाही तर सांगली जिल्ह्यातूनही करण्यात आली.

नागपूर ते गोवा प्रवासासाठी 18 तास लागतात. शक्तिपीठ महामार्गामुळे हा प्रवास 8 तासांत शक्य होणार आहे. वर्धा, यवतमाळ, नांदेड, परभणी, बीड, लातूर, धाराशिव, सोलापूर, सांगली, सिंधुदुर्ग आणि कोल्हापूर जिल्ह्यातून हा शक्तीपीठ महामार्ग जाणार आहे.

## प्रीती झिंटाची कोर्टात धाव; हिस्सेदारीवरून सहमालकांविरुद्धच 'सामना'

**चंदिगढ :** आयपीएल २०२५ च्या हंगामासाठी होणाऱ्या मेगा लिलावाआधी पंजाब किंग्सच्या ताफ्यातील मालकांमधील अंतर्गत वाद चव्हाट्यावर आला आहे. पंजाब संघाच्या मालकांमध्ये शेअर्ससंदर्भातील मुद्द्यावरून वाद निर्माण झाला आहे. हा वाद थेट कोर्टापर्यंत पोहचला आहे. हे प्रकरण नेमकं आहे तरी काय? प्रीती झिंटानं सह संघ मालकाच्या विरोधात कोर्टात धाव घेण्यामागचं कारण काय? हे प्रश्न सध्या चांगेलच गाजत आहेत. पंजाब किंग्स इलेव्हनची सह मालकीण आणि बॉलिवूड अभिनेत्री प्रीती झिंटा हिने उच्च न्यायालयात धाव घेतली आहे तिने पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयात सह-मालक आणि प्रमोटर मोहित बर्मन यांच्या विरोधात याचिका दाखल केली आहे.संबंधित याचिकेतून प्रीती झिंटाने पंजाब संघाच्या सह मालकाने त्याच्या वाट्यातील शेअर्सचा अन्य पक्षाला विक्री करण्यापासून रोखण्याची विनंती केली आहे. या प्रकरणाची सुणावणी २० ऑगस्टला अपेक्षित आहे.



# परिवार आणि देशवासियांसाठी सतत कुस्तीत संघर्ष करीत राहणार!

## जिगरबाज मल्ल विनेशने दिले पुढेही खेळण्याचे संकेत

वृत्तसंस्था
■ नवी दिल्ली

मायदेशी परतल्यावर दुर्दैवी महिला पहिलवान विनेश फोगटने लिहिलेले पत्र खूप भावनापूर्ण आहे. यात तिने आपल्या करिअरमधील अनेक महत्त्वपूर्ण घटनांचा उल्लेख केला आहे. तसेच आपण २०३२ पर्यंत खेळू इच्छित असल्याचेही तिने यात म्हटले आहे. माझी टीम, माझे देशवासी आणि माझा परिवार, असे वाटते आहे की, आपण सगळे ज्या लक्ष्यासाठी काम करत होतो, ते अपुरेच राहिले आहे. काही न काही कमतरता नेहमीच राहते. कदाचित, वेगळ्या परिस्थितीत मी २०३२ पर्यंत खेळताना दिसू शकेन. कारण, माझ्यातली लढाऊ वृत्ती आणि कुस्तीप्रती असलेले प्रेम आजही कायम आहे.

अपात्र ठरल्याने अंतिम सामना खेळता न आलेल्या विनेशने या निर्णयाविरोधात क्रीडा लवाद अर्थात सीएएसकडे याचिका दाखल केली होती. तसेच आपल्याला रौप्य पदक देण्यात यावे अशी मागणीही तिने केली होती. मात्र, क्रीडा लवादाने तिची ही याचिका देखील फेटाळली. आणि भारतीयांची रौप्य पदकाची आशा संपुष्टात आली. सपोर्ट स्टाफ आणि डॉ. पारडीवाला माझ्यासाठी देवासमानच



माझ्या MAT वरच्या प्रवासात माझ्या सपोर्ट स्टाफने गेल्या २ वर्षात खूप मोठे योगदान दिले आहे. डॉ. दिनशॉ पार्डीवाला हे भारतीय क्रीडा क्षेत्रातील नवीन नाव नाही. माझ्यासाठी आणि इतर अनेक भारतीय खेळाडूंसाठी ते केवळ डॉक्टर नसून देवाने पाठवलेला देवदूत आहे, असे मला वाटते. दुखापतींनंतर जेव्हा मी स्वत:वर विश्वास ठेवणं थांबवलं, तेव्हा त्यांचा माझ्यावरचा विश्वास, काम आणि आशा यामुळेच मला माझ्या पायावर उभं केलं. त्यांचे कार्य आणि भारतीय खेळांप्रती त्यांचे समर्पण आणि प्रामाणिकपणा ही अशी गोष्ट आहे की देवालाही शंका येणार नाही. त्यांच्या आणि त्यांच्या संपूर्ण टीमच्या कार्य आणि समर्पणाबद्दल मी सदैव कृतज्ञ आहे. पॅरिसमधील त्यांची उपस्थिती ही सर्व खेळाडूंसाठी एक भेट आहे,अशा शब्दांत विनेशने आपलं सपोर्ट स्टाफ आणि वैद्यकीय अधिकारी डॉ. पार्डीवालांचे खास आभार मानले.

कुस्ती महासंघचा पाठिंबा देत नसेल विनेशने खेळायचे कसे - विनेशचे पती सोमवीर, विनेश फोगटचे पॅरिसमधून शनिवारी भारतात आगमन झाले. त्यानंतर विनेश फोगटचे पती सोमवीर राठी यांनी आता गंभीर आरोप केले आहेत. विनेश फोगटच्या प्रकरणावर सोमवीर यांनी प्रथमच आपले मौन सोडले आहे. आम्ही आताच भारतात आलो आहोत, त्यामुळे नेमकं काय करावं, हे आता सांगता येणार नाही. आमच्यासाठी हा सर्वात कठीण प्रसंग आहे. पण या सर्व प्रकरणात एक गोष्ट सर्वात वाईट घडली. सर्वात महत्वाची गोष्ट तुम्हाला सांगायची तर यावेळी भारतीय कुस्ती महासंघ हा आमच्याबरोबर नाही. जर भारताची संघटनाच आमच्याबरोबर नसेल तर विनेशने काय करावं, हा सर्वात मोठा प्रश्न आहे. कारण जर भारताची संघटना विनेशबरोबर नसेल तर तिने खेळायचे कसे, हा सर्वात मोठा प्रश्न आहे. कारण आतापर्यंत विनेशला या संपूर्ण प्रकरणात विनेशला भारतीय कुस्ती संघटनेचे समर्थन मिळू शकले नाही. त्यामुळे जिथे संघटनाच समर्थन आणि पाठिंबा देत नसेल तर विनेशने कोणाकडे पाहायचं आणि कसं यापुढे खेळायचं, हा सर्वात मोठा प्रश्न आहे."

## नीरजच्या आईचे कौतुक करावे तेवढं थोडं , त्यांना पाकमध्ये 'विशेष अतिथी' म्हणून बोलवा!

### पाकिस्तान पीपल्स पार्टी नेत्याचे सरकारला साकडे



वृत्तसंस्था
■ ईस्लामाबाद

पॅरिस ऑलिम्पिक मध्ये चमकदार कामगिरी करत नीरज चोप्राने जगभरात आपल्या देशाची मान उंचावली आहे. नीरजने रौप्य पदकावर देशाचे नाव कोरले आहे. यामुळे नीरजवर संपूर्ण देशभरातून शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला. नीरजने टोक्यो ऑलिम्पिकमध्ये सुवर्ण पदक पटकावले होते, तर यंदाच्या पॅरिस ऑलिम्पिकमध्ये मात्र नीरजचे एक पाऊल मागे राहिले. यामुळे नीरजसह संपूर्ण देशाची थोडी निराशा झाली. परंतु नीरजच्या आईने रौप्य पदकही आपल्यासाठी सुवर्णासमान असल्याचे म्हटले होते. आणि सुवर्ण पदक जिंकणारा अर्शद नदीमही आपला मुलगा असल्याचे त्यांनी म्हटले. त्यांच्या या वक्तव्यामुळे खुश होऊन पाकिस्तानी नेत्याने नीरजच्या आईला देशात विशेष अतिथी म्हणून बोलावण्याची मागणी केली आहे.

नीरज आणि अर्शदने पदक पटकावल्यानंतर नीरजच्या आईला विचारले असता त्या म्हणाल्या, आम्हाला वाईट वाटत नाही, आमचे रौप्यपदक सोन्यासारखे आहे. अर्शदही आमचा मुलगा आहे, तो खूप मेहनती आहे. खेळाडूच्या आयुष्यात अशा गोष्टी घडतात, पण रौप्यपदकाने आम्ही खूप आनंदी आहोत.नीरजच्या आईच्या या कौतुकोद्गारामुळे पाकिस्तानातील जनताही खूप आनंदी आहे. तर त्यांच्या या वक्तव्याचे सर्वच स्तरातून कौतुक केले जात आहे. यातच पाकिस्तानातून नवी मागणी समोर आली आहे. पाकिस्तान पीपल्स पार्टीचे ज्येष्ठ नेते आणि माजी फेडरल मंत्री बॅरिस्टर ऐतझाज अहसान यांनी एक पाकिस्तानच्या पंतप्रधानांकडे नीरज चोप्राच्या आईसाठी मागणी केली आहे. मागणीत त्यांनी म्हटले आहे की, नीरज चोप्राच्या आईला देशाच्या विशेष अतिथी म्हणून देशात आमंत्रित केले जावे.

> *भारत -पाकिस्तानातील कटुता कमी करण्यासाठीही प्रयत्न केले जावे.पाकिस्तानने या संधीचा फायदा घेऊन भारत आणि पाकिस्तान मध्ये शांतता प्रस्थापित करण्यासाठी पुढाकार घ्यावा. यातून लोकांना युद्ध नको, शांतता हवी आहे, असा संदेश जगाला द्यायला हवा.*
>
> ***- पाकचे माजी फेडरल** मंत्री बॅरिस्टर अहसान*

## दोन दशकांनंतर झिम्बाब्वे वर्ल्डकप आयोजनासाठी तयार

### महिला टी-20 क्रिकेट स्पर्धेचे यजमानपद मिळणार

प्रतिनिधी
■ लंडन

महिला टी-२० विश्वचषक यंदा बांगलादेशमध्ये होणार आहे. मात्र, बांगलादेशातील सरकारविरोधी निदर्शनांमुळे सुरक्षेच्या कारणास्तव टी-२० विश्वचषकाचे ठिकाण बदलले जाण्याची शक्यता आहे. महिला टी-२० विश्वचषक ३ ऑक्टोबरपासून आयोजित केला जाणार आहे. अशा परिस्थितीत यंदाच्या महिला टी-२० विश्वचषकाच्या यजमानपदाचा दावा अशा एका देशाने केला आहे. ज्याच्या नावाची जोरदार चर्चा सुरु आहे. हा देश दुसरा कोणी नसून झिम्बाब्वे आहे.

झिम्बाब्वे हा यजमानपदासाठी प्रमुख पर्याय म्हणून पुढे आला आहे. युएईकडेही पर्याय म्हणून पाहिले जात आहे. मंगळवारी, २० ऑगस्ट रोजी आयसीसी बोर्ड याबाबत निर्णय घेऊ शकते.झिम्बाब्वेने गेल्या काही वर्षांत (२०१८ आणि २०२३) दोन एकदिवसीय विश्वचषक पात्रता फेरीचे यशस्वी आयोजन केले आहे. त्यानंतर, झिम्बाब्वेने स्वतःला मोठ्या क्रिकेट स्पर्धांचे संभाव्य ठिकाण म्हणून स्थापित केले आहे. झिम्बाब्वेने २००३ मध्ये दक्षिण आफ्रिका आणि केनियासह शेवटच्या वेळी विश्वचषकाचे आयोजन केले होते.

## 'स्पीड गन' मयांक यादवला टीम इंडियात संधी मिळेल कि नाही याची शाश्वती नाही - जय शहा

प्रतिनिधी
■ नवी दिल्ली

भारताचा वेगवान गोलंदाज मयंक यादव सध्या बंगळुरू येथील राष्ट्रीय क्रिकेट अकादमीमध्ये आहे. या वेगवान गोलंदाजाने आयपीएल २०२४ मध्ये केवळ चार सामने खेळले, परंतु त्याने आपल्या वेगाने खळबळ उडवून दिली. मयंकने आयपीएल २०२४ मध्ये ६.९९ च्या इकॉनॉमीने सात विकेट घेतल्या.

मयंक यादवला १५० पेक्षा जास्त वेगाने चेंडू फेकण्यात कोणतीही अडचण येत नव्हती. या काळात त्याने ताशी १५६.७ किमी वेगाने चेंडूही टाकला. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे (बीसीसीआय ) सचिव




जय शाह यांना टीम इंडियामध्ये त्याच्या खेळण्याच्या शक्यतांबद्दल विचारले असता ते म्हणाले की, खेळाडूची निवड होईल की नाही याची शाश्वती देऊ शकत नाही. जय शहा यांना मोहम्मद शमी आणि मयंक यादव यांच्या दुखापतीबाबतच्या अपडेटबाबत प्रश्न विचारण्यात आला होता. यावर उत्तर देताना शहा म्हणाले की, "मोहम्मद शमीबद्दल तुमचा प्रश्न बरोबर आहे, पण मी मयंक यादवबद्दल कोणतेही उत्तर देऊ शकत नाही. कारण तो संघात असेल की नाही याची शाश्वती नाही. पण तो एक चांगला वेगवान गोलंदाज आहे, आणि आम्ही त्याची काळजी घेत आहोत. कारण आम्हाला त्याची ऑस्ट्रेलियात गरज आहे. आयपीएल २०२४ मध्ये युवा वेगवान गोलंदाज मयंकने आयपीएलमध्ये पदार्पण करत सर्वांना प्रभावित केले. परंतु दुखापतीमुळे त्याला केवळ चार सामने खेळल्यानंतर स्पर्धेतून बाहेर पडावे लागले. २१ वर्षीय खेळाडूला २०२२ च्या लिलावात लखनऊने २० लाख रुपयांच्या मूळ किमतीत विकत घेतले होते.

परंतु त्यानंतर दुखापतीमुळे त्याची जागा अर्पित गुलेरियाने घेतली होती. मयंकला आयपीएल २०२४ मध्ये संधी मिळाली, परंतु दुखापतीमुळे त्याला या हंगामालाही मुकावे लागले. त्याच्या टी-२० कारकिर्दीत त्याने १४ सामन्यात १९ विकेट्स घेतल्या आहेत, तर त्याच्या लिस्ट A कारकिर्दीत मयंकने १७ सामन्यात ३४ विकेट घेतल्या आहेत. मयंक डोमेस्टिक सर्किटमध्ये दिल्लीचे प्रतिनिधित्व करतो.

## आज रविवारी हार्बर व मध्य रेल्वेच्या मुंबई विभागात मेगा ब्लॉक

प्रतिनिधी
■ मुंबई

मध्य रेल्वे, मुंबई विभागात आज रविवारी ठाणे ते दिवा दरम्यान पाचवी आणि सहावी लाईन सकाळी १०.५० ते दुपारी ०३.२० पर्यंत मेगा ब्लॉक घेण्यात येणार आहे. त्यामुळे डाऊन जलद/अर्ध-जलद मार्गावर छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून ०९.४६ वाजता सुटणारी बदलापूर लोकल ते दुपारी २.४२ वाजता सुटणारी आसनगाव लोकल पर्यंत ठाणे आणि कल्याण स्थानकांदरम्यान डाऊन धीम्या मार्गावर वळवण्यात येणार आहेत. आणि त्यांच्या नियोजित थांब्यांव्यतिरिक्त कळवा, मुंब्रा आणि दिवा स्थानकांवर थांबतील. तसेच नियोजित आगमनापेक्षा १० मिनिटे उशिराने गंतव्यस्थानावर पोचणार आहेत.

तसेच कल्याण येथून दि. १०.२८ वाजता सुटणारी अंबरनाथ लोकल ते कल्याण येथून दुपारी ०३.१७ वाजता सुटणारी बदलापूर लोकल पर्यंतच्या अप जलद/सेमी जलद लोकल कल्याण आणि ठाणे स्थानकांदरम्यान अप धीम्या मार्गावर वळवण्यात येतील आणि त्यांच्या नियोजित थांब्यांव्यतिरिक्त दिवा, मुंब्रा आणि कळवा स्थानकावर थांबतील आणि पुढे ठाणे स्थानकावरील अप जलद मार्गावर पुन्हा वळवण्यात येतील. तसेच नियोजित आगमनापेक्षा १० मिनिटे उशिराने गंतव्यस्थानावर पोहोचतील.

या मेगा ब्लॉक मुळे अप मेल/एक्स्प्रेस गाड्या कल्याण आणि ठाणे स्थानकांदरम्यान अप जलद मार्गावर वळवल्या जातील आणि गंतव्यस्थानावर १० ते १५ मिनिटे उशिराने पोहोचतील.तर डाउन मेल/एक्स्प्रेस गाड्या ठाणे आणि कल्याण स्थानकांदरम्यान डाऊन जलद मार्गावर वळवण्यात येतील आणि त्या गंतव्यस्थानापेक्षा १० ते १५ मिनिटे उशिराने धावतील. मेल/एक्स्प्रेस गाड्यांचे शॉर्ट टर्मिनेशन करण्यात येणार आहे.

दरम्यान,अप हार्बर मार्गावर सकाळी ११.१० ते सायंकाळी ४.१० पर्यंत आणि डाउन हार्बर मार्गावर ११.४० ते सायंकाळी ४.४० पर्यंत छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई आणि चुनाभट्टी/वांद्रे स्थानकांदरम्यान मेगा ब्लॉक घेण्यात येणार आहे. त्यामुळे शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथून सकाळी ११.१६ ते दुपारी ४.४७ पर्यंत सुटणाऱ्या वाशी/बेलापूर/पनवेलसाठी डाउन हार्बर मार्गावरील सेवा आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथून सकाळी १०.४८ ते दुपारी ४.४३ वाजेपर्यंत सुटणाऱ्या वांद्रे/गोरेगाव येथे जाणारी डाऊन हार्बर मार्गावरील सेवा बंद राहतील. तसेच पनवेल/बेलापूर/वाशी येथून सकाळी ९.५३ ते दुपारी ३.२० पर्यंत छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबईसाठी सुटणारी अप हार्बर लाईन सेवा आणि गोरेगाव/वांद्रे येथून सकाळी १०.४५ ते सायंकाळी ५.१३ पर्यंत छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबईसाठी सुटणाऱ्या अप हार्बर मार्गावरील सेवा बंद राहणार आहेत.

ब्लॉक कालावधीत कुर्ला - पनवेल दरम्यान २० मिनिटांच्या वारंवारतेने विशेष सेवा चालवल्या जातील. तसेच हार्बर मार्गावरील प्रवाशांना ब्लॉक कालावधीत सकाळी १०.०० ते संध्याकाळी ६.०० वाजेपर्यंत मुख्य मार्ग आणि पश्चिम रेल्वे मार्गे प्रवास करण्याची परवानगी देण्यात आली आहे.

## माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या उपस्थितीत रामिम संघाचा 21 ऑगस्टला गुणगौरव सोहळा

प्रतिनिधी
■ मुंबई

कामगार महर्षी गं.द.आंबेकर यांच्या ११८व्या जयंतीच्या औचित्याने येत्या २१ ऑगस्ट रोजी दुपारी ३ वाजता,परेल च्या महात्मा गांधी सभागृहात महाविकास आघाडीचे चार सन्मानिय खासदार आणि गं.द.आंबेकर जीवन गौरव पुरस्कार व श्रम गौरव पुरस्कार प्रदान सोहळा पार पडणार आहे.समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून राज्याचे माजी मुख्यमंत्री,ज्येष्ठ कॉंग्रेसनेते पृथ्वीराज चव्हाण उपस्थित रहाणार आहेत.समारंभाचे अध्यक्षस्थान संघटनेचे अध्यक्ष आमदार सचिन अहिर भुषविणार आहेत. संघटनेचे सरचिटणीस गोविंदराव मोहिते पाहुण्यांचे स्वागत करतील



या प्रसंगी लोकसभा निवडणुकीत कष्टक-यांमधून मताधिक्याने निवडून आलेल्या महाविकास आघाडीचे ठाकरे शिवसेना गटाचे खासदार अरविंद सावंत,अनिल देसाई,संजय दीना पाटील,कॉंग्रेसच्या वर्षाताई गायकवाड यांचा शाल-श्रीफळ व सन्मान चिन्हाने गुणगौरव करण्यात येईल.महाराष्ट्र राज्य राष्ट्रीय कामगार संघाने या समारंभात महत्वाचा वाटा उचलला आहे.

या प्रसंगी प्रारंभी संघटनेच्या अमृतमहोत्सवाच्या औचित्याने केंद्रीय इंटकचे अध्यक्ष डॉ.जी. संजीवा रेड्डी यांना "श्रमरत्नं विशेष पुरस्कार 'जाहीर करण्यात येईल.

यंदाच्या गं.द.आंबेकर जीवन गौरवसाठी निवड झालेले कामगार नेते आमदार भाई जगताप यांचा मानाच्या गं.द.आंबेकर जीवन गौरव पुरस्काराने सन्मान होईल.

तर कामगार चळवळ विभागातून,सिन्नरचे कामगार हरीभाऊ बा.तांबे,सामाजिक विभागामधून तळोजातील औद्योगिक कामगार दिलीप ग.खोंड,नाशिकमधील महिंद्रा अँड महिंद्रा कंपनीतील कामगार लेखक विलास मो.पंचभाई यांचा साहित्यातून,चिपळूण-रत्नागिरीच्या कंपनीतील कामगार कलाकार संतोष शिंदे यांना कला विभागातून आणि मंत्रालयातील कर्मचारी नेमबाजीतील राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय खेळाडू कुमारी नेहा साप्ते यांना आंबेकर श्रम गौरव पुरस्काराने सन्मा नित करण्यात येणार आहे.

औद्योगिक क्षेत्रात मानाचे आणि प्रतिष्ठेचे ठरलेल्या या पुरस्काराचे हे दहावे वर्ष आहे.

पुरस्काराचे स्वरूप,मानपत्र,सन्मान चिन्ह, शाल-श्रीफळ असे असून सोबत श्रमरत्न पुरस्कारासाठी ७५ हजार रु.,जीवन गौरव पुरस्कारा साठी ५१ हजार रु. आणि पाच श्रम गौरव पुरस्कार विजेत्यांना प्रत्येकी ३५ हजार रु.चा धनादेश पारितोषिके म्हणून प्रदान करण्यात येतील.

या प्रसंगी गिरणी कामगारांच्या इयत्ता १० वि आणि १२ वी उत्तीर्ण मूलांना आंबेकर शैक्षणिक सहाय्याने गोरविण्यात येईल.

या प्रसंगी निवृत्ती देसाई उपाध्यक्ष रघुनाथ आण्णा शिर्सेकर,बजरंग चव्हाण, सुनिल बोरकर, सेक्रेटरी शिवाजी काळे,तसेच राजन लाड, सुनिल अहिर, मिलिंद तांबडे, उत्तम गिते संजय कदम,किशोर रहाटे, साई निकम आदी पदाधिकाऱ्यांचा या सोहळयास सहभाग लाभत आहे

## पालिकेचे सफाई कर्मचारी मालकी हक्काच्या घरातून वंचित का? - सुभाष पुत्रन

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबईकरांच्या आरोग्याची व स्वच्छतेची काळजी घेणाऱ्या महानगरपालिकेमध्ये पिढ्यानपिढी स्वच्छतेचे काम करणारे सफाई कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र शासन व महानगरपालिका मालकी हक्काने घरे देण्यासाठी कोणतेही ठोस धोरणाची अंमलबजावणी का करत नाही ? सफाई कर्मचाऱ्यांना स्वच्छ भारत अभियानाचे नायक म्हणून बोलले जातात. परंतु त्यांना आजपर्यंत स्वतःच्या मालकी हक्काने घरे दिली गेली नाही. एसआरएअंतर्गत सन २०११ पर्यंत लोकांना घरे देण्याचा शासनाकडे धोरण आहे. परंतु सफाई कर्मचाऱ्यांना मालकी हक्काने घरे देण्याकरीता कोणतेही धोरण नाही. मागासवर्गीय मनपा सफाई कामगार विकास संस्थेचे अध्यक्ष सुभाष एन. पुत्रन व उपाध्यक्ष विशाल डी. वालोद्रा या प्रश्नावर सातत्यपूर्ण कार्यरत आहेत.

महाराष्ट्र शासन व मनपा प्रशासनाला तसेच सफाई कामगार आयोगाकडे पाठपुरावा करत आहे की, महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाने दिनांक २६/०४/१९८५ रोजी जारी केलेल्या परिपत्रकाची अंमलबजावणी करावी. कारण सदर परिपत्रकामध्ये नगर विकास विभागाने अनुक्रमांक-२ मध्ये स्पष्ट नमुद केलेले आहे की, महानगरपालिका व नगरपालिकानी सफाई कामगारांकरीता जी निवासस्थाने बांधलेली आहे. त्या ठिकाणी जे सफाई कामगार राहत आहेत ती निवासस्थाने, सफाई कामगारांना मालकी हक्काने देण्यात यावी, कारण त्यांच्याकडून घरभाड्यापोटी बांधकामाची रक्कम त्यांच्याकडून वसुल केलेली आहे. असे असूनसुध्दा सदर परिपत्रकाची महाराष्ट्र शासनाने अंमलबजावणी केलेली नाही. मागासवर्गीय मनपा सफाई कामगार विकास संस्थेची मागणी आहे की, सदर परिपत्रकाची अंमलबजावणी करून महानगरपालिका व नगरपालिकेचे सफाई कर्मचारी यांना मालकी हक्काने घरे द्यावी.

## भांडुप पोलिस ठाण्यात पार पडला रक्षाबंधनाचा कार्यक्रम

प्रतिनिधी
■ मुंबई

सिद्धिविनायक शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, राजाराम शेठ विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, सिद्धिविनायक इंग्लिश मीडियम स्कूल. खिंडीपाडा, भांडुप. मुंबई या शाळेच्या वतीने भांडुप पोलीस स्टेशन या ठिकाणी राखी पौर्णिमेचा (रक्षाबंधन )सण अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला.



बहिण भावाच्या पवित्र नात्याचा सण म्हणजे रक्षाबंधन मात्र सदैव ऑन ड्युटी असलेल्या मुंबई पोलीस कर्मचाऱ्यांना रक्षाबंधनासह इतर सण साजरा करता येत नाही. अहोरात्र झटणारे आणि कायदा व सुव्यवस्था राखणाऱ्या पोलिसांना वेळेचे बंधन नसतेक. ऑन ड्युटी 24 तास कायदा सुव्यवस्थेचे पालन करावे लागते ,अशा पोलीस बांधवांसाठी राजाराम शेठ विद्यालय खिंडीपाडा भांडुप शाळेच्या मुख्याध्यापिका रश्मी रमेश खानविलकर मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली रक्षाबंधनाचा कार्यक्रम काल अतिशय उत्साहामध्ये साजरा करण्यात आला. शाळेच्या विद्यार्थिनींनी आपल्या लाडक्या पोलीस भाऊरायांना राखी बांधून हा सण साजरा केला, पोलिसांप्रती आदराची, आत्मियतेची व आपलेपणाची भावना यातून व्यक्त करण्यात आली.

## अल्ट्रा झकास ओटीटी वर थ्रिलर आणि ॲक्शन चित्रपटांची मेजवानी

प्रतिनिधी
■ मुंबई

प्रेक्षकांना उत्तम मनोरंजनाची निवड मिळावी यासाठी हा महिनाभर अल्ट्रा झकास ओटीटी वर थ्रिलर आणि एक्शन चित्रपटांची मेजवानी सुरू आहे. दर शुक्रवारी अल्ट्रा झकास ओटीटीवर थ्रिलर आणि ऍक्शन चित्रपटांची मालिका सुरू करण्यात आली आहे यामध्ये हॉलिवूड चित्रपट फ्लॅश वावूडं आणि लाय बाओ हे दोन चित्रपट, सामरा हा मल्याळी चित्रपट, डाक आणि चेस असे पाहायला मिळणार आहेत.

विविध संस्कृती आणि भाषांचे चित्रपट आपल्यां मातृभाषेत पाहायला मिळणार आहेत . हे सर्व सरस आणि एका पेक्षा एक थ्रिलर आणि ऍक्शनपट कुटुंबीयांसमवेत पाहू शकता. यातील लाय बाओ म्हणजे शक्तिशाली असा मराठीत अर्थ होतो .यामध्ये टेम या कॉमिक कलाकारांची कथा आहे .ज्याला कळले की त्याला एक गंभीर आजार जडला आहे .जगण्याच्या हताशपनात टेम प्रायोगिक वैद्यकीय उपचार करण्यास सहमत होतो आणि उपचारानंतर त्याला अलौकिक शक्ती प्राप्त होते . परंतु उपचारांची उत्पती एका गडद इतिहासात गुंफलेली आहे जी त्याच्या आयुष्यात उलगाडली जाते व पुढे त्याच्या जीवनाला कोणते वळण मिळते हे चित्रपटात पाहायला मिळेल.

## न्यूट्रोजिनाने नवीन व्हिजिबल रिपेयर श्रेणी सादर

प्रतिनिधी
■ मुंबई

Neutrogena®
DERMATOLOGIST RECOMMENDED BRAND

भारतीय ग्राहकांना भेडसावणाऱ्या त्वचेच्या एजिंगशी संबंधित समस्या दूर करण्यासाठी डर्मेटोलॉजिस्ट्सकडून शिफारस केल्या जाणाऱ्या स्किनकेयर ब्रँड न्यूट्रोजिनाने नवी व्हिजिबल रिपेयर श्रेणी सादर केली आहे जी त्वचेच्या एजिंगची लक्षणे फक्त सात दिवसांमध्ये व्हिजिबली रिपेयर करण्यासाठी तयार करण्यात आली आहे. यामध्ये सिरम, रिजनरेटिंग क्रीम आणि अंडर-आय क्रीम अशी तीन उत्पादने आहेत. न्यूट्रोजिना व्हिजिबल रिपेयर रेन्जमध्ये वेगाने परिणाम करणारे रेटिनॉल आणि इतर प्रभावी अँटी-एजिंग सामग्री आहे, जे त्वचेची लवचिकता आणि घट्टपणा सुधारण्यासाठी त्वचेतील नैसर्गिक कोलेजेन कायम राखत ४८% जास्त कोलेजेन निर्माण करते.

न्यूट्रोजिनाद्वारे करण्यात आलेल्या 'स्किन रिवाइंड सर्वेक्षणातून निदर्शनास आले की स्किन एजिंग ही भारतीय महिलांना भेडसावणारी एक प्रमुख स्किनकेयर समस्या आहे. ९५% महिलांना अँटी-एजिंगच्या उपाययोजना हव्या असतात आणि त्यासाठी त्या प्रयत्न देखील करत असतात. ३ पैकी २ महिलांनी सांगितले आहे की, फाईन लाईन्स आणि सुरकुत्या या एजिंगशी निगडित त्वचेच्या सर्वात मोठ्या समस्या आहेत. या सर्वेक्षणात आढळून आलेली रोचक बाब अशी की, ७५% महिला फाईन लाईन्स आणि सुरकुत्या यांना एजिंगची सुरवातीची लक्षणे मानतात, तरी फक्त ४२% महिला अँटी-एजिंगच्या विशेष उपाययोजनांचा वापर करतात. एजिंगची लक्षणे दूर करण्यासाठी योग्य पद्धती आणि प्रभावी उत्पादने याविषयी ग्राहकांमध्ये जागरूकतेचा किती अभाव आहे हे यावरून दिसून येते. ८५% महिलांनी सांगितले की, स्किन एजिंगच्या समस्यांवर आधीच उपाय केले असते तर बरे झाले असते.

# पाडायचं! की लढायचं!!



**विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकारणात जोरदार घडामोडी घडू लागल्या आहेत. एकीकडे महायुती आणि महाविकास आघाडीचे नेते अधिकाधिक जागांवर आपले उमेदवार कसे विजयी होतील याचे आराखडे तयार करीत आहेत, तर दुसरीकडे महायुती आणि महाविकास आघाडीच्या कोणत्या उमेदवारांना पाडायचं याची रणणिती मराठा समाजाच्या माध्यमातून मनोज जरांगे पाटील करताना दिसत आहेत. 'संविधान' प्रश्नाने उचल घेतल्याने लोकसभा निवडणुकीत ज्याप्रमाणे देशभरात भाजपाला जोरदार फटका बसला. बहुमत भाजपाला मिळू शकले नाही. भाजपच्या काही खासदारांचे बेताल व्यक्तव्य याला कारणीभूत ठरले होते. त्यांचप्रमाणे महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत मराठा आरक्षणाने उचल घेतली असून याचा भाजपाला जोरदार फटका बसेल अशी आत्तापासूनच राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात चर्चा रंगू लागली आहे. यालाही कारणीभूत मराठा समाजाबाबत बेताल व्यक्तव्य करणारी भाजपाचीच काही मंडळी ठरणार आहेत. मराठा आरक्षणाबाबत मागील अकरा महिने शांततेने सुरु असलेल्या आंदोलनात जरांगे पाटील यांनी शरद पवारांपासून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि छगन भुजबळ पर्यंत सर्वांवरच आरोप केले. पण भाजपाच्याच नेत्यांनी जरांगे पाटील यांच्यावर सर्वाधिक आरोप करुन मराठा समाजाला नाहक दुखावले. त्यामुळेच जरांगे यांच्या गन पॉईटवर फडणवीस कायमस्वरूपी राहिले. यातूनच "पाडायचं की लढायचं" असे चक्रव्यूह जरांगे पाटील यांनी तयार केले. यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात धीर गंभीर स्थब्दता निर्माण झाली. यातून बाहेर कसे पडावे असा प्रश्न जरांगे यांच्या चक्रव्यूहात सापडलेल्या अनेक आमदारांसमोर आता निर्माण झाला आहे.**



दिसले ते लिहिले

**सुरेंद्र मुळीक**

मागील अनेक वर्षे रखडलेला मराठा आरक्षणाचा प्रश्न तडीस नेण्यासाठी मनोज जरांगे पाटील हा मराठा योद्धा महाराष्ट्रात उभा ठाकला आणि मराठा आरक्षणाच्या प्रश्नाने राज्यातील राज्यकर्त्यांच्या मेंदूचा भुगा झाला. तसे पाहिले तर ज्या गावातून जरांगे पाटील यांनी आंदोलनाला सुरुवात केली ते जालना जिल्ह्यातील 'अंतरवली सराटी' हे एक छोटेसे गाव. छोटेसे गाव म्हटल्यावर त्या आंदोलनात तशी फारशी तीव्रता नसणारच आणि तशी ती नव्हतीच. मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात शांततेने उपोषण सुरु होते. तरीही पोलिसांनी बेछुट लाठीमार करुन शांततेत सुरु असलेल्या आंदोलकांना हुसकावून लावण्याचा प्रयत्न केला. यामुळे संपूर्ण मराठा समाज संतप्त झाला. सरकारच्या आदेशाशिवाय पोलीस प्रशासन इतका टोकाचा निर्णय घेणे अशक्य आहे असा थेट आरोप जरांगे पाटील आणि मराठा आंदोलकांनी केला. आणि ते खरेही आहे. यामुळे या लाठीमार प्रकरणाची सुई देवेंद्र फडणवीस यांच्या दिशेने आपसूकच सरकली गेली. कारण राज्यांची गृहमंत्री देवेंद्र फडणवीस आहेत. गरीब मराठा आंदोलकांवर हा लाठीमार का केला हे न समजण्यासारखे होते. त्यावेळी विरोधकांनी अशीही चर्चा पसरवली की.. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पात्र अपात्रतेच्या होत असलेल्या चर्चेवरून जनतेचे लक्ष दुसरीकडे वळविण्यासाठी हा लाठीचार्च चा प्रयोग अंमलात आणला गेला. वास्तविक अशा घटनांचा एकमेकांशी काहीही संबंध नसला तरीही अशी बोथट विधाने करुन आंदोलकांमध्ये संभ्रम निर्माण करण्याचे काम राज्यकर्ते नेहमीच करीत असतात. जरांगे पाटील यांच्या मराठा आरक्षण आंदोलनाबाबतही विविध राज्यकर्त्यांनी अशी विधाने करुन आंदोलकांमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

त्यानंतर जरांगे पाटील यांनी उपोषण मागे घेतल्याने सरकारने श्वास घेतला. पण मराठा आरक्षणावरून महाराष्ट्रात पेटलेल्या निखाऱ्यावर सरकारने काही काळ पाणी शिंपडले असले तरी या निखाऱ्यातून ज्वाळा कधी बाहेर येथील याची चिंता सरकारला होती. ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा मराठा आरक्षणाचा प्रश्न छेडल्याने सरकारला वाटत असलेली चिंता खरी ठरली असेच म्हणावे लागेल. आता संधी सोडली तर पुढे कधीच संधी मिळणार नाही असे म्हणत जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा मराठा आरक्षणाचे शिवधनुष्य हाती उचलले. हा प्रश्न निकाली काढण्यासाठी एका फाटक्या माणसाने ' आंतरवेलीसराटी' पासून सुरु केलेले आंदोलन केवळ महाराष्ट्रात नाही तर संपूर्ण देशात आणि जगात पोहचले असे सर्वांनाच म्हणण्याची वेळ आली आहे. मनोज जरांगे नावाचा फाटका माणूस कोणत्याच अमिषाला आणि कोणालाही मॅनेज न झाल्याने आरक्षणाचा हा लढा अधिकाधिक तीव्र होत गेला. मागील अकरा महिन्यांपासून सुरु असलेल्या या आंदोलनाला महाराष्ट्र आणि देशातीलच नाही तर जगभरातील मराठ्यांनी उत्स्फूर्त पणे पाठिंबा दिला. याची झळ नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत सत्ताधारी महायुतीला महाराष्ट्रात आणि पर्यायाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारला बसला. अब की बार 400 पार असा नारा देणाऱ्या भाजपाला 240 पर्यंत थांबावे लागले. बहुमतही गाठता आले नाही.

यावरून हे स्पष्ट झाले की मराठा आरक्षण आंदोलनाचा प्रश्न महाराष्ट्र सरकार योग्य रीतीने हाताळू शकले नाहीत. महाराष्ट्र सरकारने हे प्रकरण योग्य पद्धतीने हाताळले असते तर लोकसभा निवडणुकीत महायुतीला जो जबरदस्त फटका बसला त्याचे धक्के दिल्लीतील सत्तेला बसले ते बसले नसते.

वास्तविक सरकार मध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार असे दोन मराठा नेते होते. पण अजित पवार यांनी मराठा आरक्षण आंदोलनाबाबत तितकासा रस घेतला नाही. त्यांनी या आंदोलनापासून लांब राहणेच पसंत केले. कदाचित या आंदोलनाच्या माध्यमातून काका आपला गेम करतील अशी अजित पवार यांना वाटत असावे. तर या आंदोलनाबाबत सुरवातीला सामंज्यसाची भूमिका घेणारे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मी 'करेक्ट कार्यक्रम' करतो असे विधान जरांगे पाटील यांना उद्देशून केल्यामुळे मराठा आंदोलकांनी मुख्यमंत्री शिंदे यांच्याबाबत नाराजी व्यक्त केली. वास्तविक आरक्षणाबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि जरांगे पाटील यांच्यात अनेक वेळा चर्चेच्या फेरी झाल्यात. परंतु त्यातून काहीच निष्पन्न न झाल्याने जरांगे पाटील यांनी मुंबईच्या दिशेने कूच केली. जरांगे यांच्या सोबत असलेल्या लाखो मराठा आंदोलकांमुळे सरकारला घाम फुटला. आंदोलक मुंबईत येऊ नये यासाठी सरकारने आरक्षण दिले असे सांगून जी.आर. दाखवून गुलाल उधळला. त्यामुळे आंदोलक माघारी फिरले. पण दोन दिवसात सरकारने फसवणूक केल्याचे मराठ्यांना लक्षात आले. त्यामुळे मनोज जरांगे संतप्त झाले. आधीच आरक्षण न दिल्याने संताप होताच त्यात मुख्यमंत्री शिंदे यांनी मराठ्यांची फसवणूक केल्याने जरांगे यांनी सरकारचा पुरता समाचार घेतला. त्यावेळीही जरांगे यांच्या गन पॉईंटवर सरकार आणि मुख्यमंत्री शिंदे यांच्यापेक्षा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस जास्त होते. देवेंद्र फडणवीस यांना भाजपा आणि महायुतीत असलेले अंतर्गत विरोधक यामुळे खुश झाले असावेत. राजकारणात हे असेच असते. राजकारणाचा हा एक भाग आहे. म्हणूनच फडणवीस बाबत संशयाची बोटे आपल्या दिशेने येऊ नये यासाठी मुख्यमंत्री शिंदे यांनी जरांगे पाटील यांना इशारा देताना 'करेक्ट कर्यक्रम' करणार अशी भाषा वापरली. यामुळे या सर्व प्रकरणामागे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचाच हात असल्याचा थेट आरोप जरांगे पाटील यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावर केलाच, पण.. मी कोण आहे! करेक्ट कार्यक्रम कसा करतात ते मी तुम्हांला दावतोच! असा इशाराही जरांगे पाटील यांनी एकनाथ शिंदे आणि फडणवीस यांना दिला. याचे सारे पडसाद लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने महाराष्ट्रात उमटलेले पाहावयास मिळाले. त्यामुळे करेक्ट कार्यक्रम करण्यात जरांगे पाटील यशस्वी झालेत. निवडणुकीत अपयश मिळाल्याने महायुतीने मराठा आरक्षणाबाबत जरांगे पाटील यांच्याशी पुन्हा चर्चा करण्यास सुरुवात केली. यातूनच मराठा आरक्षणबाबत तोडगा काढण्यासाठी सरकारने एक महिन्याची मुदत मागितली. पण जरांगे पाटील यांनी सरकारला दोन महिन्यांची मुदत दिली. या कालावधीत जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात सोलापूर ते नाशिक अशी मराठ्यांची शांतता रॅली निघाली. या रॅलीत मराठ्यांमध्ये उत्साह निर्माण करुन त्यांची एकजूट कारण्यात जरांगे पाटील यांना मोठया प्रमाणात यश आलेले पाहावयास मिळाले. या रॅलीत जरांगे पाटील यांनी निवडणुकीचे संकेत देताना स्पष्ट केले की...शेतकऱ्यांच्या पोरांनी, गरिबांच्या पोरांनी निवडणूक लढवायची नाही! आमदार व्हायचं नाही! असे कुठे लिहिले आहे का! जरांगे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाने मराठा आरक्षणाच्या आंदोलनाने कसे वळण घेतले आहे हे दिसत आहे. आता जरांगे पाटील यांनी सरकारला दिलेल्या मुदतीची मराठा आंदोलकांना वाट पाहायची आहे. ही मुदत 28 ऑगस्ट रोजी संपत आहे. त्यानंतरच 29 ऑगस्ट रोजी 'पाडायचं की लढायचं' हा निर्णय मराठा आंदोलकांच्या वतीने मनोज जरांगे पाटील घेणार आहेत. हा निर्णय घेण्यासाठी 12 दिवसाचा कालावधी जरी असला तरी "पाडायचं की लढायचं" जरांगे पाटील यांच्या या विधानाने महाराष्ट्राच्या राजकारणात गंभीर स्थब्दता पसरली आहे. राज्यातील मराठ्यांची संख्या आणि मराठा मतदारांची संख्या पाहता जरांगे यांच्या "पाडायचं की लढायचं" या चक्रव्हूह्यात फसण्याची कोणत्याच विद्यमान आमदारांची इच्छा नाही. कारण जरांगे पाटील यांचा 'पाडायचं की लढायचं' हा फॅक्टर रत्नागिरी - सिंधुदुर्ग वगळता संपूर्ण महाराष्ट्रात जोरदार चालेल असे म्हटल्यास ते चुकीचे ठरणार. याचा अर्थ रत्नागिरी - सिंधुदुर्ग जिल्ह्यात अजिबात चालणार नाही असे म्हणता येणार नाही. यामुळेच जरांगे पाटील यांच्या 'पाडायचं की लढायचं' या विधानाचा राज्यकर्त्यांनी इतका धसका घेतला आहे की निवडणुकीच्या धास्तीने सारेच गप्प आहेत. जरांगे पाटील यांच्याबाबत मागच्या दरवाजाने आमदार, खासदार झालेलेच बोलताना दिसत आहेत. त्यात ओरिजिनल भाजपाचे कोणीच दिसत नाहीत.

## ...तरच भाजपला बहुमत मिळेल!



मराठा आरक्षणाबाबत केवळ देवेंद्र फडणवीस यांनाच दोष देऊन चालणार नाही. मराठ्यांना आरक्षण न मिळण्याबाबत जितके देवेंद्र फडणवीस दोषी आहेत असे वाटत असेल तर तितकेच किंबहुना त्यापेक्षा जास्त दोषी शरद पवार आहेत असे म्हटल्यास चुकीचं ठरणार नाही. 2014 साली केंद्रात आणि राज्यात भाजपाचे सरकार आले आणि मराठा आरक्षणाचा प्रश्न चिघळला गेला. त्यामुळेच आरक्षणाचा सारा दोष फडणवीस यांच्या माथी मारला गेला. यात मराठ्यांचे काही चुकले असे वाटत नाही. त्याचे म्हणणे बरोबर आहे. मग आरक्षणाचा दोष शरद पवारांच्या माथी का मारला गेला नाही असाही प्रश्न उपस्थित होत आहे. 2000 पासून 2014 पर्यंत तब्बल 15 वर्षे राज्यात आणि केंद्रात कॉंग्रेसची सत्ता होती. केंद्रात आणि राज्यात शरद पवार यांचा शब्द टाळण्याचे कोणाचेही धाडस झाले नसते. तरीही मराठ्यांना आरक्षण मिळालेच नाही. मराठ्यांचे जाणता राजा म्हणून राजकारणात ओळखले जाणाऱ्या पवारांनी मराठ्यांना आरक्षण मिळवून द्यायलाच हवे होते. पण पवारांनी गरीब मराठ्यांना झूलवत ठेवले आणि अजित पवार, सुप्रिया सुळे, रोहित पवार, सुनेत्रा पवार, पार्थ पवार आणि आता चर्चेत असलेले युगेंद्र पवार असे एकामागून एक करीत पवार घराण्यातील सर्वांनाच राजकारणात मोठे केले. केवळ पवार घराणेच नाही तर पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यात देशमुख, पाटील, कदम अशी असंख्य मराठा घराणी आहेत की त्यांनी राजकारण, उद्योग व्यवसाय आणि समाजकारण स्वतःच्याच घराण्याभोवती फिरवत ठेवले. या घराण्यांनी कधीही गरीब मराठा घराण्यांचा विचार केलाच नाही. तरीही आजच्या इतकी मराठा आरक्षणाची ओरड कधीच झाली नाही. याचे महत्वाचे कारण म्हणजे त्यावेळी मनोज जरांगे सारखी व्यक्ति नव्हती. त्यामुळे गरीब मराठ्यांचे नेतृत्वही याच मोठ्याला घराण्यांकडे होते. त्यामुळेच शेतकरी असलेला गरीब मराठ्यांचा आवाज या मोठया घराण्यांनी तिथेच दाबून टाकला. पण गरीब शेतकरी असलेल्या मनोज जरांगे मुळे शेतकरी असलेल्या गरीब मराठ्यांचा आवाज राज्यात, देशात आणि जगात पोहचला. त्यामुळेच मनोज जरांगे यांचे नेतृत्व शेतकरी असलेल्या गरीब मराठ्यांना मान्य असले तरी मोठ्याला मराठा घराण्यांना मान्य होणार नाही असे शरद पवार यांनी नुकत्याच केलेल्या विधानाने स्पष्ट होत आहे. आरक्षणाची टक्केवारी वाढवून देण्याची जबाबदारी केंद्राची आहे असे सांगून शरद पवारांनी केंद्राकडे बोट दाखवून आपल्या काखा वर केल्यात. मग तब्बल 15 वर्षे केंद्रात आणि राज्यात कॉंग्रेस सत्तेवर होती तेव्हा पवार यांनी पुढाकार का घेतला नाही असा प्रश्न सामान्यांसमोर निर्माण होणारच. त्यामुळेच आरक्षणाचा प्रश्न सडत राहिला आणि आता तो चिघळला. यात फडणवीस यांचा दोष इतकाच आहे की देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री होताच प्रशासनातील आणि प्रशासनाच्या बाहेरील फडणवीस यांच्या जवळीक असलेल्यानी एखादे राज्य जिंकल्यासारखे वागू लागले तिथेच फडणवीस यांच्या प्रतिमेला तडे जाऊ लागले. मराठा आरक्षण हा त्यातलाच एक भाग आहे. जर भाजपाला खरोखरच महाराष्ट्रातील राजकारणी घराण्यांचा पराभव करायचा असेल तर भाजपाने गरीब मराठ्यांना आरक्षण देऊन जरांगे पाटील यांना सोबत घेऊन त्यांच्या नेतृत्वावर शिक्कामोर्तब करावे. कोणालाही सोबत न घेता भाजपा आणि जरांगे पाटील यांचे सरकार बहुमताने सत्तेवर येईल.

## ...तरीही फडणवीस यांच्या बाजूने नारायण राणे!



मराठा आरक्षणावरून राज्यातील राजकीय वातावरण कमालीचे तापलेले आहे. मराठ्यांचा योद्धा समजले जाणारे मनोज जरांगे पाटील यांनी संपूर्ण महाराष्ट्रात मराठ्यांची एकजूट केली आहे. मराठा आरक्षणाच्या आड येणाऱ्यावर जरांगे पाटील थेट आरोप करीत आहेत. त्यांच्या गन पॉईंटवर सातत्याने देवेन्द्र फडणवीस यांचे नाव आहे. मराठा आरक्षणाचा सर्वात मोठा अडसर म्हणून दररोज फडणवीस यांच्यावर आरोप होत आहेत. यामुळे महाराष्ट्रात आणि देशात फडणवीस यांची प्रतिमा मराठा विरोधी नेता अशी निर्माण होऊ लागली आहे. अशी प्रतिमा करण्यास विरोधक यशस्वी झाले आहेत. आधीच 2019 च्या निवडणुकीत विनोद तावडे यांना उमेदवारी न दिल्याने, त्याआधी आशिष शेलार यांना मंत्रिपद न दिल्याने फडणवीस यांच्यावर मराठा विरोधी म्हणून आरोप होत होतेच. त्यावेळी संकटमोचक म्हणून गिरीश महाजन नेहमीच पुढे पुढे असायचे. पण आता जरांगे पाटील यांनी फडणवीस यांच्यावर सतत्याने आरोप करूनही फडवणीस यांचे संकटमोचक म्हणून ओळखले जाणारे गिरीश महाजन फडणवीसांच्या मदतीला धावून आलेले दिसलेच नाही. इतकेच काय गिरीश महाजन सध्या कुठेच दिसत नाहीत. मराठा आरक्षणाच्या बाबतीत आपण फडणवीस यांची पाठराखण केली तर जामनेर मतदारसंघात फटका बसू शकेल अशी भिती गिरीश महाजन यांना असल्यानेच महाजन यांनी शांत राहणे पसंत केले असावे. गिरीश महाजन यांच्याप्रमाणे भाजपच्या सर्वच आमदारांनी मराठा आरक्षणाबाबत शांत राहण्याचा निर्णय घेतलेला दिसत आहे. त्यामुळे देवेंद्र फडणवीस भाजपात एकाकी पडले का असे चित्र निर्माण झालेले दिसत आहे. आज फडणवीस यांच्या बाजूने जे सामोरे येऊन बोलत आहेत ते नितेश राणे, प्रवीण दरेकर, प्रसाद लाड हे सारे कोकणातील आहे. आणि फडणवीस कृपेने राज्यसभेवर खासदार म्हणून वर्णी लागलेले अमरावती चे डॉ. अनिल बोन्डे. मात्र बोन्डे हे पडद्याआड राहून बोलत आहेत. पण कोकणी माणसाचा स्वभाव असा आहे की ज्याच्याशी दोस्ती केली की प्रामाणिकपणे तो निभावतो. त्यानुसारच राणे, दरेकर आणि लाड हे सारे भाजपाचे ओरिजिनल नसूनही फडणवीस साठी उभे राहिले. आश्चर्य या गोष्टीचे वाटते की. 2015 साली झालेल्या वांद्रे मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत नारायण राणे यांना पराभूत करण्यामागे फडणवीस यांचा मोठा हात होता याची कोकणी माणसांना जाणीव आहे. नारायण राणेही हे अमान्य करू शकणार नाही. नारायण राणे विधिमंडळ सभागृहात आले तर सत्ताधारी भाजपला त्रासदायक ठरेल असे फडणवीस यांना वाटत होते. म्हणूनच शिवसेना भाजपाची युती तुटलेली असतानाही नारायण राणे विजयी होऊ नये यासाठी देवेंद्र फडणवीस आणि उद्धव ठाकरे यांनी एकत्रित येऊन राणे यांच्या विरोधात शिवसेना भाजपाचा एकच उमेदवार दिला. तरीही नारायण राणे यांचा विजय होऊ शकेल अशी भिती नारायण राणे यांच्या कॉंग्रेससह सर्वच विरोधकांना वाटू लागल्याने MIM च्या उमेदवाराला निवडणुकीच्या रिंगणात उतरविण्यास राणे विरोधकांना यश आले. त्यामुळेच नारायण राणे यांचा या पोटनिवडणूकीत पराभव झाला. राजकारणाचा हा सारा प्रवास नारायण राणे यांना माहित असूनही केवळ देवेंद्र फडणवीस यांच्यासाठी मराठ्यांचे योद्धा जरांगे पाटील यांना अंगावर घेण्याची राणे यांनी तयारी दाखवली. येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत नितेश राणे यांचा विजय होईल की पराभव होईल याची काळजी नारायण राणे यांनी केली नाही. मराठा मित्र कसा असतो हे फडणवीस यांना राणे यांनी प्रत्यक्षात दाखवून दिले.